किंवा **नार्मंडी** ह्या दोहोंतून कोणत्यातरी एकावर एकदम राज्य-करावयास पाहिजे होतें, **जिफ्री** आणि **रिचर्ड** ह्यांना **फ्रान्स** देशांत आपल्या जातीच्या म्हणून जमिनी पाहिजे होत्या, आणि राणी **एलिनोर** ही आपला नवरा आपली हेळ-सांड करतो म्हणून त्याचा द्वेष करी, आणि **फ्रान्स**चा राजा तर त्या बंडखोरांना कुमक करण्याला अति सिद्ध होताच. शिवाय भरतीला, **स्काट्लंड**चा राजा **वुइलियम धि लायन** (सिंह) हा **इंग्लंडाच्या** उत्तरेकडील **कौंटी** जिंकून परत घेण्याविषयीं उत्सुक होताच, आणि **इंग्लिश** बारन लोक त्या घालमेलींत आपल्या पूर्वीच्या सत्तेपैकीं कांहीं तरी आपल्याला परत मिळेल म्हणून आशा करून होते.

हेन्रीच्या पुत्रांचें बंड.

परंतु **हेन्री** त्या सर्वांना पुरा पडणारा होता. **पोपा**कडील क्षमा घेऊन येणाऱ्या जासुदांना भेटण्यासाठीं तो **आयर्लंडां**तून परभारें **नार्मंडी**स गेला. नंतर आपल्या पुंडावा करणाऱ्या पुत्रांना आपल्या फौजेच्या मदतीनें त्यानें जिंकलें, आणि राणी **ए-लिनोर** हिला कैदेंत टाकलें. तेथें ती त्याच्या मरणकालापुढें-पर्यंत होती. नंतर **बेकेटा**च्या कबरीपुढें कडक प्रायश्चित्त किंवा देहदंडन करून त्यानें आपल्या प्रजेचें प्रेम जोडलें; आणि तो **कांटर्बरी** सोडून निघतो तोंच **स्काट्लंड**चा राजा **वुइलियम** ह्याला धरून कैद केलें अशी खबर त्याला कळली. मी **इंग्लंड**-च्या गादीचा बंदा नौकर असें कबूल करून सेवांजलिसंस्कार करी तोंपर्यंत त्या **वुइलियमा**ची कैदेंतून मुक्तता झाली नाहीं. **कांट-र्बरी** एथून **हेन्री** त्वरेनें **हंटिंग्डन** एथें गेला, आणि तेथें आ-पल्या बंडखोर बारनांला गांठून त्यांना पुनः आपले बंदे नौकर

हेन्रीचें प्रायश्चित्त आणि जय.

म्हणवावयास त्यानें लावलें. सारांश एका वर्षाहूनही कमी काळांत त्यानें सारें खवळलेलें रान आपल्या मुठींत आणलें.

परंतु इतक्या ह्या व्यवसायांत तो एक गोष्ट शिकला. ती ही कीं, ज्या फौजेवर नेहमीं इतबार ठेवतां येईल अशी **इंग्लिश** फौज आपल्याला अवश्य पाहिजे. म्हणून ११८१ त **फिर्ड** (म्हणजे लष्करी नौकरी) नांवाचा एक **वेस्टसाक्सनां**चा रद्द पडलेला जुना कायदा होता, तो त्यानें पुनः अमलांत आणला. त्या कायद्यानें सारे **फ्रीमेन** (स्वतंत्र माणूस) म्हणून असत त्यांना चिलखतें मिळत, तीं घालून संकट काळीं राजा आणि देश किंवा राज्य ह्यांच्या रक्षणासाठीं नौकरी करूं अशी त्यांना आणभाक करावी लागत असे. ही नौकरी, **फ्यूडल** नौकरी म्हणजे सरंजाम किंवा जाहागीर-ह्या संबंधानें आपल्या धन्याची म्हणून करावयाची नौकरी, हीपासून अगदीं भिन्न होती, आणि आमची **"मिलिशिया"** म्हणजे निरंतर ठेवलेल्या फौजेसारखीच कवाईत शिकवून तयार केलेली परंतु गरज पडेल तेव्हांच मात्र देशाच्या संरक्षणासाठीं बोलवावयाची अशी राष्ट्रीय शिपायांची शिबंदी किंवा फौज म्हणून जी पुढें प्रचारांत आली, तिचा तो पायाच होता. **हेन्रीच्या** आयुष्याचा बाकी राहिलेला काळ मुख्यत्वें देशांतरीं गेला. त्या काळांत त्याच्यामागें **रानुल्फ डि ग्लान्व्हिल्ल** नांवाचा मोठा चतुर **जस्टिशियर** (मुख्य न्यायाधीश) आणि कायदेकानूंत वाकब पुरुष होता तो राज्यकारभार चालवी. **हेन्री इंग्लंडांत** त्यापुढें कधींच आला नाहीं असें नाहीं. तो त्या काळांत चार वेळां **इंग्लंडांत** आला होता. ह्याच काळाच्या सुमारास जुना **लंडन ब्रिज** (पूल) म्हणून जो **टेम्स** नदीवर पहिला दगडी पूल होता तो

मिलिशिया (शिबंदी) नांवाची फौज बनविली, ११८१.

बांधण्याची सुरवात झाली. तो पूल आमच्या हालींच्या काळापर्यंत होता. मात्र तो १८२४ त पुनः बांधला.

अजूनही **हेन्रीच्या** पुत्रांनी त्याला फार ताप दिला. शेवटीं सर्वांत वडील दोघे **हेन्री** आणि **जिफ्री** हे वारले. पहिला ११८३ त आणि दुसरा ११८६ त. **रिचर्ड** आणि **जान** हे दोघे काय ते बाकी राहिले. **रिचर्डानें**, आतां अशक्त होत चाललेल्या आपल्या बापाला **फ्रान्स** देशाचा **फिलिप** ह्याच्या कुमकेनें **टूरेन** प्रांतांतून पिटून लावलें. मग, अंतःकरणापासून कंटाळलेला, आणि तापानें बीमार असतां, **हेन्रीनें**, आपल्याविरुद्ध संगनमत करून कूट करणाऱ्या लोकांची यादी पाहवयास मागितली, आणि त्या यादींत आपला परमप्रीतींतला पुत्र **जान** ह्याचें डोकीवरच नांव त्यानें पाहिलें तेव्हां तो म्हणाला "आतां सर्व गोष्टी कशा चालतील तशा चालोत, मी तर ह्यापुढें स्वतःविषयीं किंवा दुनियेविषयीं तिळमात्र काळजी करणार नाहीं." त्यानंतर तो दोन दिवसांनीं मरण पावला. **इंग्लंडाला** तर तो खरा किंवा अन्वर्थक लोकपाल आणि कायदे-देणारा होता. त्यानें **इंग्लिश** लोकांना शांतिसुख आणि न्याय दिला, आणि आमच्या काळापर्यंत टिकले आहेत असे चांगले कायदे केले.

हेन्रीचा मृत्यु, ११८९.

रिचर्ड कूर डि लीऑं (सिंहहृदय), ११८९–११९९.

हेन्रीच्या पश्चात् **रिचर्ड** गादीवर बसला. तो मोठा बहादर शिपाई होता. एवढ्या एका गुणाखेरीज इतर सर्व गुणांनीं तो आ-

पल्या बापाच्या विपरीत होता. त्याचें जन्म इंग्लंडांत झालेलें होतें तरी, त्याला दोघे वडील भाऊ होते म्हणून, त्याचा विद्याभ्यास व शिक्षण, त्याला आक्विटेनचा डयूक करावयाच्या घाटानें परदेशीं झालेलें होतें. त्याला एक देखील इंग्लिश वाक्य बोलतां येत होतें किंवा नाहीं, ह्या गोष्टीचा संशयच आहे, आणि आपल्या दहा वर्षांच्या कारकीर्दींत तो दरवेळेस थोडे थोडे महिने राहण्याकरितां म्हणून अवघा दोनच वेळ काय तो इंग्लंडांत आला होता.

रिचर्ड हा इंग्लंडाला राजा म्हणून नव्हता.

तो, मोठा हिम्मतदार व सरदारबहादर, परंतु नीच आणि द्रव्यलोभी, जन्मतःच शिपाई, कळकळीचा मित्र परंतु भयंकर शत्रु, आपल्या प्रजेविषयीं निष्काळजी परंतु धर्माविषयीं अत्यंत आस्थेवाईक, असा होता. त्यानें क्रूसेड्स (धर्मयुद्धां) मध्यें उमदेपणाचें वर्तन केलें, आणि इंग्लिश लोक त्या संबंधानें त्याविषयीं मोठा गर्व वाहत. परंतु इंग्लिश इतिहासांत तो ना जमेत ना खर्चांत असा होता, म्हणजे लिहिण्यासारखी त्याच्या हातून एकही गोष्ट झाली नाहीं. त्याचा लेखा न करतां त्या इतिहासाचा प्रवाह चालू होता.

त्याला ११८९ त सेप्टेंबरच्या ३ ऱ्या तारखेस राज्याभिषेक झाला. तेव्हां हातीं लागतील ते सर्व सरकारी हुद्दे, पदव्या, धर्मसंबंधाच्या आणि राजाच्या खासगत जमिनी, एकदम विकण्याचा त्यानें क्रम सुरू केला. आपल्या धर्मयुद्धासाठीं पैसा मिळवावा ह्या हेतूनें स्काट्लंडच्या राजावरचें आपलें धनीपणाचें वर्चस्व देखील त्यानें विकलें. तो एकदा म्हणाला "जर कोणी विकत घेणारा मिळेल तर मी लंडन देखील विकीन." नंतर, फ्रान्स देशचा राजा फिलिप हा पुण्यभूमीस (पालिस्टाइनास) चालला होता,

रिचर्ड मोठ्या पदवीच्या असाम्या विकतो.

त्याला जाऊन मिळण्याकरितां तो डिसेंबर महिन्यांत **इंग्लंड** सोडून निघाला, आणि आपल्यामागें राज्यकारभार चालविण्यास आपली आई **एलिनोर**, आणि **लांगशांचा वुइलियम** नांवाचा आपला **जस्टिशियर** (मुख्य न्यायाधीश), ह्या उभयतांस त्यानें ठेवलें. तो **वुइलियम** नीच कुळांत जन्म पावलेला असून, त्यानें **चान्सेलर** (पंडितराव) हा हुद्दा द्रव्य देऊन विकत घेतला होता. सुदैवानें, **रिचर्डा**च्या बापाचे चांगले कायदे ह्यांनींच खरोखर राज्याचा कारभार सुरळीत चालला. कोणीं माणसांनीं तो चालविला असें नाहीं. **लांगशां** ह्यानें अवघीं दोनच वर्षें कारभार केला. कारण, बारन लोक त्याचा द्वेष करीत, आणि ११९१ त जेव्हां **एलिनोर** राणी **सिसिलीस** गेली, तेव्हां **राजपुत्र जान** ह्यानें **लंडन** एथील लोकांच्या मदतीनें आणि मर्जीनें, त्याला **जस्टिशियर**च्या अधिकारावरून काढलें. मग तो **नार्मंडीस** पळून गेला. **लंडनचा लार्ड मेयर** (कोतवाल, नगराध्यक्ष) नांवाचा अधिकारी आम्हांस मिळाला त्याबद्दल हजार हिरशांनीं आम्ही **राजपुत्र जान** ह्याच्या ह्या कृतीचेच ऋणी आहों; कारण **जानानें**, **लंडन** नगरवासीजनांना एक प्रतिफल किंवा बक्षीस म्हणूनच त्यांची "**काम्म्युना**", म्हणजे स्थानिक राज्यकारभार करणारें मंडळ, ह्याच्या मान्यतेविषयीं शपथ घेतली, आणि त्यांना त्यानें पहिल्यानेंच "**मेयर**" (कोतवाल, नगराध्यक्ष) नांवाचा अधिकारी नेमून दिला, आणि त्याला त्या नगरांत बहुतेक राजाच्या बरोबरीची सत्ता दिली. **हेन्री फिट्झ-आल्वुइन** हा **लंडनचा** पहिला **मेयर** होता, आणि तो पुढें २३ वर्षांनीं मेला तेव्हां,

लांगशां ह्याला पदच्युत केलें, ११९१.

लंडनचा पहिला मेयर, ११९१.

जान हा राजा झालेला होता, त्यानें लंडन-नगरवासी लोकांना आपला आपण पसंत करून मेयर नेमण्याचा अधिकार द्रव्य घेऊन विकत दिला.

दरम्यानच्या वेळांत, लांगशां हा लोकांना अप्रिय आहे असें रिचर्डानें ऐकलें होतें, तेव्हां त्यानें दुसरा जस्टिशियर नेमून पाठवला. इतक्यांत एलिनोर राणी सिसिलीहून परत आली, आणि जानाला गादी बळकाविण्याची इच्छा झालेली होती, तथापि त्याला निमूटपणें राहणें भाग आलें. वेळोवेळीं पुण्यभूमींतून राजा रिचर्ड ह्याच्या पराक्रमाच्या खबरा येत होत्या. शेवटीं एके दिवशीं इंग्लिश लोकांनीं वार्ता ऐकली कीं, राजा रिचर्ड हा स्वदेशीं माघारा येत असतां मार्गांत त्याला आस्ट्रियाचा ड्यूक ह्यानें पकडून जर्मनीच्या बादशाहास विकले, ह्यास्तव त्याला खंडणी देऊन सोडविण्यासाठी आपणांस द्रव्य पुरविलें पाहिजे. एक लक्ष पौंडांची रकम द्यावयाला पाहिजे होती. ती उत्पन्न होण्याकरितां, प्रत्येक माणसाला आपल्या दरसालच्या प्राप्तीचा आणि जिंदगीचा चतुर्थांश द्यावा लागला, आणि त्याशिवाय दुसरे चार प्रकारचे कर द्यावे लागले. जर्मनीच्या बादशाहाला, खंडणी न घेतां रिचर्डाला कैदेंत ठेवण्यास प्रवृत्त करण्याविषयीं जानानें विश्वासघातानें प्रयत्न केला, परंतु तो सिद्धीस गेला नाही. खंडणी दिली, आणि रिचर्ड मुक्त होऊन येऊन ११९४ त मार्चच्या २० व्या तारखेस सांडवुइच एथें जमिनीवर उतरला. ह्या दुसऱ्या खेपेस तो इंग्लंडांत चार महिने राहिला होता; तो वेळ त्यानें परदेशांतील आपल्या युद्धांच्या खर्चाकरितां पैसा उत्पन्न

रिचर्डाची खंडणी देऊन सोडवणूक, ११९४.

रिचर्ड दुसऱ्यानें इंग्लंडांत येतो, मार्च—मे, ११९४.

करण्यांत घालविला. कैदेंतून सुटल्यानंतरचा म्हणून **आर्चबिशपाचा** आशीर्वाद त्याला मिळाला, आणि तदनंतर तो मे महिन्यांत **नार्मंडीस** गेला, तो पुनः कधींच परत आला नाहीं. त्यानें **जानाच्या** जमिनी आणि किल्ले मात्र काढून घेतले, परंतु इतर प्रकारांनीं म्हटलें म्हणजे **जानाच्या** नीच विश्वासघातकीपणाबद्दल त्याला उदारपणानें क्षमाच केली.

पुढील चार वर्षें पर्यंत **ह्यूबर्ट वाल्टर** आणि **जिफ्री फिट्झ–पीटर** ह्या दोघां विश्वासू **जस्टिशियरांनीं** देशाचा राज्यकारभार चालविला. त्यांनीं **रिचर्डला** लागणाऱ्या पैक्याच्या जबर रकमा त्यांच्यानें होईल तितक्या न्यायानें वसूल केल्या. ह्या गोष्टीपासून एक हित झालें. देशांत कांहीं धामधूम नसल्यामुळें लोक शांतिसुखांत होते, त्यामुळें, आपणांवर इतके भारी कर राजाला बसवूं देणें ही शाहणपणाची गोष्ट कीं काय, असा लोक विचार करूं लागले; म्हणून त्या दोघां **जस्टिशियरांना** पैसा उत्पन्न करते वेळीं लोकांच्या कायदेशीर सभा जमवाव्या लागत.

बिशप परदेशांत चालविलेल्या युद्धांकरितां पैसा देण्याचें नाकारितात.

साल्झबरी आणि **लिंकन** एथील दोघां **बिशपांनीं** तर, परदेशांत चालविलेल्या युद्धांकडे खर्च करण्यासाठीं धर्मसंबंधाच्या आमच्या जमिनींबद्दल आम्ही पैसा देत नाहीं, म्हणून एकदा साफ सांगितलें, आणि राजानें कोणते कर घ्यावे हें ठरविण्यांत राष्ट्रांतील लोकांचें कांहीं तरी मत अवश्य असलें पाहिजे हा विचार दिवसेंदिवस वाढूं लागला.

शेवटीं, **लिमोझच्या** नजीक **शालूस** नांवाच्या किल्ल्यास वेढा घातला असतां, तेथें झालेल्या तीराच्या जखमेनें ११९९ त एप्रि-

लच्या ६ व्या तारखेस **रिचर्ड** मरण पावला, ही खबर अकस्मात् आली. ज्या मनुष्यानें त्याला तीर मारला होता, त्याला त्या अपराधाची त्यानें क्षमा केली, परंतु **रिचार्डोच्या** मृत्यूनंतर त्याचा हुकूम मानला नाहीं, आणि त्या मनुष्याला क्रूरपणानें ठार मारलें. **रिचर्ड** जसा जन्मभर शौर्याचीं कामें करीत होता, तसाच शौर्यानें त्यानें देह ठेवला.

रिचर्डोचा मृत्यु, ११९९.

जान, ह्याला सान्स्टेर किंवा लाक्लांड (वगरजमीनजुमला) असें उपपद होतें, ११९९–१२१६.

ज्या एका **इंग्लिश** राजाविषयीं चांगलें म्हणून कांहींच सांगतां येत नाहीं, त्या राजापर्यंत आतां आपली मजल आली. त्या राजाची कारकीर्द **इंग्लंडाला** फारच महत्त्वाची होती, कारण तो इतका वाईट होता कीं, त्यामुळें साऱ्या राष्ट्रांतील प्रजा जागृत होऊन न्याय आणि हक्क हे आम्हांस मिळालेच पाहिजेत म्हणून खणपटीस बसली. **जान** निवळ पाजी आणि आपलपोट्या होता. तो रूपानें सुंदर, स्वभावानें आनंदी, आणि सुशिक्षित, असा असून, त्याच्यामध्यें बुद्धिसामर्थ्य होतें. परंतु तो निर्दय, दुराचारी, द्रव्य-लोभी, आणि विश्वासघातकी असून, आपल्या स्वतःवांचून दुसऱ्या कोणाचीही फिकीर करीत नसे. त्यानें आपला बाप आणि आपला भाऊ ह्यांचा विश्वासघात केला, आणि राजा ह्या नात्यानें, तो आपला पुतण्या, आपले लोक, आणि खुद्द आपलें राजकीय वचन, इतक्यांला खोटा पडला.

जानाचे गुणदोष.

रिचर्ड मरण पावला तेव्हां **जान** त्याच्याबरोबरच होता. तेव्हां जे बारन तेथें होते, त्यांपासून तो धनीपणाचा मानपान पावला. **इंग्लंडांत** गादीकरितां त्याची निवडणूक कांहींच अडचण न पडतां झाली, कारण, **जिफ्रीचा ब्रिट्टनीचा आर्थर** नांवाचा मुलगा वयानें फक्त १२ वर्षांचा होता, आणि **इंग्लंडांत** कोणींच गंभीरपणानें त्याचा पक्ष स्वीकारून त्याला पाठबळ दिलें नाहीं. परंतु **फ्रान्स** देशांत वेगळा प्रकार होता. **नार्मंडी, प्वाटू,** आणि **आक्विटेन,** ही कांहीं प्रयासानें **जानाच्या** हस्तगत झालीं. परंतु **आंजूचा** खरा **कौंट** म्हटलें म्हणजे **आर्थर** हा होता, ह्यास्तव **आंजू, मेन,** आणि **ब्रिट्टनी,** ह्या तिन्ही संस्थानांतील लोक त्याचा बचाव करण्याला उभे राहिले. वृद्ध **राणी एलिनोर** ही आतां वयानें ८० वर्षांची झालेली होती, तिनें **जानाचा** पक्ष धरला; आणि **फ्रान्स** देशाचा राजा **फिलिप, आर्थराचा** पक्ष धरून त्याच्याकरतां लढूं लागला. तेव्हां तें युद्ध धरसोडीनें तीन वर्षेंपर्यंत चाललें. शेवटीं, **राजपुत्र आर्थर** ह्यानें **प्वाटू** प्रांतांतील **मिराबेल** नांवाच्या किल्ल्यांत आपली आजी **एलिनोर** हिला वेढा घातलेला होता, तेव्हां **जानानें** त्याचा पराभव करून त्याला धरून कैद केलें.

आर्थर आणि फ्रान्सदेश ह्यांशीं युद्ध.

नंतर एक घोर कर्म झालें, त्यानें आतांदेखील आमचें आंग थरारतें. **आर्थर** हा त्या वेळीं वयानें १५ वर्षांचा होता. त्याला **रूआंग्** एथील नव्या किल्ल्यांत कैदेंत ठेवलेलें होतें, तथापि **इंग्लंडच्या** गादीवरील आपला हक्क सोडून देण्यास त्यानें बेधडक नाकारिलें. त्या वेळेपासून तो पुनः कधींही दृष्टीस पडला नाहीं, एकदम गडप्प झाला. कविराज **शेक्स्पीयर** ह्यानें

आर्थरचा खून, १२०३.

त्या शूर तरुण राजपुत्राच्या लाजिरवाण्या खुनाचें वर्णन केलेलें वाचून क्रोधानें आणि दयेनें आमच्या अंगावर शिरशिरी येते. परंतु जें काय सारें खरें म्हणून आम्हांला कळलें आहे तें इतकेंच कीं, साऱ्या यूरोपभर, जानानें त्या कुमाराचा खून केला अशी कुणकूण ज्यास्ती ज्यास्तीच मोठी होत गेली. हा आरोप खरा होता ह्याविषयीं कांहींच संशय दिसत नाहीं. जानाच्या भोगवट्याला जो फ्रान्स देशांतला मुलूख होता, तो, त्याचा नौकर किंवा पदरचा जाहागीरदार ह्या नात्यानें फ्रान्सचा राजा फिलिप ह्याकडून चालत होता. म्हणून त्या राजानें, आपल्या राज्यांतले त्याचे समानस्कंध किंवा बरोबरीचे जाहागीरदार ह्यांच्यासमोर येऊन त्या खुनाच्या दोषारोपापासून आपली सफाई करून घेण्यासाठीं जानाला अधिकारानें बोलावलें. परंतु जानानें येत नाहीं म्हणून साफ सांगितलें. तेव्हां जानाचा फ्रान्स देशांतला सारा मुलूख गुन्हेगारीदाखल खालसा झाला, म्हणून फिलिपानें ठराव केला. तेव्हां त्या मुलुखांतले बारन लोक जानावर उलटले. त्याची आई वारली, आणि शेवटीं इंग्लिशखाडींतील बेटांखेरीज (नकाशा नंबर ३ पहा.) बाकी सारा फ्रान्स देशाच्या उत्तरेकडील आपला मुलूख जानानें गमावला. फ्रान्सच्या दक्षिणेकडे दूर, त्याच्या आईच्या गास्कनींतील जमिनी, आणि आक्विटेनचा लहानसा भाग, एवढेंच काय तें त्या देशापैकीं त्याला उरलें. त्यानें नार्मंडी आणि आन्जू हीं दोन्ही परत मिळविण्याविषयीं कित्येक प्रयत्न तर खरोखर केलेच, परंतु ते निष्फल झाले. ह्या प्रकारें, इंग्लंडची गादी मिळविण्यासाठीं त्यानें जो खून केला, त्या योगें, आपल्या पूर्वजांचा वारशानें प्राप्त झालेला सारा मुलूख एका मोठ्या

नार्मंडी आणि आंजू, हे प्रांत गमावतात.

झडपेंत त्यानें गमावला. त्याच्या त्या नुकसानापासून इंग्लंडचा फायदा झाला. त्या काळापुढें, इंग्लंडचे राजे आणि बडे लोक सारे त्या एकट्या इंग्लंडचे असे झाले. ते त्यापुढें इंग्लंडच्या खर्चानें लढाया करून परदेशांत राहूं शकले नाहींत. त्यांना आपलें घरदार, किंवा निरंतर राहण्याचें ठिकाण, आणि आप्तइष्ट, इंग्लिश लोकांमध्यें करावे लागले.

असें असतांही, जान लवकरच एका नवीन कलहांत गुंतला. गेल्या पांच सालांत आर्चबिशप ह्यूबर्ट ह्यानें चान्सेलरच्या नात्यानें राष्ट्राचें बरेंच हित केलें होतें. परंतु तो १२०५ त वारला.

स्टीफन लांग्टन ह्याची आर्चबिशपाच्या जाग्याकरितां निवडणूक.

तेव्हां जान हा कोणीतरी आपल्या कृपेंतली असामी त्या जागेवर नेमण्याकरितां पसंत करील हें त्यांना ठाऊक होतें, म्हणून कांटर्बेरी एथील मंकांनीं (जोग्यांनीं किंवा मठवासी ह्यांनीं) गुप्त रीतीनें एक आर्चबिशप निवडून पसंत केला. जानाला ते वर्तमान कळलें तेव्हां, त्यानें त्या मंकांपैकीं कित्येकांकडून जुलमानें दुसरा एक आर्चबिशप पसंत करविला. मग त्या दोघांही आर्चबिशपांनीं त्या वेळीं तिसरा इन्नोसेंट नांवाचा पोप होता त्याकडे अर्ज केला. परंतु त्या पोपानें, त्या उभयतांनाही एका बाजूस ठेवून, त्या वेळी सहा मंक रोम एथें त्याची सल्ला मसलत घेण्यासाठीं खुद्द गेलेले होते त्यांकरवीं, स्टीफन लांग्टन नांवाचा एक चांगला प्रामाणिक पुरुष त्या वेळीं रोम शहरांत होता व तो तशांत इंग्लिश कार्डिनल (रोमन क्याथलिक पंथांतील एक धर्माधिकारी) होता, त्याला कांटर्बेरी एथील आर्चबिशपाच्या जाग्याकरितां पसंत करविलें. जानानें त्या लांग्टनाला इंग्लंडांत कधींही घेणार नाहीं म्हणून सांगून पाठ-

विलें, आणि तो तो हट्ट सोडीना, तेव्हां त्या **पोपानें** १२०८ त त्या साऱ्या **इंग्लंडच्या** राज्याला **"इंन्टर-डिक्ट"** (द्राही, दुराही) घातली. म्हणजे धर्माधिकाऱ्यांना, देवळांत लोकांचीं लग्नें लावण्याची, देवळाभोंवतालच्या स्मशानभूमींत मृतांना पुरण्याची, किंवा **बाप्टिस्मल सर्व्हिस** (धर्मनिवेशनार्थ जलसंस्कार संबंधीं उपासना), व मृतांसाठीं प्रार्थना, ह्या दोहोंशिवाय देवळांत उपासनापर लेख वाचण्याची, त्यानें मनाई केली. त्या दुराहीमुळें चार वर्षें एवढ्या दीर्घ कालापर्यंत, कोणत्याही भजनमंदिरांतील घांट वाजली नाहीं, भजनमंदिरांत प्रार्थना किंवा उपासना म्हणून कसली ती झाली नाहीं, आणि मृतांची प्रेतें उपासनेवांचून खंदकांत आणि कुरणांत पुरलीं.

इंग्लंडावर पोपाची द्राही, १२०८.

हें फारच दुष्टपणाचें कृत्य होतें, कारण ताप भोगला काय तो लोकांनीं, आणि आपण नेमलेला **आर्चबिशप** त्या देशावर जुलुमानें लादण्याला **पोपाला** बिलकूल अधिकार नव्हता. परंतु त्या गोष्टीची **जान** परवाच करीत नव्हता. त्यानें, बिशपांच्या आणि तदितर धर्माधिकाऱ्यांच्या मालमत्ता हिरावून घेऊन, त्यायोगें उत्पन्न झालेलें द्रव्य **आयर्लंड, स्काटुंड** आणि **वेल्स** ह्या देशांत चालविलेल्या युद्धांकडे खर्च करून फक्त आपला सूड उगविला. नंतर १२०९ त **पोप इन्नोसेट** ह्यानें, **जानाला** धर्मबहिष्कृत केलें, आणि त्याची नौकरी कोणीही करूं नये अशी दुराही घातली. तथापि देखील **जानानें** कांहीं परवा केली नाहीं, परंतु जे कोणी **पोपाच्या** आज्ञेनुसार वर्तन करीत त्या सर्वांना तो उलटा शिक्षा करी. **नारिच** एथील एका **आर्चडीकनानें** त्याचा हुकूम ऐकत नाहीं म्हणून सांगितल्याबरोबर,

जानाला धर्मबहिष्कृत केले, १२०९.

त्याला एका दरवाज्यावरील शिशाच्या कमानीखालीं कोंबून ठेवलें. जेव्हां त्याच्या बारनांनीं त्याच्या दरबारीं जाण्याचें सोडून दिलें, तेव्हां त्यानें त्यांचे किल्ले जप्त केले, व त्यांच्या मुलांबाळांना पकडून नेलें, आणि त्यांच्या बायका व मुली ह्यांना त्यानें लाजिरवाणेपणानें वागविलें. शेवटीं १२१२ त पोपानें, जानाला पदच्युत केलें आहे, अशी जाहिरात प्रसिद्ध केली, आणि फ्रान्सचा फिलिप ह्याला इंग्लंड जिंकून सर करावें असा हुकूम केला.

पोप जानाला पदच्युत करतो, १२१२.

तेव्हां शेवटीं जानाचे डोळे उघडले, आणि खुद्द आपलें कांहीं तरी ह्यांत नुकसान होणार म्हणून त्याला तळमळ उत्पन्न झाली. त्याच्या प्रजेचें त्यावर प्रेम असतें तर त्यानें पोपाला आणि फिलिपाला जुमानलें नसतें, परंतु सर्व लोक त्याच्या गुन्ह्यांबद्दल त्याचा अति द्वेष करीत असत. आसेन्शन डे (खिस्ताच्या स्वर्गारोहणाचा दिवस), हाच जानाच्या राज्याभिषेकाचा प्रतिवार्षिक दिवस होता, त्या दिवसाच्या पूर्वी जानाची कारकीर्द संपेल असें कोणी भाकीत केलें होतें तें ऐकून पामरासारख्या दहशतीनें, त्यानें लांग्टनाला आर्चबिशप म्हणून सत्कारानें पत्करलें; एवढेंच नाहीं, परंतु पोपाचा पान्डल्फ नांवाचा लेगेट (वकील) होता त्याच्या इंग्लिश राजमुकुट वस्तुत: स्वाधीन करून, पोपाचा मी ताबेदार बंदानौकर म्हणून मान्यता देऊन त्याच्या हातून पोपाची ही मला देणगी म्हणून तो परत घेतला. ह्या जानाच्या कृतीनें पुढें, इंग्लिश राजे आणि पोप ह्यांच्या दरम्यान फार काळापर्यंत चालू राहणारा झगडा उत्पन्न झाला, तो तीनशेंहूनही ज्यास्त वर्षें पर्यंत टिकला.

जान शरण जातो आणि पोपाचा बंदानौकर होऊन राहतो, १२१२.

परंतु लांग्टनालों पत्करण्यानें जानानें खुद्द आपणावर तात्कालिक संकट आणून घेतलें. दुसरा हेन्री आणि रिचर्ड ह्यांच्या निवांतपणाच्या कारकीर्दींत पुष्कळ वर्षेपर्यंत सारी इंग्लिशशाई पूर्वींहून बळकट होत चालली होती. शहरांतून नगरवासी जन, जेव्हां शहरची घंटा एकत्र जमण्यास पाचारण करी तेव्हां एकत्र जमून मोकळेपणानें परस्परांत बोलून वाद प्रतिवाद करीत. व्यापान्यांच्या सनदी मंडळ्या व्यापारसंबंधी कायदे कानू ठरवीत, कारिगरांच्या श्रेणी (सनदी मंडळ्या) कारिगरलोकांचें जुलुमापासून रक्षण करीत, आणि, राजांना पैशाची जरूर पडली म्हणजे तो पुरवून लोक पुष्कळ नवे नवे हक्क विकत घेत. आणखी युनिव्हर्सिट्यांत (पाठशालामंडलांत) विद्यार्थी, इंग्लिश आणि नार्मन, आयरिश आणि वेल्श, बडे लोक आणि शेतकरी, असत, ते सारे मित्रांसारखे आणि समान दरज्याचे असें समजून एकत्र जमत. खेड्यापाड्यांतूनदेखील पोटजाहागीरदाराचीं आपल्या धनी-जाहागीरदाराशीं कर्तव्यें हीं आतां कायद्यानें निश्चित झालीं. तेणेंकरून त्यां प्रत्येकांला कांहीं हक्क म्हणून प्राप्त झाले. जमीन खाऊन नौकरी करावी अशा मुळच्या संबंधाचा शेतकरी हा, वारंवार नौकरीपासून खुला असे; कारण तो धन्याची कामगिरी बजावण्याबदली त्याला ठरलेली रकम देई. सारांश, आतां सामान्य लोकांनीं आणि बारनांनीं एकाद्या जुलुमी राजाविरुद्ध एकमतानें उद्योग करण्यास प्रवृत्त होण्यापुरती सारी शाई पहिले भेद मोडून एक झालेली होती.

लोकांचें सामर्थ्य दिवसानुदिवस वाढतें.

राष्ट्रांतील लोकांना फक्त अग्रेसर अथवा मार्ग दाखविणारा ना-

यक पाहिजे होता. तो त्यांना **लांग्टन** हा मिळाला. १२१३ त आगस्टच्या ४ थ्या तारखेस, ज्या बिशपांना **जानानें** लुटलें होतें, त्यांना नुकसान म्हणून काय दिलें पाहिजे हें ठरविण्यासाठीं बिशप, बारन, आणि शहरवजा कसब्यांचे शेरिफ्फ, ह्यांचें एक विचार करणारें मंडल जमविलें. त्या समयीं **जिफ्री फिट्झ–पीटर** नांवांचा **जस्टिशियर** ह्यानें बारनांना सांगितलें कीं, **पहिल्या-हेन्रीचे** कानू मानून त्यांप्रमाणें **जानानें** चाललें पाहिजे असा आग्रह धरून त्याकडून तसें चालवयास लावण्याचा तुम्हांला हक्क आहे, ह्यास्तव, जर **जानाच्या** जुलुमाला तुम्ही वश झालां तर तो तुमचा दोष आहे. पुढें कांहीं आठवड्यांनीं **सेन्ट पाल** नांवाच्या भजनमंदिरांत दुसऱ्यानें एक तसेंच मंडल जमविलें, त्यांत **स्टीफन लांग्टन** ह्यानें **पहिल्या-हेन्रीनें** दिलेला **चार्टर** (सनद) हाजीर केला, त्यांत त्या **जस्टिशियरानें** सांगितलेले कानू दाखल केलेले होते. नंतर **फिट्झ-पीटर** ह्यानें त्या दोन्ही मंडलांचीं मागणीं राजापुढें ठेवलीं. दुर्दैवानें त्याच वेळेस तो **फिट्झ–पीटर** वारला, आणि **जानानें**, एक आपला परदेशीय मित्र होता, त्याला त्याच्या जागीं **जस्टिशियर** केलें. तथापि **आर्चबिशप लांग्टन** ह्यानें आरंभिलेली झुंज पुढें चालविली. इतक्यांत उत्तर आणि दक्षिण ह्या उभय दिशांकडील बारनांनीं **जानाकडून** हक्कांच्या **चार्टरावर** (सनदेवर) सही करवून घेऊं, नाहीं केली तर त्याच्यावर शस्त्र धरून लढाईस उठूं, अशी **एड्मंड्स्बरी** एथें गुप्त शपथ घेतली. पुढें त्यांनीं १२१५ च्या जान्युअरी महिन्यांत आपलीं हक्कांविषयीं मागणीं **जान** राजापुढें मांडलीं.

बारन लोक एक चार्टर (सनद) मागतात.

असें एकाएकीं गोठल्यामुळें जानानें ईस्टर (ख्रिस्त एकवेळ मरून पुनः ज्या दिवशीं जीवंत झाला तो दिवस, हा बहुशः एप्रिल महिन्यांत पडतो) पर्यंत विचार करण्यास फुरसत मागितली, आणि तीन महिन्यांचा जो अवकाश मिळाला तो, त्या बारनांना कोण-कोणते हक्क होते ते समजून घेण्यांत न घालवितां, गुप्तपणें मजुर-दार शिपाई चाकरीस ठेवण्यांत, आणि धर्मयुद्धास जाणाऱ्या लो-कांत आपलें नांव नोंदविण्यांत त्यानें घालविला. असें नांव नोंद-विण्यांत त्याचा हेतु हा होता कीं, धर्माच्या संरक्षणासाठीं जाणाऱ्या माणसाशीं लढणें हें पाप आहे अशा समजानें आपणावर शस्त्र ध-रून ते बारन आपणाशीं लढणार नाहींत. परंतु ते बारन आरं-भिलेल्या कार्याविषयीं इतक्या खऱ्या कळकळीनें उद्युक्त झालेले होते कीं, त्यांनीं तें पाप बिलकूल मनांत आणलें नाहीं. ते त्यावर शस्त्र धरून उठले, आणि साऱ्या राज्यांतले लोक त्यांना मिळाले. तेव्हां आतां आपली धडगत नाहीं, कांहीं आशा उरली नाहीं, असें जानाच्या लक्ष्यांत आलें. नंतर बहुशः अगदीं एकटा, बरोबर फक्त सात इमानी **नाइट** (सरदार) अ-सून, तो **वुइन्ड्सरच्या** नजीक **टेम्स** न-दीच्या कांठीं **रन्निमीड** नांवाच्या ठिकाणीं, त्या बारनांना भेटला, आणि १२१५ सालीं जूनच्या १५ व्या तारखेस, अत्यंत नाराजीपणानें **"माग्ना कार्टा"** किंवा **धि ग्रेट चार्टर** (मोठी सनद) ह्या नांवाच्या सनदेवर त्यानें आपली सही केली. त्या सनदेनें त्या दिवसापासून आमच्या ह्या हालींच्या काळापर्यंत **इंग्लिश** लोकांचीं स्वातंत्र्यें सुरक्षित ठेवलीं आहेत. **ह्या मोठ्या चार्टरांतील** बहुतेक कानू नवे नव्हते, आणि ते त्याच्या पूर्वींच्या दुसऱ्या चार्टरांत होते. त्यांत दोन मुख्य क-

जान धि ग्रेट चार्टर नावाच्या सनदेवर सही करतो, १२१५.

लमें होतीं तीं हीं, (१) राजाला आपल्या प्रजाजनांना मर्जीस येईल त्याप्रमाणें कैदेंत ठेवण्याचा आणि शिक्षा करण्याचा अधिकार नाहीं, परंतु प्रत्येक माणसाचा, त्याच्या बराबरीच्या माणसांनीं चौकशी करून, न्याय केला पाहिजे; (२) राजानें बिशप, अर्ल, आणि बडे व छोटे बारन, ह्यांच्या अनुमतावांचून कर बसवूं नयेत. त्या चार्टरांतील बाकीच्या कलमांनीं मुख्यत्वेंकरून जुने हक्क उजरले किंवा ताजे केले. तथापि त्या चार्टराच्या योगें जी अत्यंत महत्त्वाची म्हणून गोष्ट साधली ती ही कीं, पूर्वीचे इतर चार्टर म्हटले म्हणजे राजांना राज्याभिषेक होतांना अमुक कायद्यांना अनुसरून आम्ही प्रजापालन करूं असे त्यांनीं केलेले केवळ प्रतिज्ञावाद होते, परंतु हा चार्टर, एका दुष्ट दुराचारी राजापासून त्याच्या प्रजेनें बलात्कारानें करून घेतलेला करारनामा किंवा तहनामा होता. आतां राजानें, व तसेंच त्याच्या प्रजेनेंही, कायद्यांला अनुसरून वर्तन केलेंच पाहिजे, आणि दुसऱ्यांच्या हक्कांचा मान राखून त्यांना धका लागूं देतां कामा नये, ह्या प्रकारचा आग्रह धरून तसें करविण्यापुरतें राष्ट्रांतील प्रजेच्या आंगीं सामर्थ्य आलेलें होतें. आपले व तसेच इतर लोकांचे हक्क पुरे अमलांत आणण्याविषयीं बारनांनीं इतका दृढनिश्चय केलेला होता कीं, त्यांच्यापैकीं पंचवीस जणांना, राजानें दिलेलीं वचनें बरोबर पाळलीं जातात किंवा नाहीं हें पाहण्याला, मुजरत नेमलें होतें, आणि राजानें तीं मोडलीं तर त्याचे खासगी किल्ले आणि जमिनी जबरदस्तीनें घेण्याचा त्यांना अधिकार दिला होता.

धि ग्रेट चार्टर ह्यापासून झालेलीं हितें.

जानाच्या मनांत आपलें वचन पाळावयाचें नव्हतें, ही सा-

हजिकच गोष्ट होती. तो बारनांना बयादा सांगून झुलवीत होता, आणि एकीकडे आपली परदेशीय फौज एकत्र जमवीत होता, आणि आपणाला मदत करावी म्हणून त्यानें पोपाला अर्ज केला होता. शेवटी राजा आणि त्याचे बारन ह्यांच्या दरम्यान आपआपसांतलें युद्ध चालू झालें, त्यांत जानानें कित्येक जय मिळविले, आणि इंग्लंडच्या उत्तरेकडील भागांत तर, जें पुढें येईल तें सारें त्यानें जाळून नासून टाकलें. मग शेवटीं, त्याच्या विश्वासघातकीपणानें चवताळून, त्या बारनांनीं, फ्रान्स देशच्या राजाचा वडील मुलगा लूइ ह्याला इंग्लंडांत येऊन आमचें राजपद स्वीकारावें म्हणून बोलावणें केलें. त्याप्रमाणें तो मोठें सैन्य समागमें घेऊन आला. परंतु पुढे थोड्याच महिन्यांनी इंग्लंडाला मृत्यूनें त्या जुलुमी राजापासून सोडविलें. लिंकनशायरांतील दलदलीच्या प्रदेशांत वाश नांवाची नदी ओलांडीत असतां, जानानें आपलें सामानसुमान, जवाहीर, आणि आपल्या प्रजेपेक्षांही आपल्या अंतःकरणाला अतिप्रिय जो आपला मुकुट, तोही गमावला. दुसऱ्या दिवशीं, स्वाइन्सहेड नांवाच्या मठांत त्याला दुखणें आलें, तथापि तें रेंटून तो तसाच पुढें गेला, आणि हेन्री आणि रिचर्ड ह्या नांवांचे दोघे अल्पवयस्क पुत्र, आणि आपआपसांतील युद्धांत मग्न व परदेशीय सैन्यानें व्याप्त असा स्वदेश, मागें ठेवून, तो १२१६ त आक्टोबरच्या १९ व्या तारखेस न्यूआर्क एथें मरण पावला.

जान आणि बारन ह्यांच्या दरम्यानचें युद्ध.

लूइ फौजेनिशी येतो.

जानाचा मृत्यु, १२१६.

भाग ३.

इंग्लिश पार्लमेंटाची उत्पत्ति

मोठ्या चार्टराच्या काळापासून लांकास्टरच्या घराण्याच्या काळापर्यंतचे राजे.

जान
(७६ व्या पृष्ठावरील वंशावळ पहा).

तिसरा हेन्री,
ज. १२०७, मृ. १२७२,
का. १२१६–१२७२,
ल. प्रोव्हॅन्सची एलिनॉर हिच्याशीं

- **पहिला एड्वर्ड**,
  ज. १२३९, मृ. १३०७,
  का. १२७२–१३०७,
  ल. { कास्टीलची एलिनोर हिच्याशीं, फ्रान्सची मार्गरेट हिच्याशीं.
  - **दुसरा एड्वर्ड**,
    ज १२८४, खून झाला, १३२७,
- एड्मंड,
  लांकास्टरचा
  अर्ल.
  - टामस,
    लांकास्टरचा
    अर्ल,
  - हेन्री,
    लांकास्टरचा
    अर्ल.

…१३२७,
ल. फ्रान्सची इसाबेला हिच्याशीं.

तिसरा एड्वर्ड,
ज. १३१२, मृ. १३७७,
का. १३२७–१३७७,
ल. एनोची फिलिप्पा हिच्याशीं.

एड्वर्ड,
धि ब्लाकप्रिन्स.
ज. १३३०, मृ. १३७६.

दुसरा रिचर्ड,
ज. १३६६, पदच्युत झाला १३९९,
का. १३७७–१३९९,
ल. { बोहिमियाची आन हिच्याशीं,
फ्रान्सची इसाबेला हिच्याशीं.

गांटचा जान—ह्यानें लग्न केलें .... ब्लान्श लांकास्टरची डचेस हिच्याशीं.
आणि लांकास्टरचा
ड्यूक झाला.

ह्याचा डेस्पेन्सरांविरुद्ध
बंड केल्याबद्दल
शिरच्छेद केला, १३२२.

हेन्री,
लांकास्टरचा
ड्यूक.

हेन्री,
डर्बीचा अर्ल आणि
लांकास्टरचा
ड्यूक, हा पुढें
चवथा हेन्री राजा झाला.

प्रकरण ८.

बारनांचें युद्ध

तिसरा हेन्री १२१६–१२७२.

राजा जान वारला. वचनें देणें किंवा मोडणें हें त्यापुढें त्याच्या हातीं राहिलें नाहीं. **राजपुत्र लूइ** हा राजा झाला तर आपल्या जमिनी काढून घेऊन **फ्रेंच** बडे लोकांना देईल हें पूर्वीच बारनांच्या लक्ष्यांत येऊं लागलें होतें, म्हणून **इंग्लंड**चा धाकटा **राजपुत्र हेन्री** हा त्या वेळीं वयानें फक्त ९ वर्षांचा होता, त्याला आपला राजा म्हणून पत्करण्यापुरते ते राजी होते. तेव्हां **वुइन्चेस्टर**च्या **बिशपा**नें त्या **हेन्री**च्या बापाच्या मृत्यूनंतर दहा दिवसांनीं, मुकुट गमावला होता म्हणून त्याच्या बदली एक लहानसें सोन्याचें कडें त्याच्या मस्तकावर घालून, त्याला **ग्लास्टर** एथें राज्याभिषेक केला. राज्याभिषेक होतांच **हेन्री**नें, **ग्वांलो** नांवाचा **पोपा**चा त्या वेळीं **लेगेट** (वकील) होता त्याला, आपल्या राज्याबद्दल आपण **पोपा**चा चाकर हें दर्शविण्यासाठीं मानपान केला. **धि ग्रेट चार्टर** (मोठी सनद) हा राज्यांत पुनः प्रसिद्ध केला, परंतु तसें करतांना, करांना लोकांचें अनुमत घेत गेलें पाहिजे, ह्या संबंधाचें जें कलम होतें, तेवढें त्यांतून गाळलें होतें. **वुइलियम मार्शल** नांवाचा **पेंब्रोकचा अर्ल** हा शाहणा वृद्ध पुरुष **हेन्री**च्या बापाचा व आजाचा दोस्त होता, त्याला "राजा आणि राज्य ह्यांचा नियंता" म्हणून पसंत करून नेमलें.

अल्पवयस्क हेन्रीला राज्याभिषेक झाला, तारीख २८ आक्टोबर १२१६.

पुढें हळू हळू बारन लोकांची पूर्वीची प्रवृत्ति उलटून ते परत

प्रजाधर्मी झाले. राजपुत्र लूइ हा अजून गादीबद्दल लढतच होता, परंतु त्याच्या फौजेचा, पेंब्रोकच्या अर्लानें, १२१७ त मेच्या २० व्या तारखेस लिंकन शहरच्या रस्त्यांत पराभव केला, आणि त्याच्या इंग्लिश चानलमधील अरमाराचा ह्यूबर्ट डि बर्घ ह्यानें आगस्टच्या २४ व्या तारखेस पराभव केला. ह्यास्तव लांबेथ एथें तह करून पैक्याची रकम घेऊन तो फ्रान्स देशीं संतोषानें माघारा गेला.

राजपुत्र लूइ हा फ्रान्स देशीं माघारा जातो, १२१७.

पुढें दोन वर्षांनीं पेंब्रोकचा वृद्ध अर्ल वारला, तेव्हां वुइन्चेस्टरचा बिशप पीटर डे राशे हा त्या अल्पवयस्क राजाचा रखवालदार झाला. ह्यूबर्ट डि बर्घ हा जस्टिशियर होता त्या नात्यानें त्यानें, आणि सत्पुरुष स्टीफन लांग्टन हा आर्चबिशप होता त्या नात्यानें त्यानें, असा दोघांनीं मिळून राज्याचा कारभार चालविला. हेन्रीला त्या आर्चबिशपानें १२२० त दुसऱ्यानें राज्याभिषेक केला; आणि १२२७ त वयानें २० वर्षांचा झाला तेव्हां, हेन्री आपल्या नांवें राज्यकारभार चालवूं लागला. पहिल्यानें ह्या गोष्टीपासून वास्तविक फरक म्हणून कांहींच झाला नाहीं, कारण त्याचे सल्लागार म्हणून पूर्वी होते तेच मिळून त्याचें "प्रायव्हेट कौन्सिल" (खासगी मन्त्रिमंडल) होऊन राहिलें होतें; आणि आमच्या हालींच्या काळांतलें जें "प्रिव्हि-कौन्सिल" (खुद्द निसबतीचें मंत्रिमंडल) म्हणून आहे, त्याचा तो आरंभ होता.

राजाचा व्यवहाराक्षमतेचा काल १२१६ –१२२७.

शहरांतून आणि खेड्यापाड्यांतून लोक संपन्न होते. . हें

खरें कीं आपआपसांत झालेल्या युद्धानें सर्व देश अस्वस्थ करून टाकला होता. साहसी राबिन हूड, आणि त्याचे साथी लिटल जान आणि फ्रायर टक्, ह्यांसारखे वाटमाऱ्ये आणि लुटारू मोठमोठ्या रस्त्यांत उपद्रव करीत. परंतु ते पुंड लुटारू विशेषें-

लोकांची स्थिति.

करून श्रीमान पांथस्थांवर हल्ला करीत, आणि घरवाड्यांकडे ढुंकून पाहत नसत, त्यामुळें तीं निरुपद्रव राहत. पिकें एकंदरीनें चांगलीं येत. मजूरांनादेखील खाण्याला ओट म्हणून एकप्रकारचें धान्य आहे त्याची भाकर विपुल असे आणि कधीं कधीं गव्हांची भाकरही असे, आणि ते हेरिंग नांवाचे समुद्रांतले मासे आणि पनीर खाऊन त्यांबरोबर सातूंपासून काढलेली बीर नांवाची दारू पीत. ते आपलीं वस्त्रें जातीनें विणीत, आपलें चांमडें आपण कमावीत, आणि हिवाळ्यांत आपलीं लांकडी हत्यारें आपण बनवीत; शिवाय, कुस्तीकरणें, भाला बर्ची वगैरे हत्यारें किंवा दगड मारणें किंवा फेंकणें, आणि तिरंदाजी, हीं तीनही कसबें त्यांनीं शिकलींच पाहिजेत असा कायदा होता म्हणून, त्यांचा अभ्यास करून ते आपणांस करमणूक करून घेत. आणखी हन्ड्रेड (शंभर कुटुंबांचा मिळून एक समुदाय असा देशविभाग) आणि मानार (जाहगीर किंवा जमीनदारी) ह्यांत कोडतें भरत, त्यांच्या योगें, त्या लोकांचें सारें आयुष्य निरंतर एकसारख्या रहाटीनें जात असे त्याला विक्षेप यऊन, त्यांचा तितक्यापुरता काळ चळवळींत जाई. वेळोवेळां एकादा खेड्यांत राहणारा माणूस शहरांत जाऊन तेथें उदीमधंदा करण्याला आपल्या जाहगीरदार धन्यापासून द्रव्य देऊन परवानगी मिळवी. दुसरा एकादा राजाच्या परदेशीं चाललेल्या युद्धांत शिपायाची नौकरी करी. दुसऱ्या एकाद्याला गांवांतील धर्माधि-

कारी विद्या शिकवून युनिव्हर्सिटींत पुढें अभ्यास करण्यासाठीं पाठवी. शहरांतूनही, देशांतल्या देशांतील आणि परदेशांशीं व्यापार, राजा वारंवार भारी कर बसवी तरी त्यांना न जुमानून, वाढत होता. खेड्यापाड्यांतील लोकांना जे जिन्नस आपले आपल्यासाठीं उत्पन्न करतां येत नसत, ते, जमीनदाराचा कारभारी वार्षिक मेळ्यांत खरीद करी.

जत्रा किंवा मेळे.

हे मेळे राज्यांतील वेगवेगळ्या भागांत राजाच्या तात्पुरत्या परवानगीनें भरत. तो त्यांत विकलेल्या सर्व मालांवर जकात घेई. हे मेळे लोकांना फार उपयोगाचे असत. इतकें मात्र न्यून होतें कीं, हेन्री राजाला पैक्याची जरूर पडली म्हणजे कधीं कधीं ज्या ठिकाणीं त्या मेळ्यांची गरज नसे त्या ठिकाणीं ते भरविण्याचा तो हुकूम करी. उदाहरणार्थ, तो लंडन शहरांत मेळे भरवी तेथें त्यांची गरज नव्हती. त्यांपासून त्या शहरांतील दुकानदारांचें नुकसान होई. ह्याच राजाच्या कारकीर्दींत १२५७ त इंग्लंडांत पहिल्यानें सोन्याचीं नाणीं पाडलीं, परंतु तीं १३४४ सांपर्यंत सामान्य व्यवहारांत आलीं नाहींत.

असो, परंतु राष्ट्रांतील लोक स्वस्थ आणि भरभराटींत असतां बारन लोक आणि राजा ह्यांच्या दरम्यान पुनः खवदव घांटत होती. **आर्चबिशप लांग्टन** हा १२२८ त मरण पावला, आणि त्याच्या मृत्यूनंतर त्यावेळचा **पोप नववा ग्रेगरी** हा **इंग्लंड** हें जणू आपलेंच राज्य आहे असें समजून त्याला वागवूं लागला. आपल्या युद्धांकरितां निरोप पाठवून तो फिरफिरून पैक्याच्या मागण्या करूं लागला, आणि बारन व धर्मोपदेशक ह्यांच्या मालमत्तांचा दहावा हिस्सा देखील त्यानें मागितला. आणखी त्यानें **इंग्लिश** विद्या-

पोप इंग्लंडावर पट्टी करून पैसा उकळतो.

यांच्या जाग्यांवर व इतर धर्मोपदेशकांच्या वृत्तींवर **इटालियन** धर्मोपदेशक भरले. ते **इंग्लिश** लोकांच्या द्रव्यावर श्रीमान झाले. हे परदेशीय धर्मशिक्षक लोकांच्या कल्याणाविषयीं बिलकूल परवा करीत नसत. त्या काळीं जर, "**फ्रायर्स**" किंवा "**ब्रदर्स**" (बंधु) ह्या नांवाचे दोहों नव्या पंथांचे जोगी भिक्षु त्या लोकांना धर्म शिकवायाला आले नसते, तर त्यांची धर्मशिक्षणाच्या कामीं फार हेळसांड झाली असती. ते **फ्रायरांचे** दोन पंथ हे. **डोमिनिकन्स** ऊर्फ **ब्लाकफ्रायर्स** (काळे जोगी भिक्षु) हा एक पंथ; ते **डोमिनिक** नांवाचा एक **स्पानियर्ड** होता त्याचे अनुयायी; आणि **फ्रान्सिस्कन्स** ऊर्फ **व्हाइट फ्रायर्स** (गौरवर्ण किंवा पांढरे जोगी भिक्षु) हा दुसरा पंथ; ते **अस्सीझी** नांवाच्या गांवचा एक **फ्रान्सिस** नांवाचा **इटालियन** जातीचा पुरुष होता त्याचे शिष्य. त्या दोन्ही पंथांत **युरोपां**तील सर्व राष्ट्रांतले सत्पुरुष होते. त्यांना दीक्षा घेतांना, आम्ही निरंतर निर्धनपणाचें व्रत आचरूं, अशी ईश्वरस्मरणपूर्वक आणभाक करावी लागे, आणि ते कांबळ्यासारख्या लोंकरीच्या कापडाची कफनी पांघरून तिच्या भोंवतीं तागाचा कमरबंद बांधून अणवाणी साऱ्या **यूरोप**खंडभर आणि **एशिया**खंडभर भटकत. **इंग्लंडांत** आल्यावर त्यांनीं आपलीं घरें शहरांच्या कंगालवस्तीच्या आणि गलिच्छ भागांत केलीं, आणि ते गांवोगांव प्रवास करून लोकांमध्यें धर्मशिक्षणाच्या प्रसाराकरितां भारी आस्थेनें श्रम करीत. प्रख्यात **राजर बेकन** हा ह्या **फ्रायरांपैकींच** एक होता. त्याच्या **ओपस माजुस** (जादूगिरीचें काम किंवा ग्रंथ) नांवाच्या विशाल ग्रंथानें प्रथम मनुष्यांचे विचार पदार्थविज्ञानशास्त्राकडे वळले.

फ्रायर्स (जोगी भिक्षु.)

१२३२ त राजाला ह्यूबर्ट डि बर्घ ह्याविषयीं मत्सर उत्पन्न झाला, आणि त्याकडून जस्टिशियरचा अधिकार काढून, सारा राज्यकारभार आपल्या हातीं घेऊन, त्यानें आपल्या मोठ्या प्रधानांच्या जाग्यांवर केवळ कारकुनांची योजना केली. त्या वेळेपासून सर्व बस्तान बिघडलें, कारण हेन्री हा चंचलबुद्धि, दिमाखखोर, आणि उधळ्या, होता, आणि त्याच्या मर्जीतले लोक त्याला सहज हवातसा वळवीत. तथापि त्याचा स्वभाव प्रियकर होता, आणि तो कविता आणि कला ह्यांचा शोकी होता. त्यानें वेस्टमिन्स्टर आबी (मठासहित देवालय) नांवाची इमारत पुनः बांधवून हालीं जशी आहे तशी केली, आणि इंग्लंडांतील शिल्पविद्या, म्हणजे इमारती बांधण्याची कला, सुधारली. परंतु तो राजनीतिकुशल नव्हता. तो एका माणसावर एक दिवस विश्वास ठेवी, आणि त्याच्या पुढल्या दिवशीं त्या माणसाविषयीं संशय घ्यावयास लागे; आणि जरी तो कोमल अंतःकरणाचा आणि सद्बुद्धीचा होता, तरी तो अकलेनें इतका अतिशय नबळा होता कीं, तो आपल्या स्वतःशीं किंवा इतरांशीं कधींही साचा, किंवा करारी नव्हता.

हेन्री हा जातीनें एकटा राज्यकारभार करूं लागतो, १२३२–१२५८.

जान राजाच्या मृत्यूनंतर हेन्रीची आई इसाबेला हिनें एका फ्रान्स देशांतील कौंटाशीं (ही एक बडे लोकांची पदवी आहे) पुनः विवाह केला होता. तेव्हां आतां हेन्री आपल्या फ्रेंच जातीच्या तरुण सावत्रभावांना इंग्लिश लोकांपासून उत्पन्न झालेलें द्रव्य आणि त्या लोकांच्या जमिनी देऊं लागला. पुढें १२३६ त त्यानें प्रोव्हॅान्सची एलिनोर हिच्याशीं लग्न केलें, तेव्हां तिच्या

परदेशीयांचा थव्याचा थवा येतो.

आप्तांना चांगचांगल्या वस्तूंचा वांटा अर्थात् मिळालाच. आणखी त्याच्या दरबारीं परदेशीय लोकांचा थवा येऊन दाटी झाली. त्या परदेशीयांचीं **इंग्लंडां**तील मोठमोठ्या मालमत्तांच्या वारिसदारिणी झालेल्या स्त्रियांशीं **हेन्रीनें** लग्नें लावून दिलीं. **स्ट्रांड** नांवाच्या महल्याच्या दक्षिणेकडील **लंडन** शहराच्या भागाला अद्यापि **साव्हॉय** म्हणतात, तें त्याचें नांव, **एलिनोर** राणीचे मामा किंवा चुलते ह्यांपैकीं एका **साव्हॉयचा पीटर** ह्या नांवाच्या मामाचा किंवा चुलत्याचा वाडा तेथें होता, त्या वाड्यावरून पडलें.

एकीकडे **पोपाचा** बलात्कारानें द्रव्यापहार, आणि दुसरीकडे ह्या परदेशीयांची वखवख, ह्या दोहोंच्या दरम्यान **इंग्लंड** भिकारी होत चाललें होतें. तशांत, भिकारी होण्याला मुख्य कारण म्हटलें म्हणजे हें कीं, राजानें खुद्द आपल्या घरीं, म्हणजे **इंग्लंडांत**, फारच उधळपट्टी मांडली होती, आणि **फ्रान्सां**तील आपल्या बापाचा मुलूख परत मिळविण्याचा त्यानें सतत प्रयत्न चालविला होता. तेव्हां ह्या सर्व कामांसाठीं द्रव्य मिळविण्याकरितां म्हणून, अर्ल, बारन, आणि बिशप, ह्यांना पाचारण करून त्यांच्या सभा राजाला जमवाव्या लागल्या. त्या सभांना तेव्हां, प्रथमच, **पार्लेमेंट्स** हें नांव पडलें. तें नांव, बोलणें ह्या अर्थी **पार्लेर** ह्या **फ्रेंच** शब्दापासून झालेल्या **पार्लेमेंट** ह्या **फ्रेंच** शब्दावरून निघालेलें आहे. त्या बडे लोकांनीं त्याला पैशाच्या रकमा मोठ्या नाराजीपणें दिल्या, त्यांनीं दरवेळेस पैसा देतांना, त्या पैशाच्या खर्चावर नजर ठेवण्यासाठीं एक योग्य जस्टिशियर, एक चान्सेलर, आणि एक खजिनदार, आम्हांला नेमूं दिला पाहिजे म्हणून राजाला टुमणी लावलीच होती. राजानें पुष्कळ वचनें दिलीं, आणि सहा वेळां पू-

प्रथमच पार्लेमेंट हे नांव पडतें.

वींच्या **चार्टरांचें** दृढीकरण केलें. परंतु ते **चार्टर** किंवा तीं वचनें त्यानें पाळलीं नाहींत. वर्षानुवर्ष तो पैक्याकरितां **पार्लमेंटाकडे** येई तेव्हां त्याच अडचणी उत्पन्न होत, आणि तो अधिकाधिक द्रव्य मागे तसतशा त्या अडचणी ज्यास्ती ज्यास्ती कठिण होत चालल्या. शेवटीं, हा द्रव्याला सतत लागलेला निचरा, आणि राजाच्या प्रीतींतल्या परदेशीय माणसांच्या संख्येची वाढ, बंद केली पाहिजे त्यावांचून इलाज नाहीं असें बारनांच्या लक्ष्यांत आलें.

साइमन डि मान्टफर्ट.

लिंकन एथील **बिशप ग्रॉस्टेस्ट, कांटर्बरी** एथील **आर्च-बिशप एड्मंड रिच,** आणि राजाचा स्वतःचा भाऊ **कार्नवालचा अर्ल रिचर्ड** देखील, ह्या सर्वांनी पुनः राज्यकारभार पूर्वीसारखा चांगल्या प्रकारें चालूं लागावा म्हणून सख्त प्रयत्न केला. ह्या वेळीं बारनांचा मुख्य नायक **साइमन डि मान्टफर्ट** नांवाचा **लेस्टरचा अर्ल** हा होता. त्यानें राजाची बहीण **एलिनोर** हिच्याशीं लग्न केलेलें होतें त्यामुळें तो राजाचा मेहुणा होता. हा एक मोठा चमत्कार होता कीं, **अर्ल साइमन** हा परदेशीय आईबापांचा पुत्र होता, तथापि त्याची आजी ही **इंग्लिश** होती, आणि तो **अर्ल इंग्लंडचा** खरा दोस्त होता. तो वचनांत आणि कृतींत सारखा करारी पुरुष असून, जें खरे किंवा न्याय्य त्याचें रक्षण करण्याविषयीं दृढनिश्चय होता. त्याचा मित्र **ग्रॉस्टेस्ट,** आणि **आडम मार्श** नांवाचा एक कळकळीचा **फ्रान्सिस्कन फ्रायर,** ह्या दोघांच्या सहवासापासून, त्या काळीं होती तीहून चांगल्या प्रकारची लोकांवर अमल करण्याची रीति स्थापित व्हावी अशी आशा करण्याविषयीं त्याला बोध मिळालेला होता. त्यानें राजाच्या तर्फे पुष्कळ वर्षे **गास्कनींत** अमल केला. **हेन्रीनें तर** त्या-

ज्याशीं लाजिरवाणें वर्तन केलें; त्यानें त्याला द्रव्य किंवा माणसें ह्यां- वांचून तेथें ठेवलें. तो अर्ल जेव्हां इंग्लंडास माघारा आला, तेव्हां राजाच्या नबळेपणाच्या आणि मूर्खपणाच्या वागणुकीला अटक करावी म्हणून त्यानें प्रयत्न केला, परंतु तो व्यर्थ गेला. बेवीस वर्षेंपर्यंत सर्व गोष्टी उत्तरोत्तर अधिकाधिक वाईट होत चालल्या. रिच हा १२४० त वारला. तेव्हां राणीचा मामा किंवा चुलता साव्हॉयचा बानिफेस हा अगदी तरुण पुरुष होता त्याला हेन्रीनें कांटर्बरी एथील आर्चबिशप केलें. १२५३ त ग्रास्टेस्टही मरण पावला, परंतु त्या पूर्वीच त्यानें, प्रजेला होत असणाऱ्या जाचांची एक यादी तयार केली होती, आणि मी न्याय आणि नीति ह्यांकरितां मृत्यूची पाळी येईपर्यंत देखील दंड थोपटून उभा राहीन, अशी साइमन कडून शपथ वाहविली होती. अर्ल साइमन ह्यानें आपली प्र- तिज्ञा पाळली.

वाईट अमलाची बेवीस वर्षें.

जी खबदब घांटत होती म्हणून पूर्वी सांगितलें ती आणखी कांहीं वर्षांनीं पुढें उसळली. १२५४ त पोप चवथा इनोसेंट ह्याच्या मनांत जर्मनीचा बादशाहा कान्राड ह्याला सिसिली बेटांतून पिटून लावावयाचें होतें. म्हणून त्यानें सिसिलीची गादी हेन्रीचा दुसरा मुलगा एड्मंड त्या वेळीं वयानें नऊ वर्षांचा होता त्याकरितां म्हणून हेन्रीला देऊं केली. हेन्री इतका मूर्ख होता कीं त्यानें ती गोष्ट स्वीकारली. तितक्यांतच चवथा इनोसेंट वारला, तरी त्याच्या पुढला पोप चवथा अलेक्झांडर ह्यानें हेन्रीच्या नांवें आणि हेन्रीच्या खर्चानें कान्राड ह्याच्याशीं युद्ध मांडलें. तेव्हां १२५७

पोप एड्मंडाला सिसिलीची गादी देऊं करतो.

त, मी पोपाचें १३५००० मार्क (एक नाणें आहे), किंवा ९०००० पौंड, इतकें ऋण देणें आहे असें हेन्रीला आपल्या पार्लमेंटापुढें कबूल करावें लागलें.

तें ऐकून बारनांना फार राग आला, कारण, हेन्रीनें त्यांची पूर्वी सल्ला घ्यावयास पाहिजे होती तशी घेतलेली नव्हती, आणि साऱ्या देशांतून पैशाचा निचरा होऊन गेलेला होता. तेव्हां मागितल्या रकमेपैकीं त्यांनीं फक्त ५२००० मार्क दिले. पुढें १२५८ त जूनच्या ११ व्या तारखेस, आक्सफर्ड एथें पार्लमेंट भरलें, त्याला पुरे हत्यारबंद होऊन ते बारन आले, आणि आग्रह धरून बसले कीं इतक्या गोष्टी राजानें मान्य केल्याच पाहिजेत, त्या येणेंप्रमाणें. (१) चोवीस बारनांनीं राज्यव्यवस्था सुधारावी, त्या चोविसांपैकीं बारा राजानें निवडावे, आणि बारा बारनांनीं. (२) दरसाल तीन पार्लमेंटें भरावीं. (३) किल्ले इंग्लिश लोकांचे इंग्लिश लोकांस परत द्यावे. (४) राजाला सल्लामसलत देण्याला एक निरंतर स्थापलेलें प्रिव्हि कौन्सिल (खुद्द निसबतीचें मंत्रिमंडल) असावें. (५) जस्टिशियर, चान्सेलर, आणि खजिनदार, हे तिघे अधिकारी बारन नेमतील, त्या तिघांनीं दरसालच्या अखेरीस त्या प्रिव्हि कौन्सिलाला हिशेब दिला पाहिजे. राजाच्या पक्षाचे लोक फार रागावले, आणि त्यांनीं ह्या आक्सफर्ड एथें जमलेल्या पार्लमेंटाला "वेडें पार्लमेंट" असें नांव दिलें. तथापि हेन्रीला वश होणें भाग आलें, आणि तो, व तेव्हां एकुणीस वर्षांचा झालेला त्याचा वडील मुलगा, ह्या उभयतांनीं हीं "प्रोव्हिझन्स आफ् आक्सफर्ड," म्हणजे ही आक्सफर्ड एथील कलमबंदी, आम्ही सो-

वेडें पार्लमेंट, १२५८.

आक्सफर्ड एथील प्रोव्हिझन्स्, म्हणजे कलमबंदी.

कारली म्हणून शपथ घेतली. **अर्ल साइमन** हा, परदेशीय होता म्हणून, त्यानें आपण होऊन आपले किल्ले सोडून देतों म्हणून सर्वांत पहिल्यानें कळविलें, आणि राजाच्या प्यारींतले बहुतेक परदेशीय **फ्रान्स** देशीं पळून गेले. त्यांच्या जागा **इंग्लिश** लोक नेमून भरल्या.

आतां बारन लोक राज्यकारभार चालवूं लागले; परंतु त्यांची सत्ता अवघी चार वर्षें टिकली; कारण परदेशीयांना आपण उखडून वाटेस लावलें एवढ्याच गोष्टीनें त्या बारनांपैकीं बहुतेक समाधान पावले, आणि ज्या सुधारणा म्हणून करावयाच्या होत्या त्यांकरितां त्यांनीं कांहींच श्रम केले नाहींत. **अर्ल साइमन** हा तर चांगल्या राज्यव्यवस्थेविषयीं खरोखर इच्छा करीत होता. **राजपुत्र एड्वर्ड** हा स्वभावतः न्यायी आणि उदार मनाचा होता. त्याच्या मनाचा कल **साइमनाला** पाठबळ देण्याकडे होता. उलटपक्षीं, ती **"कलमबंदी"** रक्षण करीन म्हणून मीं वचन दिलें आहे, त्या वचनाच्या जबाबदारींतून मला आपण सोडवावें असा **पोपाला** अर्ज राजा पूर्वीच पाठवून चुकला होता. पुढें जेव्हां ती वचनमुक्तता **पोपाकडून** आली, तेव्हां त्यानें **टौअर,** म्हणजे **लंडनचा** किल्ला, आपल्या हस्तगत केला, आणि बारनांच्या कामदारांचा हुकूम बिलकूल ऐकूं नये अशी **कौंटीना** ताकीद पाठविली. तेव्हां बारन शस्त्र धरून उठले. राणीनें भीतीनें **टौअराचा** आश्रय केला, आणि आपआपसांतलें युद्ध आतां सुरू होण्याच्या लागांत आलें, तथापि मोठी लढाई म्हणण्यासारखी झाली नाहीं. शेवटीं **फ्रान्स** देशाचा राजा **नववा लूइ** याला लवाद नेमून त्याकडे वादाचा समग्र विषय पाठवून तो करील तो ठराव

आमिएन एथील मीझ् म्हणजे लवादनामा, १२६४.

सर्वांनीं मान्य केला पाहिजे असा त्या उभयपक्षांच्या दरम्यान करार झाला. तो **नववा लूइ** सज्जन असून त्याची धर्मनिष्ठा आणि उदार शील ह्यांमुळें तो फार पूज्य होता. तो वारल्यावर १२९७ त त्याचें नांव **सेन्टांच्या** (साधूंच्या) पटांत दाखल केलें, तेव्हांपासून त्याला **सेंन्ट लूइ** असें म्हणूं लागले. असो, त्या **सेन्ट लूइ**चा विचार ठरला कीं, राजा म्हटला म्हणजे त्याला स्वेच्छानुसार मुखत्यारीनें अमल करण्याचा हक्क आहे. ह्यास्तव, **आमिएन** एथील **मीझ** (लवादनामा) केला त्यांत त्यानें सर्वथा **हेन्री**च्या तर्फे निवाडा दिला.

बारन्स वार, १२६४.

नंतर "**बारन्स वार,**" (म्हणजे बारनांचें युद्ध) ह्या नांवचें जें विख्यात युद्ध तें उद्भवलें. वस्तुतः राजा आणि बारन ह्यांचा सत्तेकरितां झगडा **जाना**च्या कारकीर्दीपासूनच चाललेला होता. त्या युद्धांत, **लंडनां**तील १५००० लोक **अर्ल साइमन** ह्याला मिळाले; आणि **राणी एलिनोर** ही **टौअर,** म्हणजे **लंडन**चा किल्ला, सोडून जाण्याविषयीं यत्न करीत असतां, तिचा बंडाळ लोकांनीं अपमान केला, आणि तिजवर दगड आणि चिखल ह्यांचा मारा केला. बारनांपैकीं कांहीं जण राजाला मिळाले, आणि आतां उघड युद्धापर्यंत मजल आली हें पाहून, **एड्वर्ड** हा आपल्या बापाचा पक्ष धरून साऱ्या परदेशीय फौजेनिशीं त्याच्या बचावासाठीं उभा राहिला. परंतु **अर्ल साइमन** ह्याचाही परिवार किंवा फौज मोठीच होती. पुढें

लूएस एथील लढाई, १२६४.

कांहीं लहान लहान चकमकी किंवा लढाया झाल्यावर, १२६४ त मे महिन्याच्या २४ व्या तारिखेस उभयपक्षांकडील फौजांची लूएस नांवच्या गांवाजवळ समोरासमोर गांठ पडली. तेव्हां पहि-

त्यानें राजपक्षाकडील सैन्याची सरशी झाली. परंतु तरुण राजपुत्रानें लढाईची सुरुवात केलेली होती, त्यानें शत्रूच्या फौजेंतील लंडनच्या लोकांची उधळाउधळ करून, त्यांनीं आपल्या आईचा अपमान केला होता म्हणून तो करदनकाळासारखा त्यांना पुढें पिटाळून त्यांच्या मागें लागला. तिकडून तो परत येतो तों, लढाईंत हार येऊन, राजा कैद झालेला होता. तेव्हां शरण जाण्याखेरीज एड्वर्डोच्यानें दुसरें कांहीं करवलें नाहीं.

ह्यानंतर एकावर्षाहून जास्तीच काळपर्यंत **अर्ल साइमनानें**, हेन्रीला आपल्या संगतीं ठेवून, त्याच्या नांवानें इंग्लंडचा राज्यकारभार चालविला. १२६५ त जान्युअरीच्या २० व्या तारिखेस, त्यानें **वेस्टमिन्स्टर** एथें एक **पार्लमेंट** भरविलें. त्यांत जरी फक्त त्याचा पुस्तपना करणारेच लोक होते, तरी तें **पार्लमेंट** फार महत्त्वाचें होतें. कारण, त्या **पार्लमेंटांत** (पूर्वी १२५४ त केलेलें होतें त्याप्रमाणें) बडे लोकांबरोबर बसण्याला **साइमनानें** प्रत्येक शायरांतून दोन नाईट बोलावले, इतकेंच नव्हे, परंतु प्रत्येक बरोंतून (सनदी गांवांतून) दोन बर्जेस्स म्हणजे बरोंतले रहिवासीही बोलावले. ह्या प्रकारें शहरांतील जनतांना अथवा कामन्सांना (सामान्य जनसमुदायांना) आपआपले **पार्लमेंटाचे** सभासद (प्रतिनिधि) पाठविण्याचा अधिकार पहिल्यानेंच मिळाला. **पार्लमेंटाकरितां नाइटांची** निवडणूक प्राचीनकालिक शायर-मूटांत (शायरांतील मंडळांत) होई तधी, कौंटी-कोडतांत कौंटींतले **फ्रीहोल्डर्स**, म्हणजे वतनी किंवा मिरासी जमीनदार लोक, ह्यांकडून होई: आणि

राजा आणि राजपुत्र ह्या दोघांनाही कैदेंत ठेवलें, १२६४-१२६५.

नाइट आणि बर्जेस्स ह्यांना पार्लमेंटासाठीं बोलावणें होतें, तारीख २० जान्युअरी १२६५.

हे निवडलेले नाइट, हालींचे आमचे कौंटी मेंबर्स (कौंटीकडील सभासद) म्हणून ज्यांना म्हणतात, त्यांच्या मेळाचे किंवा तोडीचे होते. आमच्या कौंटी मेंबर्सना अजून शायरचे नाइटच म्हणतात. बरोंतल्या सभासदांना त्या त्या गांवांत राहणारे लोक निवडीत.

परंतु पुनः **साइमना**ला आपल्या पक्षाच्या लोकांत ऐक्यभाव राखतां येईना. बारन, आणि मुख्यत्वेंकरून **ग्लास्टरचा अर्ल,** त्याच्या प्राबल्याविषयीं मत्सर करूं लागला, आणि **साइमना**च्या पुत्रांनीं आपल्या गर्विष्ठपणानें त्या बारनांना चिरड आणली. तशांत आपला राजा कैदी असावा हें लोकांना आवडेना. शेवटीं, **राजपुत्र एड्वर्ड** ह्याला **हेरिफोर्ड** एथें कैदेंत ठेवलेलें होतें, तेथें आपल्यावरील पहारा करणाऱ्या लोकांना त्यानें घोड्यांच्या शर्यती करण्यास लावलें, आणि त्यांचे घोडे थकले असें पाहून तो त्यांच्या हातून निसटून पळून गेला.

राजपुत्र एड्वर्ड कैदेंतून निसटून पळून जातो, तारीख २८ मे १२६५.

एकदा खुला झाल्यावर, त्याचे जुने उधळलेले मित्र त्याच्या भोंवतीं जमून व्यवस्थित झाले, आणि **ग्लास्टरचा अर्ल** मोठ्या फौजेनिशीं येऊन त्याला मिळाला. नंतर तो **सेव्हर्न** नदीच्या कांठानें त्वरेनें कूच करून निघाला, त्यानें **ग्लास्टर** आणि **वूर्स्टर** हीं दोन शहरें घेतलीं, आणि तेथले पूल मोडून टाकून, त्यानें **साइमना**ला पिटून लावलें, तेव्हां त्यानें **वेल्श राजा लूएलिन** ह्याकडे जाऊन त्याचा आश्रय केला. तदनंतर तसाच पुढें रगडीत **एड्वर्ड केनिलवर्थ** एथें गेला, आणि आपल्या बापाच्या मदतीकरितां छोटा **साइमन** येत होता त्याचा **एड्वर्डा**नें पराभव केला. नंतर छोट्या **साइमना**च्या नाइटांकडून (सरदारांकडून)

ईव्हशमची लढाई, तारीख ४ आगस्ट १२६५.

हिरावून घेतलेलीं निशाणें आपल्या फौजेच्या आघाडीवर लावून तो एड्वर्ड पुढें चालला असतां, तो वूर्स्टरशायरांतील ईव्हझम या गांवीं, कोणी शत्रु आपणावर चाल करून येत आहे हें त्या वृद्ध अर्ल साइमनाला कळण्यापूर्वीच, त्याच्यानजीक जाऊन थडकला. त्या वेळीं त्या साइमनाजवळ कवाईत न शिकलेल्या अशा वेल्श माणसांची फक्त लहानशी फौज होती, म्हणून आपल्याला आतां तीळभरही आशा उरली नाहीं असें तत्काल त्याच्या लक्ष्यांत आलें. तेव्हां त्याच्या भोंवतीं थोडेसे बारन होते त्यांना तो म्हणाला, "आमच्या आत्म्यांचें रक्षण देवावर सोपूं, कारण आमचीं शरीरें आमच्या शत्रूंचीं आहेत." असें म्हणून तो शौर्यानें लढतां लढतां मेला. त्या वेळीं त्याच्या ओंठावाटे "ही ईश्वराची कृपा आहे" अशी आरोळी निघाली.

केनिलवर्थ एथील डिक्टम म्हणजे तह, १२६६.

त्याच्या बरोबर आरंभलेलें कार्य सिद्धीस जाण्याची सारी आशाही लयास गेली. आपआपसांतलें युद्ध रेंगत रेंगत पुढें एक वर्षपर्यंत चाललें. शेवटीं, केनिलवर्थचा डिक्टम, म्हणजे तह, ह्यानें बहुतेक बारनांच्या जमिनी राजापासून त्यांना परत मिळाल्या. १२६७ त हेन्रीनें मागें सांगितलेली कलमबंदी पुनः ताजी करून दिली, आणि त्यापुढलीं सहा वर्षें शांतींत गेलीं. राजपुत्र एड्वर्ड हा १२७० त धर्मयुद्धाला गेला, आणि तो तिकडे गेलेला असतां मागें, हेन्री राजा १२७२ त डिसेंबरच्या १६ व्या तारिखेस, अर्ध्या शतकाहूनही अधिक काळपर्यंत त्याची क्लेशकर कारकीर्द होऊन, मृत्यु पावला. त्या कारकीर्दींत, लवलेशही पीडा किंवा उपद्रव करावा असें त्याच्या मनांत नसतांही, केवळ तो 'अयोग्य किंवा कवडीचा माल राजा' असल्यामुळें त्याच्याकडून अपार पीडा झाली.

प्रकरण ९.

वेल्स आणि स्काटलंड ह्यांच्याशीं झगडा

पहिला एड्वर्ड (वेस्टमिन्स्टरचा), १२७२—१३०७.
|
दुसरा एड्वर्ड (केरनार्व्हनचा), १३०७—१३२७.

हेन्री वारला तेव्हां **रायल कौन्सिलानें** (राजकीय मंत्रिमंडलानें) **राजपुत्र एडवर्ड** हा राजा झाला म्हणून लोकांस जाहीर केलें, आणि तो **पुण्यभूमीहून इंग्लंडास** परत येई तोंपर्यंत सुमारें दोन वर्षें त्या **कौन्सिलानें** बखेडे न होऊं देतां राज्यकारभार केला. **एड्वर्ड** परत आल्यावर त्याला १२७४ त आगस्टच्या १९ व्या तारिखेस राज्याभिषेक केला. तेव्हां तो वयानें पसतीस वर्षांचा असून, बांध्यानें उंच व बळकट होता. त्याचे केंस काळेभोर आणि डोळे सौम्य होते. डोळे सौम्य होते तथापि त्याला चिरड आली कीं लागलेच ते रागानें चमकूं लागत. **इंग्लंडचे** जे उत्तम म्हणून राजे झाले त्यांपैकीं तो एक होता, आणि त्यानें कायद्यांत उपयोगी अशा पुष्कळ सुधारणा केल्या. पुत्र, पति, आणि पिता, ह्या तीनही नात्यांनीं तो चांगला होता. आपल्या मातापितरांविषयीं त्याचें अंतःकरण किती भक्तिमान होतें, ह्याचा प्रत्यय त्याच्या आईचा लोकांनीं अपमान केला त्यामुळें जो त्याला तैष आला, त्यावरून मिळतो; आणि त्याच्या बायकोच्या ठायीं त्याचें अंतःकरण किती निरत होतें, ह्याचा प्रत्यय, त्याची बायको **राणी एलिनोर** हिचें शव **लिंकनशायरपासून वेस्टमि-**

राजप्रतिनिधींचा अमल, १२७२–१२७४.

पहिल्या एड्वर्डाचें स्वरूप आणि गुणदोष.

न्स्टरपर्यंत आणतांना दरम्यान, ज्या ज्या ठिकाणीं आणणारांनीं विसांव्याकरितां उतरलें, त्या त्या ठिकाणीं, आजपर्यंत टिकले आहेत, असे क्रूस (वधस्तंभ) त्यानें बांधविले, त्यांवरून मिळतो. **चेरिंगक्रास्स** नांवाचा जो **लंडन**चा भाग आहे त्याला तें नांव, ह्या क्रूसांपैकीं एक क्रूस तेथें आहे त्यावरून पडलें. तो शूर, सत्यवादी, आणि स्थिरचित्त होता. त्याचा मुद्रालेख **"कीप ट्राथ"** (सत्य राख) हा होता, आणि आपल्या बापाच्या चुका त्यानें पाहिल्या होत्या, ह्यास्तव आपल्या लोकांचें प्रेम जोडावें आणि त्यांना चांगले कायदे करून द्यावे ही त्याची इच्छा होती. जेव्हां केव्हां त्याची ती इच्छा सफल झाली नाहीं, तेव्हां त्याचें कारण, राजा करील ती पूर्वदिशा, हा जुना समज अद्यापि त्याच्या मनाला बिलगून होता, हें होतें.

बारनांचें युद्ध संपल्यावर **जस्टिशियर** हा हुद्दा पुनः उपस्थित केला नाहीं. आतां **चान्सेलर** (पंडितराव) हा, अधिकारानें राजाच्या अगदीं जवळचा झाला, आणि **राबर्ट बर्नेल** हा इंग्लंडचा पहिला प्रतापी **चान्सेलर** झाला. नंतर **एड्वर्ड**, एकदम, ज्या वहिवाटी गैर म्हणून होत्या, त्या सुधारण्याच्या प्रयत्नास लागला. किंमत दिल्यावांचून आपल्या किल्ल्यांत गुरेंढोरें हाकवून नेण्याची, अथवा अन्यायानें पट्ट्या बसवून आपल्या कुळांकडून पैसा उकळण्याची, बारनांची वहिवाट होती ती त्यानें मना केली; आणि न्याय करण्याचें काम ज्यांचें होतें असे जे शेरिफ्फ वगैरे अधिकारी, ते निवडण्याच्या कामीं लोकांना अगदीं स्वतंत्र ठेवावें, त्यांना कोणीही कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध करितां कामा नये, असा त्यानें कायदा केला. त्यानें देशांतल्या चलनी नाण्यांचीही सु-

पहिला प्रतापी चान्सेलर, १२७४.

धारणा केली, आणि रुप्याच्या हेपेनी (अर्ध्या पेनी) आणि फार्दिंग हीं नवीन नाणीं पाडविलीं. आल्फ्रेडाच्या कारकीर्दीपासून ह्या काळपावेतों रुप्याची पेनी म्हणून एक नाणें होतें, त्या नाण्यावर एक क्रूस खोल खोदलेला असे, आणि लोकांना त्याहून लहान नाणें पाहिजे असलें म्हणजे त्या पेनीचीं ते दोन किंवा चार छकलें करीत.

हेपेनी आणि फार्दिंग हीं नाणीं पाडलीं.

नंतर, वेल्स देशापासून निरंतर उपद्रव पोहोंचे, म्हणून त्या देशाकडे एड्वर्डानें आपलें लक्ष्य वळविलें. पूर्वीं जो सारा देश ब्रिटन लोकांचा म्हणून होता, तो त्यांनीं थोडा थोडा असा बहुतेक सारा गमावला. स्ट्राथ्क्लाइड आणि कंब्रिया हे प्रांत, इंग्लंड आणि स्काट्लंड ह्या दोहों राज्यांत सामील होऊन पुष्कळ वर्षें झालेलीं होतीं. पश्चिम वेल्स, अथवा डेव्हन आणि कार्न्वाल हे प्रांत, दक्षिण इंग्लंडाचा भाग होऊन गेलेले होते; आणि खुद्द वेल्सचे दक्षिणेकडील कौंटी देखील नार्मन बारनांनीं जिंकून घेतलेले होते. ते बारन वेल्सच्या हद्दींवर राहत, म्हणून त्यांना वेल्श मार्चिझचे (सरहद्दींचे) लार्ड (प्रभु) असें म्हणत. मार्चिझ हा शब्द, सीमा ह्या अर्थीं मार्क अथवा मार्च ह्या शब्दावरून उत्पन्न झालेला आहे. एकट्या उत्तर वेलसांत मात्र वेल्श लोकांवर त्यांचे तद्देशीय रजवाडे ह्यांचा अजून अमल असे. त्या रजवाड्यांच्या पदरचे भाट, द्वेष्य साक्सन, आणि आर्थर नांवाचा एक प्राचीनकाळचा चांगला राजा होता त्याचा काळ, ह्या दोन गोष्टींविषयीं आपलीं रचलेलीं कवनें किंवा पवाडे गात. त्या रजवाड्यांचा मुख्य लूएलिन नांवाचा होता.

वेल्स देश.

स्नोडनचा **लार्ड** (प्रभु) आणि **प्रिन्स आफ् वेल्स** (वेल्सचा राजा किंवा राजपुत्र) हे त्याचे किताब होते. त्यानें **अर्ल साइमन** ह्याला कुमक केलेली होती, आणि **बारनांचें युद्ध** चाललें असतां, तो आपल्या राज्यावर स्वतंत्र राजासारखा अमल करीत होता. त्यानें आतां **इंग्लंडास** येऊन **एड्वर्ड** राजाला सेवांजलिसंस्कार, म्हणजे धन्याचा मानपान, करणार नाहीं म्हणून साफ सांगितलें. नंतर दोन वर्षांहूनही ज्यास्ती काळपर्यंत अवघे सामाचे उपाय करून पाहिले, तथापि तो **लूएलिन** ऐकेना, तेव्हां शेवटीं, १२७७ त, **एड्वर्ड** राजा फौजेनिशीं **वेल्स** देशावर चाल करून गेला, आणि त्यानें त्या **लूएलिना**ला डोंगरांतील किल्ले व रक्षणाच्या जागा ह्यांत पिटून लावलें. तेव्हां त्या **लूएलिना**ला शरण येऊन अंकित होणें भाग आलें, आणि **एड्वर्डानें**, कांहीं अटींवर त्याची सत्ता आणि किताब वागविण्याला, आणि **साइमन डि मान्टफर्ट** ह्याच्या कन्येशीं विवाह करण्याला, त्याला परवानगी दिली.

लूएलिन हा एड्वर्डाला धन्याचा मानपान करण्यास नाकारतो.

परंतु पुढें चार वर्षांनीं पुनः बंड उद्भवलें. **लूएलिन** हा शूर आणि उदार मनाचा रजवाडा होता, परंतु त्याचा भाऊ **डेव्हिड** हा चळवळ्या साहसी होता. त्यानें एका वेळीं **लूएलिना**शीं विश्वासघात करून **इंग्लिशां**चा पक्ष धरलेला होता. आतां कांहीं कारणानें नाखुश होऊन तो उलटून **इंग्लिशां**शीं बेइमान झाला, त्यानें **फ्लिंटशायरां**तील **हावार्डेन** नांवाच्या किल्ल्यांत जबरीनें शिरून, **वेल्स**चा मुख्य न्यायाधीश **इंग्लिश** जातीचा होता त्याला कैद केलें, आणि **लूएलिन** व इतर **वेल्श** राजे ह्यांना, बंड करून **मार्चिझ**, म्हणजे सरहद्दीवरील मुलूख, लुटण्यास त्यानें प्रवृत्त केलें. **वेल्श** लोकांत एक भाकीत होतें कीं, जेव्हां **इंग्लिश** नाणें

वाटोळें होईल तेव्हां एका **वेल्श** राजाला **लंडनांत** राज्याभिषेक होईल, आणि तुकडे केलेल्या पेनीबदली आतां लहान वाटोळीं नाणीं पाडलीं तेव्हां, त्यांवरून त्या **वेल्श** लोकांना वाटलें कीं तें भाकीत खरें होणार. असो, नंतर **एड्वर्ड** राजा पुनः सैन्य घेऊन **वेल्स** देशांत गेला, आणि त्या देशांतल्या कडक हिंवाळ्यांत त्यानें तेथें पराकाष्ठेचे क्लेश भोगिले, तथापि आपलें धरलेलें ठिकाण सोडून तो माघारा जाईना. इतक्यांत दैव त्याला अनुकूल झालें, आणि **वाई** नदीच्या कांठीं एक लहानशी चकमक झडली तींत तो शूर **लूएलिन** ठार मारला गेला, आणि तो मरतांच **वेल्स** देश **एड्वर्डा**च्या हातीं आला. पुढें कांहीं महिन्यांनीं **डेव्हिडाला** पकडलें, आणि राजद्रोही निमकहरामाच्या मोतीनें त्याला मरावें लागलें तें यथायोग्यच झालें. नंतर **एड्वर्ड वेल्स** देशांत एका साऱ्या वर्षभर राहिला. त्या वेळांत त्यानें तेथें चांगले कायदे चालू केले, आणि तो त्या देशांत असतांनाच त्याचा मुलगा **एड्वर्ड** ह्याचें जन्म १२८४ त **केर्नार्व्हन** एथें झालें. ह्या काळापासून **वेल्स** देश **इंग्लंडांत** सामील केला. परंतु त्याचे कायदे तद्देशीयच ठेवले होते. १३०१ त **एड्वर्डानें वेल्सांत** जन्म पावलेला आपला पुत्र **एड्वर्ड** ह्यालाच त्या देशांतील लोकांना राजा करून दिलें. **एलिनोर** राणीच्या चार पुत्रांपैकीं तो **एड्वर्ड**च काय तो तिच्यामागें जिवंत राहिला. त्या मुलावर **वेल्श** लोकांचें फारच प्रेम जडलें, आणि तोच पहिला **इंग्लिश प्रिन्स आफ् वेल्स** (इंग्लिश जातीपैकीं वेल्सचा राजा) झाला. तोच पुढें **इंग्लंडचा** राजा होऊन, त्याला १३०७ त राज्याभिषेक झाला.

वेल्स देश जिंकला, १२८२.

इंग्लिश जातीचा पहिला प्रिन्स आफ् वेल्स, १३०१.

तेव्हां, (पूर्वी सांगितलेल्या भाकिताप्रमाणें) निदानीं जन्मानें **वेल्श** अशा **वेल्शांच्या** राजाला **लंडन** एथें राज्याभिषेक झाला.

पुढलीं बारा वर्षें मुख्यत्वें कायद्यांच्या सुधारणा करण्यांत घालविलीं. त्या सुधारणा आमच्या हालींच्या दिवसांपर्यंत टिकल्या आहेत. त्या बारांपैकीं तीन वर्षें **एड्वर्ड** हा **इंग्लंडांत** नसून परदेशीं गेलेला होता. जमिनीच्या संबंधाचे कायदे फार काळजीनें सुरळीत करून सुधारले, आणि **"स्टाटूट आफ् मार्टमेन,"** नांवाचा कायदा पसार केला. त्या कायद्यानें, **मार्टमेन,** म्हणजे मृतहात, ह्याला, कोणीं जमीन दान केली किंवा बक्षीस दिली तर ती जमीन सरकारी परवान्यावांचून घेऊन उपभोगूं नये, अशी मनाई केली. जाहागीर-जमीन देवळांच्या व्यवस्थापकांला व धर्मसंबंधी मंडळ्यांना दिली म्हणजे जाहागीर-शिरस्त्याप्रमाणें त्या जमिनीच्या संबंधानें सरकारची नौकरी त्या व्यवस्थापकांला किंवा मंडळ्यांना करावी लागत नसे, म्हणून ते व्यवस्थापक किंवा मंडळ्या त्या नौकरीपुरते लक्षणेनें मृतहातच होत. सारांश, सरंजाम किंवा जाहागीर देण्याच्या शिरस्त्याप्रमाणें जमिनीबद्दल धनी-जाहागीरदाराची किंवा सरकारची नौकरी करावी लागे, ती टाळण्यासाठीं ढोंग करून कोणी लोक आपली जमीन देवळाला, किंवा धर्मसंबंधी मंडळ्यांना देत, ती वहिवाट त्या कायद्यानें मुळीं बंद केली. **एड्वर्डच्या** कारकीर्दीपर्यंत सारीं न्यायाचीं कोडतें

मार्टमेनचा स्टाटूट १२७९.

जस्टिशियर ह्या नांवाच्या कामदाराच्या अधिकाराखालीं एकत्र केलेलीं असत, तीं ह्या काळाच्या सुमारास विभागून त्यांचीं तीन बेगळालीं कोडतें केलीं, तीं येणेंप्रमाणें. (१) **किंग्स बेन्च**

न्यायसंबंधी कोडतांचीं व्यवस्था.

(राजाचें न्यायासन म्हणजे त्या न्यायासनावर बसणारा न्यायाधीशवर्ग) ह्या नांवाचें कोडत, ह्यांत सार्वजनिक मुकदम्यांची चौकशी होई. (२) **कोर्ट आफ् कामन प्लीझ** (सामान्य मुकदम्यांचें कोडत) नांवाचें कोडत, ह्यांत लोक आपआपले खासगी वाद, खटले, किंवा मुकदमे आणीत. आणि (३) **कोर्ट आफ् धि एक्सचेकर** (जमाबंदी संबंधाचें कोडत) नांवाचें कोडत, ह्यांत राजाच्या जमाबंदी संबंधाच्या मुकदम्यांची चौकशी होई. **चान्सेलर** (पंडितराव) हा अधिकारी, "अनुग्रह आणि प्रसाद" ह्यांकरितां म्हणून खालील कोडतांवर लोक राजाकडे अपीलें करीत, त्या अपीलांच्या संबंधानें जे धर्मशास्त्राचे प्रश्न उत्पन्न होत त्यांचा विचार करून निर्णय करी. ह्या प्रकारें **चान्सेलर** हा अधिकारी, **तिसऱ्या एड्वर्डा**ची कारकीर्द येई तोंपर्यंत, हळू हळू, ज्या कोडताला **कोर्ट आफ् चान्सेरी** (सदर अदालत) असें नांव पडलें, त्या कोडताचा मुख्य न्यायाधीश झाला. शेवटीं ह्या तीन्ही कोडतांतील एकाही कोडताकडून वादांचा निर्णय होत नसे असे वाद, "**प्रिव्हि कौन्सिल**" (खुद्द निसबतीचें मंत्रिमंडल) ह्यासमवेत राजा ह्याकडे, साऱ्या अन्यायाचें क्षालन होऊन शुद्ध न्याय व्हावा म्हणून येत.

एड्वर्डाला ह्यापुढला दुसरा घोर म्हटला म्हणजे, देशांत लुटालूट होई आणि घाले पडत, ते बंद करण्याचा होता. ह्या काळीं पुंड बेकैद लोकांच्या मोठमोठ्या टोळ्या, लूट, आणि ढोरपट्टी, कोंबडी-

१. १८७५ त, न्यायाच्या कोडतांची काम करण्याची वहिवाट पालटून दुरुस्त केली, तेव्हां हें चान्सरीकोडत, "हाइ कोर्ट आफ् जस्टिस" (न्यायाचें सर्व वरिष्ठ कोडत) म्हणून नवीन कोडत केलें त्या कोडताची "चान्सरी डिव्हिजन" (चान्सरी नामक शाखा) नांवाची एक शाखा झाली, आणि त्यांत दुसरे अनेक प्रकारचे फेरफार केले.

पट्टी वगैरे प्रकारच्या पट्ट्या, ह्यांवर उपजीविका करून राहत. एका प्रसंगीं तर खेड्यापाड्यांत राहणाऱ्या सभ्य गृहस्थांच्या एका समुदायानें, **लिंकनशायरांतील बास्टन** नांवाच्या बंदरीं भरलेल्या मेळ्यांत जबरीनें शिरून, तेथील व्यापाऱ्यांना ठार मारून व लुटून, लुटींत मिळालेला माल, त्या बंदरच्या धक्क्याजवळ पूर्वींच तारवें आणून ठेवलेलीं होतीं, त्यांवर नेऊन चढविला. ह्यांसारख्या भालेराया, किंवा जुलूम—जबरदस्त्या, बंद करण्यासाठीं एक नवीन कायदा केला. त्यानें, हाकाटा झाल्याबरोबर लुटारूंना पकडण्यासाठीं निघालेल्या लोकांस प्रत्येक पुरुषानें हत्यारबंद होऊन जाऊन मिळालेंच पाहिजे, असें त्याला बांधून टाकलें. १२८५ त प्रत्येक शायरांत **"स्वस्थता राखणारा"** ह्या अधिकाराचें काम करण्याकरितां, आणि गुन्ह्यांबद्दल सजा होते कीं नाहीं हें पाहण्यासाठीं शेरिफ्फावर नजर ठेवण्याकरितां, एक एक नाइट-पदवीचा गृहस्थ निवडून नेमला. हे स्वस्थता राखणारे, पुढें आमचे **"जस्टिसिझ आफ् धि पीस"** (स्वस्थता राखणारे न्यायाधीश), किंवा **"कौंटी माजिस्ट्रेट"** (कौंटींतले माजिस्त्रेट म्हणजे फौजदारी न्यायाधीश) झाले. ते अधिकारी, आतां प्रत्येकीं आपआपल्या आसपास घडणाऱ्या गुन्ह्याबद्दल चौकशी करून सजा करतात.

स्वस्थता राखणारे, १२८५.

ह्या उपयुक्त सुधारणांमध्यें, **जू** किंवा **यहूदी** लोकांना देशांतून घालवून दिलें, ही गोष्ट खेदकारक कलंकासारखी होती. पुष्कळ कारकीर्दींतून राजांनीं जू लोकांचें मुद्दाम रक्षण केलेलें होतें, त्यामुळें व्याजबट्टा करून ते अधिकाधिक मातबर होत गेलेले होते. बडे लोक, त्या जू लोकांकडून, छोट्या छोट्या जमीनदारांचा वारंवार

जू लोकांना देशांतून घालवून दिलें, १२९०.

नाश करवीत, तो प्रकार असा. **जू** लोकांकडून त्या जमीनदारांना पैसा उसना देववावा, आणि त्या पैशाच्या फेडीकरितां त्यांना त्यांच्या जमिनी हिरावून घेण्यास लावावें. ह्यास्तव लोक **जूं**चा द्वेष करीत. नाण्यांच्या कडा किसून, किंवा कातरून काढून, ते **जू** फायदा मिळवीत, आणि त्यांच्या दुसऱ्या पुष्कळ अप्रामाणिकपणाच्या वहिवाटी होत्या, असेही त्यांवर आरोप होते, ते कदाचित् खरे असतील. ह्या पूर्वींच, जेव्हां **पहिल्या रिचर्डला** राज्याभिषेक झाला तेव्हां, **लंडनांत** आणि **यार्कांत जू** लोकांची फार भयंकर कत्तल झालेली होती, आणि **"बारनांच्या युद्धांत" जूंचे** महल्यामागून महले लुटले. **ग्रास्सटेस्ट,** आणि **साइमन डि मान्टफर्ट,** ह्या उभयतांचीही **यहूद्यांना** देशपार करण्याची इच्छा होती, आणि आतां **एड्वर्डानें,** जे **यहूदी ख्रिस्ती** न होतील, त्या सर्वांनीं **इंग्लंड** सोडून जावें असा हुकूम केला. त्यानें त्यांना आपापली संपत्ति नेऊं दिली, आणि त्यांना देशपार घालवून दिल्याच्या योगें त्यानें स्वतःला द्रव्य मिळविण्याचें एक साधन गमावलें. परंतु एकंदरीनें तें क्रूर कर्म होतें, आणि खाडी ओलांडून **फ्रान्स** देशीं जातांना त्या **यहूद्यांपैकीं** पुष्कळांना लुटलें, आणि अनेकांचीं जहाजें फुटलीं. त्या प्रसंगांत सोदे लुचे होते त्यांच्याबरोबर चांगल्यांनाही हालअपेष्टा भोगावी लागली. त्या काळापासून पुढें **क्राम्वेल्लाच्या** कारकीर्दीपर्यंत **इंग्लंडांत यहूदी** लोक नव्हते.

हें जुलुमाचें कृत्य असेल तर असो, परंतु **एड्वर्डानें, पार्लमेंटास** नाइट आणि शहरांत राहणारे सामान्य लोक बोलावण्याची **साइमन डि मान्टफर्टाची** कल्पना स्वीकारली, हें तर लोकांचें स्वातंत्र्य वाढविणारें मोठें महत्त्वाचें कृत्य होतें. हा वेळपर्यंत त्याला द्रव्याच्या देणग्या **पार्लमेंटांत** येणारे बारन आणि बिशप यांक-

डून मात्र मिळत. परंतु शायरें, नागरीकजन, आणि सामान्य धर्मोपदेशक, ह्यां प्रत्येकांला **पार्लमेंटा**बाहेर द्रव्याकरितां वेगवेगळें मागणें करावें लागे, आणि तसें करणें वारंवार फार जिकीरीचें असे. आतां दरएका शायरांतून दोन नाइट, दरएका बरोंतून (सनदी गांवांतून, किंवा नगरांतून) दोन बर्जेस्स (नागरिक लोक), आणि दरएका बिशपाच्या ताब्यांतील प्रांतांतून दोन धर्मोपदेशक, ह्याप्रमाणें लोक **पार्लमेंटास** बोलावल्यानें, ते आपआपली निवडणूक करणाऱ्या लोकांच्या वतीनें वचनें देऊन द्रव्य देऊं शकत. शिवाय, **एड्वर्ड** रीतीचेंच म्हणे, त्याप्रमाणें, "ज्याचा सर्वांशीं संबंध तें सर्वांनीं पसंत केलें पाहिजे," ही गोष्ट नीतीचीच होती. ह्याप्रकारें १२९५ त राजाच्या हुकमानें, भरपूर आणि अन्यून असें पहिलें **पार्लमेंट** पाचारण करून भरविलें. बडे लोकांना बोलावणें प्रत्येकाला त्याच्या त्याच्या नांवानें केलेलें होतें. नाइट आणि बर्जेस्स ह्यांना शेरिफ्फाचें **"रिट,"** म्हणजे कायदेशीर लेखी ताकीद, पाठवून केलेलें होतें. हें **पार्लमेंट** बहुतअंशीं आमच्या हालींच्या **पार्लमेंटा**सारखें होतें. इतकाच फरक कीं, बडे लोक, आणि कामन्स (सामान्य दरजाचे लोक) हे सर्व एकत्र बसत. त्यांमध्यें धर्मोपदेशकही असत. पुढें धर्मोपदेशकांनीं **पार्लमेंटास** येणें नाकारिलें. त्यांचे समाज किंवा संघ जमत त्यांतच राजाला द्यावयाच्या पैशाविषयीं संमति देणें त्यांला प्रशस्त वाटे, आणि आतां **"हौस आफ् कामन्स"** नांवाच्या लोकप्रतिनिधीच्या सभेंत धर्मोपदेशक नसतात त्याचें कारण हेंच. दुसऱ्या कांहीं गोष्टींनींही हीं प्राचीन **पार्लमेंटें** आमच्या हालींच्या **पार्लमेंटांहून** भिन्न होतीं. त्या काळीं,

पहिलें भरपूर पार्लमेंट, १२९५.

सभासदांना जातखर्च म्हणून वेतन द्यावें लागे.

प्रत्येक वेळीं पार्लमेंट भरे, तेव्हां नवीन निवडणूक होत असे, आणि लोकांना, त्यांतील सभासदांना जातखर्चाबद्दल वेतन द्यावें लागे—बर्जेस्युला दररोज दोन शिलिंग, आणि नाइटाला चार शिलिंग. हे दोन शिलिंग सुमारें हालींच्या पांच शिलिंगांबरोबर, आणि चार शिलिंग, हालींच्या दहा शिलिंगांबरोबर असत. शिवाय, सभासदांना तो उपद्याप, आणि लोकांना तो खर्च, फारसा आवडत नसे. आणखी त्या काळीं लोक, प्रत्येक पार्लमेंट भरणें, म्हणजे केवळ राजाला अमुक पैसा पुरवा म्हणून एक नवीन मागणीच, असें मानीत, आणि आपल्या वतीं पार्लमेंटांत बोलावयास प्रतिनिधि असल्यानें आपणांला पुढें एकाद्या दिवशीं केवढी सत्ता मिळणार आहे, हें लोकांच्या ध्यानींमनींही आलें नाहीं.

स्काट लोकांना राजा राहिला नाहीं, १२९०.

इंग्लंड व स्काट्लंड ह्या दोहों राज्यांच्या दरम्यान सुमारें १०० वर्षेपर्यंत सल्ला असून, पहिलें पूर्ण पार्लमेंट भरल्यानंतर एका वर्षानें एड्वर्डाला, प्रसंग येऊन, स्काट्लंडाशीं युद्ध करण्याची प्रवृत्ति झाली. १२८६ त स्काट्लंडाचा तिसरा अलेक्झांडर राजा मरण पावला, तेव्हां त्याच्या गादीला उजू वारीस म्हटला म्हणजे, काय ती त्याची मार्गरेट नांवाची नात होती. ती वयानें लहान असून नार्वेचा राजा एरिक ह्याची मुलगी होती. १२९० च्या उष्ण काळांत, ही अल्पवयस्क "नार्वेची कुमारी," केर्नार्व्हनचा राजपुत्र एड्वर्ड ह्याशीं तिचा पुढें विवाह करावयाचा ह्या संबंधानें पूर्वी तिचा वाग्दानविधि होण्याकरितां नार्वेहून येत होती, तों ती तितक्यांत वारली, त्यामुळें स्काट लोकांना गादीवर कोणी राजा किंवा राणी राहिली नाहीं. तेव्हां तद्देशीय पांच बडे लोक त्या रिकाम्या गादीवर वारसा सांगूं लागले.

त्यांतून कोणाला गादी द्यावी हें ठरविण्याचें काम, **एड्वर्ड** हा **स्कॉट्लंड**चा अधिराज होता म्हणून, त्याच्याकडे **स्काच कौन्सि-लानें** (मंत्रिमंडलानें) सोंपवलें. ह्यास्तव सरहद्दीवर **बेरिक** नजीक **नार्हाम** एथें **स्काच पार्लमेंटाला एड्वर्ड** जाऊन भेटला, आणि त्यानें त्यांकडून, मी **स्कॉट्लंडाचा फ्यूडल लार्ड** (जाहगीर देण्याच्या शिरस्त्याप्रमाणें धनी) आहें, असें कबूल करून घेतल्यावर, त्या दावा सांगणाऱ्या पांचांपैकीं तीन मुख्य प्रतिस्पर्धी होते त्यांच्या हक्कांची फार काळजीनें त्यानें चौकशी केली. त्या तिघांचीं नांवें येणेंप्रमाणें, **जान बेलियल, राबर्ट ब्रूस,** आणि **जान हेस्टिंग्स. स्कॉट्लंड**चा राजा **पहिला डेव्हिड** ह्याच्या वंशापासून उत्पन्न झालेल्या तिघां बहिणींचे ते तिघे वंशज होते. **एड्वर्डानें** त्या तिघांतून **जान बेलियल**[१] ह्याला पसंत केलें. तो त्या तिघी बहिणींत जी सर्वांहून वडील होती तिचा नातू होता. त्यानें **स्कॉट्लंड**चा राजा **जान** ह्या नांवानें **एड्वर्डाला** सेवांजलिसंस्कार (धन्याचा मानपान) केला. नंतर थोड्या काळापर्यंत सर्व व्यवस्था नीट चालली. परंतु **एड्वर्डाला, फ्यूडल लार्ड** (जाहगीर देणारा धनी) ह्या नात्यानें, **स्कॉट्लंडावर** योग्य होती तीहून जास्त सत्ता पाहिजे होती. **स्काच कोर्टांच्या** निकालांवर **स्काच** बडे लोकांनीं आणि शहरांतून राहणाऱ्या लोकांनीं आपणाकडे अपीलें करावीं असा त्यानें आग्रह धरला, आणि जेव्हां **गिएन** नांवाच्या प्रांतासंबंधानें **फ्रान्स** देशच्या राजाशीं युद्ध करण्यास प्रसंगानें तो प्रवृत्त झाला, तेव्हां त्यानें **स्काच** बडे लोकांस

जान बेलियल ह्याला राजपदाकरितां पसंत केलें, १२९२.

१. ह्या पुरुषाच्या बापानें आक्सफर्ड एथील बेलियल कालेज (पाठशाळा) स्थापिलें.

लढण्यास जाण्यासाठीं आपल्या समागमें या म्हणून पाचारण केलें. परंतु त्यांनीं येत नाहीं म्हणून मोठ्या धुश्शानें सांगितलें, आणि **इंग्लंड**चा आपणांवरील ताबा उडवून देण्याला ते उत्सुक होते, त्यामुळें त्यांनीं **फ्रान्स** देशाच्या राजाशीं गुप्त तह करून, **इंग्लंड**ची सरहद्द ओलांडून आंत शिरून **कंबर्लंड** प्रांताचें वाटोळें करून टाकलें.

हें ऐकून **एड्वर्डा**ला फार संताप आला. नंतर आपल्या बदली **गास्कनी**स आपल्या भावाला पाठवून, तो उत्तरेकडे मोठ्या सैन्यानिशीं कूच करून निघाला, त्यानें **बेरिक** शहर हल्ला करून घेतलें, आणि तेथील रहिवाशांच्या छद्मी भाषणांनीं पिसाळून त्यानें निर्दयपणानें त्या सर्वांची कत्तल उडवली. नंतर **बेलियल** अजून आपणाला जुमानीत नाहीं असें पाहून, त्यानें **एडिंबरो, स्टर्लिंग,** आणि **पर्थ,** हीं शहरें हस्तगत केलीं, आणि **मान्ट्रोझ** एथें **बेलियला**ला पकडून कैदकरून **इंग्लंडा**ला पाठवून दिलें. पुढें त्यानें **स्काट्लंडा**चा राज्यकारभार चालविण्यासाठीं एक **इंग्लिश कौन्सिल** (मंत्रिमंडल) नेमलें, आणि तेथील दौलतीकडील जवाहीर, आणि **स्काच** राजांना ज्या पाषाणावर बसवून राज्याभिषेक करीत तो **स्कोन**चा पवित्र पाषाण, हीं सारीं तो **इंग्लंडा**स घेऊन गेला. **वेस्टमिन्स्टर आबीं**त (मठांत) राजकीय खुरची (सिंहासन) म्हणून आहे, तिची बैठक त्या पवित्र पाषाणाची बनविली, आणि आजवर आमच्या राजांना त्या बैठकीवर बसवून राज्याभिषेक होत असतो. **स्काट** लोक त्या समयीं प्रसिद्ध रीतीनें भाकीत म्हणून बोलले कीं, तो पाषाण जेथें कोठें जाईल, तेथें आगेंमागें, **स्काटिश** राजे राज्य करतील; आणि त्यांचें तें भविष्य, प-

स्काट्लंडांतील पहिलें युद्ध, १२९६.

हिल्या **जेम्स** राजाला **इंग्लंड**च्या गादीवर बसवून राज्याभिषेक झाला, तेव्हां खरें झालें.

वेल्स देश जसा, तसें **स्काट्लंड**ही आतां आपण पुरें जिंकलें असें **एड्वर्डाला** वाटूं लागलें. परंतु ज्या लोकांशीं प्रसंग होता, त्यांना त्यानें ओळखलें नाहीं. **स्काट** लोक मोठे मानी, रगेल, किंवा तवरी होते. त्यांचें स्वातंत्र्य गमावल्यामुळें ते तडफड करूं लागले, आणि

वुइलियम वालेस, १२९७.

जेव्हां, **वुइलियम वालेस** नांवाचा एक न्यायबहिष्कृत शूर नाइट होता त्यानें बंडाचा झेंडा उभारला, तेव्हां लोक थव्यांच्या थव्यांनीं येऊन त्याला मिळाले. तो **वालेस** धाडसी आणि हिकमती होता. त्यानें, **लानार्क** एथें रखवालीसाठीं ठेवलेली **इंग्लिश** शिपायांची तुकडी होती, ती सारी कापून टाकली, **स्कोन** नांवाच्या ठाण्यांत तो झपाट्यानें शिरला, आणि तेथें **इंग्लिश जस्टिशियर** होता, त्याला त्यानें पिटाळून लावलें. नंतर **सर वुइलियम डग्लस** नांवाचा दुसरा एक न्यायबहिष्कृत पुरुष होता त्याच्या कुमकेनें, **स्टर्लिंग** एथें त्यानें **इंग्लिश** फौजेचा पराभव केला, आणि **जान** राजाच्या वतीनें मी "**राज्याचा रखवालदार**" झालों आहें असा सर्वत्र डंका पिटला.

ह्या वेळीं **एड्वर्ड फ्लांडर्स** देशांत होता. त्या देशांतील बंदरांत **इंग्लंडां**तून गेलेली लोंकर **फ्रान्स** देशाचा राजा **चौथा फिलिप** जप्त करवूं लागला, म्हणून **फ्लेमिंग्स** लोकांना त्या **फिलिपा**विरुद्ध पाठबळ देण्याकरितां **एड्वर्ड** त्या देशीं गेलेला होता. त्याच समयाला **एड्वर्डा**वर आलेलीं अरिष्टें फार अवजड होतीं. **आयर्लंडां**त चळवळ चालली होती तीमुळें तें अस्वस्थ होतें, **वेल्स** देशांत बंड उत्पन्न झालें होतें, आणि **फिलिप**, त्याला ठक-

-वून, **गिएन** त्यापासून काढून घेण्याच्या प्रयत्नांत होता. **एड्वर्ड** पैशाकरितां अडचणलेला होता, म्हणून त्यानें साऱ्या धर्मोपदेशकांकडे आपआपल्या दरसालच्या उत्पन्नापैकीं अर्धें उत्पन्न द्यावें असें मागणें केलें. परंतु पोपाच्या हुकुमानें त्यांनीं तें देत नाहीं म्हणून सांगितलें. तेव्हां शेवटीं, तें मागितल्याप्रमाणें अर्धें उत्पन्न न देतील तर त्यांना न्यायाच्या कोडतांतून न्याय किंवा संरक्षण बिलकूल मिळूं नये असें करून, त्यानें त्यांना जेरीस आणलें. नंतर **इंग्लिश** बडे लोकांपैकीं कांहींनीं, आम्ही **गिएन**मध्यें लढावयास जात नाहीं, असल्या परदेशांतील मुलुखाबद्दल आम्ही परवा करीत नाहीं, आणि स्वदेशींच आम्हांस लढण्याला पुरतील अशीं पुष्कळ युद्धें आहेत, असें सांगितलें. **फ्रेंच** राजाविरुद्ध आपला **फ्रान्सां**तील मुलूख हर प्रयत्न करून रक्षण करण्याची **एड्वर्डास** चिंता होती म्हणून, त्यानें लोकांवर करांचें ओझें लादलें. त्यानें लोंकरीवर पूर्वी द्यावा लागे त्यापेक्षां सहापट ज्यास्ती कर वाढविला, कौंटींना अन्नसामग्री पुष्कळ पाठविण्यास ताकीद केली, आणि खेड्यापाड्यांत राहणाऱ्या गृहस्थांना नाइट पदवी घ्या म्हणून आग्रह केला. पण तीकरितां त्यांना फी म्हणून पुष्कळ द्रव्य द्यावें लागे. शिवाय त्यानें साऱ्या जमीनदार लोकांना युद्धासाठीं शिपाई घेऊन या म्हणून पाचारण केलें. ह्या त्याच्या कृतीनें **पार्लमेंट** बिथरलें, आणि जेव्हां त्यांतील सभासदांनीं अन्यायाचे कर बसविल्याचा त्यावर दोषारोप केला, तेव्हां ज्या मनाच्या थोरवीबद्दल त्याची प्रजा त्याला चाही, त्या थोरवीनें किंवा महात्मतेनें, माझ्याकडून अन्याय झाला, असें त्यानें कबूल केलें. परंतु **इंग्लंड**च्या नांवरूपाकरितां मीं ती गैरगोष्ट केली, असें कारण

एड्वर्ड जबर कर बसवितो, १२९७.

सांगून त्यानें आपल्या कृतीचें समर्थन केलें, आणि त्या सभासदांच्या इमानीपणाबद्दल त्यांचें गौरव करून त्यांना आपणाला साहाय्य करण्याविषयीं त्यानें आळविलें. नंतर **पार्लमेंटानें** त्या युद्धाला आपलें अनुमत दिलें. परंतु त्यानें **एड्वर्डा**च्या मागोमाग **फ्लांडर्स** देशांत त्याच्याकडे एक चार्टर, म्हणजे सनद, तयार करून पाठविली. तीवर **एड्वर्डानें** सही केली. तींत, **पार्लमेंटा**च्या अनुमतावांचून यापुढें कधींही पट्या किंवा कर बसवून पैसा उकळणार नाहीं, आणि खर्चाकरितां नवीन पैक्याची रकम **पार्लमेंटानें** देण्याच्या पूर्वी प्रजेला जाच असतील त्यांची मी नेहमी दाद घेऊन दूर करीत जाईन, असें इतर गोष्टींबरोबर वचन होतें.

पार्लमेंट नवीन चार्टर (सनदा) जबरीनें करून घेतें, १२९७.

आणि आतां **फ्रान्स** देशाशीं युद्ध असलें अवजड प्रकरण त्याच्या हातीं असतां, **स्काट** लोकांनीं **इंग्लंड**च्या उत्तर भागाची कशी नासाडी मांडली होती, हें **फ्लांडर्स**मध्यें **एड्वर्डानें** ऐकलें. तेव्हां तो एकदम स्वदेशीं माघारा आला, आणि कूच करून **स्काटलंडास** गेला. त्याची आणि **वालेसा**ची त्याच्या फौजेसहित **फाल्कर्क** एथें गांठ पडली. तेव्हां त्या ठिकाणीं एक मोठी विख्यात लढाई झाली. तींत **स्काट** लोक शौर्यानें लढले, आणि आमचे शिपाई अजून जसे कोट बांधून त्यांतून लढतात, तशा कोटांसारखे **वालेसानें** आपल्या फौजेचे मोठ्या चातुर्यानें जथे बांधलेले होते. परंतु **इंग्लिशां**ची संख्या एकास तीन ह्या मानानें असून, त्यांचे तीरकमानवाले साऱ्या दुनियेंत उमदे असे होते, त्यांनीं त्या जथ्यांत एक खिंडार पाडलें, त्यांत **इंग्लिश** घोडेस्वार इतके पु-

फाल्कर्कची लढाई, १२९८.

ष्कळ एकदम घुसले कीं त्यांनीं शत्रूला दडपून टाकलें. सारांश, स्काट लोकांची कत्तल उडाली, आणि त्यांच्या फौजेचा विध्वंस झाला. एड्वर्डानें बंड करणाऱ्या बडे लोकांना क्षमा केली, परंतु वालेस निसटून पळून गेला, आणि एड्वर्ड क्षमा करण्यास तयार असतां ती त्यानें स्वीकारली नाहीं. पुढें सात वर्षांनीं जाक शार्ट नांवाच्या त्याच्या नौकरानें विश्वासघातानें त्याला डंबार्टन एथील किल्ल्याचा सुभेदार सर जान मान्टीथ ह्याच्या हातीं दिलें, आणि त्याला १३०५ त आगस्टच्या २४ व्या तारिखेस टौअरहिल्ल नांवाच्या टेंकडीवर फांशीं दिलें.

वालेसाला फांशीं दिलें, तारीख २४ आगस्ट १३०५.

फाल्कर्कच्या लढाईनंतर आठ वर्षेंपर्यंत एड्वर्डानें स्काट व इंग्लिश ह्यांना एकत्र करून दोहोंची मिळून एक रयासत किंवा शाई करावी म्हणून प्रयत्न केला, परंतु तो व्यर्थ गेला. स्काटांतल्या बडे लोकांनीं बेलियलचा पुतण्या किंवा भाचा जान कामिन ह्याला आपला नायक करून सतत बंडें केलीं, परंतु शेवटीं १३०४ त सलूख्याचा कांहीं लाग दिसूं लागला. दरम्यानच्या काळांत, एड्वर्डाच्या दरबारांत राबर्ट ब्रूस नांवाचा एक शूर तरुण स्काच अमीर उदयास येत होता. त्याचे कारिकचा अर्ल आणि आनन्डेलचा लार्ड हे किताब होते, आणि १२९१ त स्काट्लंडच्या गादीविषयीं जो प्रतिस्पर्धा करणारा राबर्ट ब्रूस त्याचा तो नातू होता. एड्वर्डाला त्याची अर्धवट भीति वाटत असे, म्हणून त्यानें त्याला आपल्या जवळ बाळगलेला होता, आणि एड्वर्ड इंग्लिश आणि स्काट ह्यांच्या मि-

ब्रूस हा कामिनाचा खून करतो, फेब्रुअरी १३०६.

सळीचें **कार्लाइल** एथें एक **पार्लमेंट** भरविण्याचा बेत करीत होता, तों एके दिवशीं, **ब्रूस स्काट** लोकांशीं कांहीं फंदफितूर करीत आहे, अशी **कामिन** ह्याच्या द्वारें त्याला वार्ता कळली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं **ब्रूस** नाहींसा झाला, आणि त्याविषयीं दुसरें म्हणून वर्तमान कळलें तें हें कीं, त्यानें **डंफ्रिझ** एथील देवळांत **कामि-नाशीं** कज्या केला, **कामिनाला** ठार मारलें, आणि त्या गांवांतील **इंग्लिश** न्यायाधीशांना हाकवून दिलें.

ब्रूसानें आरंभींच केलेलें हें कर्म वाईट होतें, कारण **कामि-नाला** देवळांत ठार मारणें हा एक तर खून, आणि दुसरें तें पवित्र स्थान असल्या पापकर्मानें बाटविणें होय. असें असतां एक बडे लोकांची टोळी **ब्रूसाच्या** भोंवतीं जमली, आणि पुढें सहा आठव-ड्यांनीं, **माकडफ्फ** ह्या उपनांवाच्या घ-राण्यापैकीं **बकनची कौंटेस्स** (कौंटची बायको) म्हणून एक हिमतदार बायको होती तिनें त्याला **स्कोन** एथें मुकुट घालून राज्याभिषेक केला. अशी एक दंतकथाही होती कीं नेहमी **मा-कडफ्फ** घराण्यांतील माणसानें **स्काट** लोकांच्या राजाच्या मस्तकीं मुकुट घातला पाहिजे. **एड्वर्ड** राजानें ही खबर **वुइन्चेस्टर** एथें ऐकली. तेव्हां तो दुखणेकरी, म्हातारा, आणि काळजीनें झिजलेला असा होता, तथापि त्यानें पुनः एकवेळ **स्काट्लंडावर** स्वारी कर-ण्याचा निश्चय केला. निघण्याच्या पूर्वीं, त्यानें आपला पुत्र **प्रिन्स आफ वेल्स** ह्याला, **नाइट्स टेम्प्लर्स** ह्या नांवाचा एक शिपाई जोगी ह्यांचा पंथ होता, त्यांच्या चापेलांत (खासगी उपासनेकरितां लहानसें देऊळ होतें त्यांत) मोठ्या समारंभानें व थाटानें, **नाइट** पदवी दिली.

रावर्ट ब्रूस ह्याला स्काट्लंडचा राजा करून राज्याभिषेक केला, तारीख २५ मार्च १३०६.

त्या चापेलाला आतां **टेंपल** असें म्हणतात. त्या समारंभा संबंधानें जी पाठोपाठ मेजवानी झाली, तींत **कामिना**च्या खुनाबद्दल मी बलात्कारानें सूड घेईन म्हणून **एडूवर्डा**नें शपथ घेतली, आणि मी मेलों तर माझें शव **स्काटूंड** सर होई तोंपर्यंत फौजेच्या पुढें नेत असावें अशी त्यानें आपल्या लोकांना आज्ञा केली.

एड्वर्डाचा शेवटचा प्रवास, १३०७.

नंतर सावकाशपणें प्रवास करीत तो **कार्लाइला**स गेला, आणि फौज **पेंब्रोक**चा **अर्ल** ह्याच्या हुकमतीखालीं त्यानें पुढें पाठवली. त्या **अर्ला**नें **स्काटिश** बडे लोकांपैकीं पुष्कळांना धरून कैदकेलें, आणि **ब्रूसा**ला पिटून लावलें तेव्हां तो पळत सुटून **ग्रांपियन हिल्स** नांवाच्या डोंगरांत शिरला. मग पुनः एक वेळ कोपानें अतिशय निर्दय प्रकाराचा सूड घेण्याविषयीं **एड्वर्ड** प्रवृत्त झाला; कैदकेलेल्या बडे लोकांना फांशीं दिलें, आणि **बुकनची कौंटेस्स** हिला **बेरिक**च्या किल्ल्याच्या तटावर एका लांकडी पिंजऱ्यांत घा-

---

१. **नाइट्स टेंप्लर्स** हा मंकांचा (जोग्यांचा) श्रीमान पंथ असून धर्मयुद्धांच्या काळांत उत्पन्न झालेला होता. तो पुढील कारकीर्दींत(१३०९–१३१२) **इंग्लंडां**त, व तसाच इतर देशांतही, **पोपा**च्या हुकमानें मोडला. **पोपा**ला तो मोडण्याविषयीं **फ्रान्स** देशचा राजा **फिलिप** ह्यानें चिथविलें. कारण, त्या **फिलिपा**ला आपल्या देशांतील त्या **टेंप्लरां**च्या संपत्तीविषयीं लोभ उत्पन्न झालेला होता. त्या **टेंप्लरांची इंग्लंडां**तील मालमत्ता **नाइट्स आफ् सेन्ट जान** ह्यांना मुख्यत्वेंकरून दिली. त्या **नाइटां**नीं आपल्या **टेंपला**चा (देवळाचा) एक भाग धर्मशास्त्र शिकणारे विद्यार्थी ह्यांस भाड्यानें दिला होता. पुढें तो भाग **इन्स आफ् कोर्ट** धर्मशास्त्र शिक्षणाचीं विद्यालयें म्हणून जीं आतां आहेत त्यांपैकीं एक **इन्न आफ् कोर्ट** कसा झाला, हें ह्यावरून समजेल.

लून ठेवलें. परंतु मृत्यूचा पंजा झडप घालण्यासाठीं त्या सूड घेणाऱ्या राजाच्या मस्तकावर उभारलेला होता, आणि त्या राजानें तसेंच पुढें रेंटीत जाण्याचा प्रयत्न केला, परंतु स्काट्लंड त्याच्या दृष्टीच्या टप्प्यांत आलें असतां, **बर्घ-आन्-धि-सांड्स** (पुळणी-वरील गांव) नांवाच्या गांवीं, १३०७ त जूलईच्या ७ व्या तारिखेस, तो मृत्यु पावला. त्याचा वडील पुत्र **एड्वर्ड प्रिन्स आफ् वेल्स** ह्याशिवाय, त्याची दुसरी बायको **फ्रान्सची मार्गरेट** हिच्यापासून झालेले दोघे पुत्र त्याच्या मागें राहिले.

दुसरा एड्वर्ड (केर्नार्व्हनचा), १३०७–१३२७.

पहिला एड्वर्ड ह्या वृद्ध राजाच्या मृत्यूनें साऱ्या गोष्टींचा ओघ पालटला. जर **पहिला एड्वर्ड** जिवंत असता, तर निदान कांहीं वेळपर्यंत तरी **ब्रूस** जिंकला गेला असता ह्यांत संशय नाहीं. परंतु उत्तम आणि समर्थ मातापितरांचा पुत्र तो तरुण **एड्वर्ड** छिछोर, आणि आळशी होता. त्याचे बाळपणीं फारच लाड झालेले होते, आणि त्यानें लहानपणींच आपल्या बापाला फार त्रास दिलेला होता. आतां तो वयानें तेवीस वर्षांचा झालेला असून, रूपानें सुंदर, स्वभावानें हेकेखोर, आणि हलकट सोबती, ख्यालीखुशाली, आणि वेडेचार, ह्यांचा शोकी होता. पुढें वीस वर्षांनीं त्याचा खेदकारक शेवट झाला त्यानें देखील, असल्या गयाळ राजाविषयीं आम्हांला क्वचित् कळकळ वाटेल.

त्याच्या बापानें मृत्युशय्येवर असतां त्याला तीन आज्ञा करून ठेवलेल्या होत्या, त्या येणेंप्रमाणें. (१) **स्काट्लंड** सर होई तों

आरंभलेलें युद्ध पुढें चालवावें; (२) माझें हृत्कमल (काळीज) काढून पुण्यभूमीला पाठवावें; आणि (३) पीयर्स गाव्हेस्टन नांवाचा एक दुराचारी गास्कन (गास्कनींतील रहिवासी) होता, (ह्याला पहिल्या एड्वर्डानें देशपार केलेलें होतें) त्याला कधींही परदेशांतून पुनः बोलावून आणूं नये. दुसऱ्या एड्वर्डानें त्या तिन्ही आज्ञांचा भंग केला. तो स्काट्लंडाहून दक्षिणेस एकदम माघारा आला. आणि त्यानें ब्रूसाला तीन वर्षेंपर्यंत खुलें सोडून दिलें. त्या अवधींत त्या ब्रूसानें पुनः झगडा करण्यासाठीं बळ जमविलें. एड्वर्डानें आपल्या बापाचें शव वेस्टमिन्स्टर एथें पुरलें, आणि त्याच्या मृत्यूपासून एका महिन्याच्या आंतच त्यानें गाव्हेस्टनाला माघारें बोलावलें, त्याच्यावर सन्मान आणि संपत्ति ह्यांचा वर्षाव केला, आणि चौथा फिलिप ह्याची कन्या इसाबेला हिच्याशीं विवाह करण्यासाठीं एड्वर्ड फ्रान्स देशीं गेला तेव्हां, त्यानें त्या गाव्हेस्टनाला दोन महिनेपर्यंत राज्यकारभार चालविण्याला आपला प्रतिनिधि नेमलें होतें.

गाव्हेस्टन नांवाचा मर्जींतला माणूस.

फ्रान्स देशाहून माघारा आल्यावर, त्याला आणि त्याच्या तरुण राणीला, १३०८ त फेब्रुअरीच्या २५ व्या तारिखेस, राज्याभिषेक केला, आणि त्यानें गाव्हेस्टनाला मंत्रिमंडलाचा मुख्य केलें. तो राजाचा प्यार, गुलहौशी, माजोरी, आणि महत्वाकांक्षी, होता, तो राजासंगतीं, ख्यालतमाशे करी, आणि भालेकरवल्या किंवा भालेबोथाट्यांचे खेळ खेळे, आणि तो वडे लोकांचा अपमान करी. त्याला दोन वेळां हद्दपार केलें, तथापि एड्वर्ड त्याला नेहमी माघारा बोलावी. एका वर्षी पार्लमेंटानें राजाच्या हातून राज्यकारभार वस्तुतः काढून घेतला, आणि तो बिशप आणि वडे लोक ह्यांची एक

कमिटी (मंडळी) नेमून तिच्याकडे दिला. त्या कमिटींतील सभासदांना "**लार्ड्स आर्डेनर्स**" (विधायकसत्ताक बडे लोक) असें नांव दिलें. त्यांनीं राजाच्या सत्तेला अटक करणारे असे कांहीं कानू केले. एकदा निवडणूक होऊन भरलेलें काईम ठेवून, थोडे दिवस त्याला रजा देऊन पुनः नवीन निवडणूक न करितां, तेंच भरलेलें अशा ज्या पहिल्या **पार्लमेंटा**चा लेखी दाखला मिळतो, तें वर सांगितलेलें **पार्लमेंट** होय. **गाव्हेस्टन** हा हद्दपार होऊन परदेशवासांत कांहीं काळ राहिला, परंतु शेवटीं, तो पुनः परत आला,

लार्ड आर्डेनर्स, १३१०–१३११.

तेव्हां त्याला बारनांनीं **स्कार्बेरो** एथें धरून कैदकेलें. नंतर त्याचा हाडवैरी **वारिक**चा **अर्ल** ह्याच्या हातीं तो पडून, १३१२ त जूनच्या १९ व्या तारिखेस, राजाचा चुलतभाऊ **टामस लांकास्टर**चा **अर्ल** ह्याच्या समक्ष त्या **वारिक**च्या **अर्ला**नें **ब्लाक्लो** नांवाच्या टेकडीवर त्याचा शिरच्छेद केला.

गाव्हेस्टनचा खून, १३१२.

ह्या काळामध्यें राजाचे वेडेचार चाललेच होते तों, **स्काट्लंड** त्याच्या कबजांतून निसटत चाललें होतें. १३०७ पासून **ब्रूस** हा शहरामागून शहर घेत चालला होता, आणि १३१० त **एड्वर्ड** आणि **गाव्हेस्टन** ह्या दोघांनीं त्यावर केलेली मोहीम अगदीं वृथा गेली. शेवटीं १३१४ त, **स्टर्लिंग** आणि **बेरिक** ह्या दोहीं शहरांखेरीज, इतर सर्व ठिकाणीं **ब्रूस** हा धनी होऊन गेला होता; आणि **स्टर्लिंग**च्या किल्ल्याच्या सुभेदाराला त्यानें इतकें दडपून पेंचीं पाडलें होतें कीं, जर कुमक येऊन माझी सुटका न झाली, तर **सेन्ट जाना**च्या जयंतीच्या दिवशीं, म्हणजे जूनच्या २४ व्या तारिखेस, मीं शरण येऊन किल्ला खालीं करून देतों, असें त्यानें वचन

दिलें होतें. एड्वर्डाच्या कृपेंतला गाव्हेस्टन तर त्या वेळीं गमावला होता, आणि एड्वर्ड जरी आळशी होता तरी, चिरडीस गेल्यावर हवातितका शूर होता, त्यानें नंतर उत्तरेकडे कूच केलें, आणि ब्रूसाला, स्टर्लिंगच्या किल्ल्यावरून दृष्टीच्या टप्प्यांत बानक नांवाचा बर्न, म्हणजे ओढा, होता, त्याच्या कांठीं त्यानें गांठलें. तेव्हां स्काटूलंडचें स्वातंत्र्य राहण्याचा किंवा जाण्याचा समय येऊन ठेपला होता, म्हणून स्काट लोकांना भयंकर प्रकारची कळकळ उत्पन्न झालेली होती. त्या ठिकाणीं सेन्ट जानच्या जयंतीच्या दिवशीं लढाई झाली. बर्न्स नांवाच्या स्काटूलंडांतील कवीचें एक गीत (काव्य) आहे. तें ह्या लढाईनंतर पुढें चारशेंहून जास्ती वर्षांनीं रचलें. त्या काव्यांत ह्या लढाईचें अद्यापि स्काटूलंडांत कसें स्मरण आहे तें वर्णिलेलें आहे. राबर्ट ब्रूस राजानें आपल्या फौजेपुढें खाडे खणवून त्यांवर काठ्या, आणि गवत वर वाढलेलें अशीं मातीचीं ढिपळें ह्यांचें आच्छादन घालविलें होतें; आणि वालेसानें पूर्वीं बांधविले होते त्यां प्रमाणें, त्यानें आपल्या भालेंकरी शिपायांकडून मध्यें पोकळ असे वाटोळे किंवा चतुष्कोण कोट बांधविले होते, त्यांत पुढल्या ओळींतील शिपाई गुडघे टेंकवून उभे केले होते. इंग्लिशांकडील तीरकमानवाल्यांच्या तीरांनीं त्या शिपायांना अतिशयित मार दिला, तथापि ते शौर्यानें मध्यें खिंडार न पडूं देतां पुनः एकत्र जमले. नंतर जेव्हां इंग्लिशांकडील घोडेस्वारांनीं त्यांवर हल्ला केला, तेव्हां त्यांच्या घोड्यांना पुनः पुनः भोसकून किंवा टोंचून थरथरावणाऱ्या भाल्यांचा इतका मुसंडा आडवा येई कीं, शेवटीं त्या घोडेस्वारांची धांदल उडून त्यांच्यांत पराकाष्ठेची अव्यवस्था झाली.

बानक बर्न एथील लढाई, तारीख २४ जून १३१४.

तितक्यांत हाइलंड (पहाडी) नौकरांची एक टोळी टेंकडीवर चढून येत होती ती पाहून, ते कोणी नवे शत्रु येत आहेत अशी इंग्लिशांची खोटी समज होऊन, तीमुळें त्यांच्यांत एकदम दहशत उत्पन्न झाली, आणि अमीर आणि शिलेदार लोकांचा जो लकलकीत थाट जमला होता त्या लोकांनीं तोंड फिरवलें आणि पळ काढला. खुद्द एड्वर्ड हा बेरिक एथें पळून गेला, परंतु त्याची फौज उधळून तिची दाणादाण झाली, त्याचे बडे लोक शत्रूच्या हातीं सांपडून त्यांना कैदकेलें, आणि मौल्यवान लूट शत्रूच्या हातीं लागली. तदनंतर स्काट लोकांनीं इंग्लिशांच्या ताबेदारीचें आपल्या मानेवरील जूं झुगारून दिलें.

स्काटुंड स्वतंत्र होतें.

ह्या गोष्टीनें इंग्लंडचें फार दुःखकारक मानखंडन झालें, आणि पुढलीं सहा वर्षें असुखाचीं गेलीं. फौजेंत शिपाई पाहिजेत म्हणून पुरुष माणसांचा सर्व देशांतून निचरा झाला. वर्षाचे प्रतिकूळ काळ, गुरांढोरांवर रोग, आणि राजाच्या नौकरांची वखवख, ह्या गोष्टींनीं अन्नाची तंगचाई झाली. पार्लमेंटानें कायद्यानें खाण्यापिण्याच्या जिन्नसांची किंमत बढूं न देण्याविषयीं अविचारानें प्रयत्न केला. त्याचा परिणाम असा झाला कीं, ते जिन्नस स्वस्त होऊन लोकांनीं अमर्याद खरेदी करून सांठविले, त्यामुळें दुष्काळ पडला, आणि त्यांत पुष्कळ लोक मेले. तशांत स्काट लोक इंग्लंडच्या उत्तरेकडील मुलुखाचा धुवा उडवीत होते; राबर्ट ब्रूस ह्याचा भाऊ एड्वर्ड ब्रूस ह्यानें आयर्लंडावर मोहीम मांडली होती; आणि १३२० त एड्वर्डाची ह्यू-लि-डेस्पेन्सेर नांवाच्या एका नवीन पुरुषावर मर्जी बसली. त्या डेस्पेन्सेरानें, राजाचा मुख्य प्रधान

दुष्काळ आणि क्लेश.

टामस लांकास्टरचा अर्ल हा होता, त्याला उधडून देऊन त्याच्या जागीं आपण व आपला बाप असे दोघे मिळून राज्याचा कारभार करूं लागले. हे दोघे डेस्पेन्सेर्स, बाप आणि लेंक, राजाच्या मर्जीतल्या पूर्वीच्या पुरुषाहून गुणांनीं श्रेष्ठ होते. परंतु त्यांच्याशीं बारनांनीं थोड्याच दिवसांत कलह केला. वुइग्मोरचा लार्ड राजर मार्टिमर, आणि हेरिफोर्ड आणि लांकास्टर ह्या दोहोंचे अर्ल, ह्या तिघांना मुख्य करून त्यांच्या हुकमतीखालीं त्यांनीं शस्त्र धरून उठावा केला, आणि राज्यकारभार बळकावण्यासाठीं स्काटांच्या राजाशीं मसलत करून कट केला.

ह्यू डेस्पेन्सेर नांवाचा राजाच्या प्रीतींतला माणूस, १३२०–१३२७.

परंतु ह्या वेळेस एड्वर्ड सावध होता. स्काट लोक येऊन त्यांना मिळण्यापूर्वी तो त्या बंडवाल्यांवर चाल करून गेला. हेरिफोर्डचा अर्ल ठार मारला गेला. मार्टिमर ह्याला पकडून टौअरमध्यें कैदेंत टाकलें, आणि लांकास्टरचा टामस ह्याला गाव्हेस्टनचा वध केल्याबद्दल कधींच एड्वर्डानें क्षमा केलेली नव्हती, त्याचा शिरच्छेद केला. नंतर राजानें आर्डेनर्स लोकांनीं केलेले कानू रद्द करून, यार्क एथें पार्लमेंट भरविलें; आणि बारनांचें प्राबल्य आळ्यांत राखण्याची त्याची इच्छा होती म्हणून, त्यानें एक फार महत्त्वाचा कायदा पसार करण्यास त्या पार्लमेंटाला समजूत घालून प्रवृत्त केलें. तो कायदा हा, "सर्व गोष्टी मुस्तकीम किंवा काईम करणें त्या राजा, मुख्य धर्माध्यक्ष, अर्ल, बारन, आणि राज्यांतील सामान्यलोक, ह्या सर्वांनीं मिळून केल्या पाहिजेत." कायदे करण्याच्या कामीं कामन्स

लांकास्टरचा अर्ल ह्याचा शिरच्छेद केला, १३२२.

(सामान्य लोक) ह्यांना अधिकाराचा अंश दिला अशी ही पहिलीच वेळ. ह्या वेळेपर्यंत, करांच्या बाबतींत मात्र त्यांची सल्लामसलत घेत. आतां राज्यकारभार ते दोघे **डेस्पेन्सेर्सच** करीत होते, परंतु लोक आणि राणी हीं उभयतां त्यांचा द्वेष करीत होतीं, त्यामुळें साऱ्या राष्ट्रांत बंडाळी आणि गडबडगोंधळ ह्यांचें राज्य झालेलें होतें. राणी **इसाबेला** ही, १३२५ सालच्या आरंभाच्या सुमारास आपला भाऊ **चौथा चार्लस** ह्याच्याशीं **गिएनच्या डची** (ड्यूकाच्या ताब्यांतील मुलूख किंवा प्रांत) बद्दल कांहीं तंटा होता तो मिटविण्यासाठीं गेली, आणि पुढें थोड्या महिन्यांनीं तिनें आपला मुलगा **राजपुत्र एड्वर्ड** तेव्हां उमरीनें तेरा वर्षांचा झालेला होता, त्याला, त्या **डची**बद्दल आपल्या भावाला सेवांजलिसंस्कार (धन्याचा मानपान) करण्यासाठीं यावें, असा निरोप पाठवून बोलावून नेलें. ती किंवा तो राजपुत्र **इंग्लंडास** परत आला नाहीं. कारण, **लार्ड मार्टिमर** हा कैदेंतून निसटून **फ्रान्स** देशीं पळून गेला होता, त्याच्याशीं, **एड्वर्ड राजाला** उलथून देऊन त्याच्या जागीं त्याच्या पुत्राला गादीवर बसवावें, अशी गुप्त मसलत करून तिनें कारस्थान मांडलें होतें. ती, १३२६ त सेप्टेंबरच्या २४ व्या तारिखेस लहानशी फौज बरोबर घेऊन येऊन **सफक** प्रांतांत जमिनीवर उतरली, तेव्हां आर्चबिशप आणि बारनलोक हे एकदम येऊन तिला मिळाले.

सामान्य लोकांना कायदे करण्याच्या कामांत अधिकाराचा अंश मिळतो, १३२२.

त्या समयीं, सर्वांनीं त्याग केलेला, असा तो दुःखी कष्टी राजा त्या दोघां **डेस्पेन्सेर्सां**बरोबर **वेल्स** देशीं पळून गेला, आणि त्याला **ग्लामार्गन** एथें पकडून कैदकेलें. त्या उभय **डेस्पेन्सेर्सांना** फांशीं दिलें, आणि १३२७ त जान्युअरीच्या ७ व्या तारिखेस **बे-**

स्टमिन्स्टर एथें पार्लमेंट भरलें, त्या पार्लमेंटानें त्या राजाला राज्य करण्याविषयीं नालायक ठरविलें. त्याची मदतगार कामदारांची मंडळी होती ती मोडून टाकली, आणि तरुण एड्वर्ड (त्याचा पुत्र) ह्याला त्याच्या जागीं राजा केलें, असा डांगोरा पिटविला. दुसऱ्या एड्वर्ड राजाचे त्या वेळचे शब्द फार हृदयवेधक आहेत. तो म्हणाला, "मी माझ्या प्रजेच्या "यत्किंचितही प्रेमाला पात्र झालों नाहीं ह्या गोष्टीविषयीं मला फार "दुःख वाटतें, आणि एथें हाजीर आहेत त्या सर्वांना, मला क्षमा "करा, म्हणून विनंती करतों; परंतु जें झालें त्याच्या उलट होणें "शक्यच नाहीं, त्यापक्षीं, माझ्या वडील पुत्राला तुम्हीं गादीवर "बसविण्याकरितां पसंत केलें हा तुमचा *मजवर मोठा उपकार "झाला." नंतर एका किल्ल्यांतून दुसऱ्यांत, दुसऱ्यांतून तिसऱ्यांत, ह्याप्रमाणें अनेक किल्ल्यांत त्याला कैदेंत ठेवून, शेवटीं, १३२७ त सेप्टेंबरच्या २१ व्या तारिखेस, बर्क्लि नांवाच्या किल्ल्यांत मार्टिमरच्या हुकुमानें निर्दयपणें त्याचा वध केला.

दुसऱ्या एड्वर्डाला पदच्युत करून त्याचा खून केला, १३२७.

प्रकरण १०.

शंभर वर्षांचें युद्ध—शेतकऱ्यांचा दंगा

तिसरा एड्वर्ड, १३२७–१३७७.
|
(धि ब्लाक प्रिन्स, म्हणजे काळा राजपुत्र हा १३७६ त वारला.)
|
दुसरा रिचर्ड, १३७७–१३९९.

१३२७ त जान्युअरीच्या २९ व्या तारिखेस, अल्पवयस्क राजपुत्र तिसरा एड्वर्ड ह्याला राज्याभिषेक केला. तो अल्पवयस्क

असल्यामुळें त्याच्या नांवानें राज्यकारभार चालविण्यासाठीं दिम्म-तदार नेमले, परंतु पहिल्या चार वर्षांमध्यें, **राणी इसाबेला,** आणि तिचा प्रीतिपात्र **लार्ड मार्टिमर,** ह्यांनीं वास्तविक राजसत्ता बळकावली होती. त्यानंतर **एड्वर्डानें** आपलें स्थान स्वीकारलें. त्यानें १३२८ त **एनोचा कौंट** ह्याची कन्या **फिलिप्पा** हिच्याशीं विवाह केलेला होता. १३३० त जूनच्या १५ व्या तारिखेस, पुढें **धि ब्लाक प्रिन्स** (कृष्णवर्ण किंवा काळा राजपुत्र) ह्या नांवानें प्रख्यातीस आलेला, त्याचा पहिला पुत्र जन्म पावला. पुढें **मार्टिमरच्या** भारदस्तीनें आपला मामा **केंटचा अर्ल** ह्याचा वध झालेला ऐकून त्याचे डोळे उघडले, आणि त्याच वर्षाच्या नोव्हेंबर महिन्यांत तो आपल्या मित्रांची एक टोळी बरोबर घेऊन, एके दिवशीं मध्यरात्रीं **नाटिंग्हाम** एथील किल्ल्यांत शिरला, आणि **मार्टिमर** ह्याला त्यानें तेथें पकडून कैदकेलें. त्या **मार्टिमरावर** त्याच्या बरोबरीच्या वडे लोकांनीं अनेक गुन्हे लागू करून दोषी ठरवून त्याला सजा दिली, आणि १३३० त नोव्हेंबरच्या २९ व्या तारिखेस **टैबर्न** (ह्याला त्या काळीं "धि एल्म्स" असें म्हणत) एथें त्याला फांशीं दिलें. **राणी इसाबेला** हिला जन्मभर **नार्फक** शायरांतील **राइझिंग** नांवाच्या किल्ल्यांत अटकेंत ठेवलें.

राजाच्या व्यवहार-क्षमतेचा काल, १३२७ –१३३६.

मार्टिमरचा अपकर्ष.

ह्या प्रकारें, **एड्वर्ड** हा उमरीनें १९ वर्षांचा होण्यापूर्वींच, पति, पिता, आणि जबाबदार राजा, झाला. त्याच्या कारकीर्दीचा दोन प्रकारचा इतिहास आहे. ते प्रकार हे, (१) परदेशीं झालेल्या युद्धांचा इतिहास, आणि (२) **इंग्लंडांत** घडलेल्या मोठमोठ्या गोष्टींचा इतिहास. आम्हांला हे दोन्ही प्रकार वेगवेगळे

घेतले पाहिजेत. स्काट्लंड जरी आतां स्वतंत्र झालेलें होतें, तरी उभयपक्षीं दुरदुरून चकमकी झडतच होत्या; आणि त्या देशाचा राजा राबर्ट हा, वयानें फक्त साता वर्षांचा असा लहान मुलगा मागें ठेवून, जेव्हां वारला तेव्हां एड्वर्डानें त्या देशावर स्वारी करून, जान बेलियल ह्याचा वडील मुलगा एड्वर्ड ह्याला त्या राज्याच्या गादीवर बसविलें. एड्वर्ड बेलियल ह्याला पुढें लवकरच पुनः गादीवरून हाकवून दिलें. परंतु फ्रेंचांची आणि स्काटांची साहाय्यसंकेताची दोस्ती होती, आणि फ्रान्स देशाचा राजा सहावा फिलिप ह्याला गिएन पाहिजे होतें, म्हणून एड्वर्डानें स्काट्लंडावर केलेली स्वारी हें निमित्त करून, त्या फिलिपानें गास्कनीवर स्वारी केली. ह्या काळीं फ्लांडर्स देशांतील लोकांचा इंग्लंडाशीं लोंकरीचा मोठा व्यापार होता. कौंट लूइ नांवाचा एक अयोग्य पुरुष त्यांवर अमल करणारा होता. तो त्यांच्यापासून जबरदस्तीनें द्रव्य उकळी, म्हणून त्याच्या जुलुमापासून त्यांना संरक्षणाची जरूर पडली. तेव्हां त्यांचा जेम्स व्हान आर्टव्हेल्ट नांवाचा कोणीएक पुढारी होता, त्याला "ब्रूअर आफ् गेंट" (गेंटचा कलाल) असें म्हणत. त्यानें एड्वर्डाची भेट घेतली, आणि "आम्हांला कुमक करा, आणि आपण फ्रान्स देशाचा राजा हा किताब स्वीकारा, म्हणजे आम्ही हालींच्या फ्रान्स देशाच्या राजाला आमचा राजा म्हणतों, त्याच्या बदली आपणाला आम्ही राजा म्हणूं व आपल्याशीं प्रजाधर्मानें वर्तूं," अशी त्यानें त्याला विनंती केली.


फ्रान्स देशाशीं कलहाचीं कारणें.

फ्लेमिंग्स लोक एड्वर्डाची कुमक मागतात.

एड्वर्डानें त्याचें म्हणणें मान्य केलें. त्यानें, फ्रेंच लोकांचे

फ्लूर-डि-ली (लिलि, म्हणजे भुइकमळ, नांवाचें फूल) म्हणून राजचिन्ह होतें तें, आणि त्याबरोबर "ड्यू ए मान् ड्रॉइ" (देव आणि माझा हक्क) ही किताबत किंवा मुद्रालेख, आपल्या ढालीवर घालविला, आणि आपली आई **इसाबेला** हिच्या हक्काच्या किंवा वारशाच्या द्वारा **फ्रान्स** देशाच्या गादीवर तो आपला वारसा सांगूं लागला. **इसाबेला** ही, **फ्रान्सांतील** राजकीय घराण्याच्या ज्येष्ठ शाखेंतली होती, आणि **सहावा फिलिप** हा त्या घराण्याच्या कनिष्ठ शाखेंतील होता. ह्या वारशांत कांहीं हाशील किंवा अर्थ नव्हता, कारण **फ्रेंचांच्या** कायद्याप्रमाणें गादीचा वारसा स्त्रीच्या द्वारें येऊं शकत नव्हता.

एड्वर्ड फ्रान्स देशांतील गादीवर वारसा सांगतो.



परंतु **सहावा फिलिप** गादीवर बसला तेव्हां, **एड्वर्डानें** वाद मांडला, तो असा, स्त्री स्वतः **फ्रान्साच्या** गादीवर बसूं शकत नाहीं हें मी मान्य करतों, परंतु तिचा पुरुष वारस हा, मागल्या राजाच्या गोतवळ्यापैकीं किंवा नातेवाइकांपैकीं जर अतिजवळचा नातलग असेल तर त्याला हक्कानें गादी अवश्य मिळाली पा-

हिजे. ह्या कलहापासून जें विख्यात "शंभर वर्षांचें युद्ध" म्हणून म्हणतात, तें उत्पन्न झालें. तें धरसोडीनें इंग्लंडच्या पांचा राजांच्या कारकीर्दीतून चाललें. त्या युद्धाचा थोडक्याच वेळांत फ्लेमिंग्स लोकांशीं बिलकूल संबंध राहिला नाहीं. तें फार दुःखकारक युद्ध होतें. कारण, उभयराष्ट्रांतून एकाही राष्ट्राचें कल्याण करण्याचा विचार त्यांत नसून, तो केवळ सत्तेकरितां झगडा होता. हे शिव्हल्रीचे म्हणजे सरदारबहादरीचे दिवस असत. त्या दिवसांत, भालेकरवलींत देखील, बडे लोकांना जीव धोक्यांत घालून शौर्याचीं आणि साहसाचीं अवघड कर्में करण्याची आवड असे. ह्या उद्धतपणाच्या मर्दुमकींत आणि सरदारबहादरीच्या प्रतिष्ठेंत चांगलें म्हणण्यासारखें पुष्कळ होतें. परंतु त्या बडे लोकांकडून, तें चांगलें म्हणून जें काय होतें, त्याचा प्रयोग किंवा आचार आपआपसांत मात्र होई. ते जेव्हां युद्धाला जात, तेव्हां आग लागलेलीं गांवें, सफई नासलेलीं पिकें आणि द्राक्षांचे मळे, किंवा क्लेश भोगणारे लोक, ह्यांविषयीं त्यांला परवा म्हणून बिलकूल नसे. युद्धांपासून विपत्ति भोगण्याचें येणार वांट्याला कायतें रयत लोकांच्या, त्यांना त्या दिवसांत रास्कल्स (लुच्चे, सोदे, पाजी वगैरे) म्हणत असत, आणि त्यांचा बिलकूल लेखा नसे.

शिव्हल्रि म्हणजे सरदारबहादरी.

एड्वर्डाच्या कारकिर्दींत त्या युद्धाचे विभाग होऊन तीन मोहिमी झाल्या. पहिल्या मोहिमेची सुरवात, जेव्हां फ्रेंचांनीं १३३८ त पोर्ट्स्मौथ वर हल्ला केला, तेव्हां झाली, आणि ती मोहीम १३४७ सांपर्यंत लांबली. तींत एकंदरीनें इंग्लिशांचा जय झाला. १३४० सांच्या जून महिन्यांत, फ्रांन्स

शंभर वर्षांचें युद्ध, त्यापैकीं पहिली मोहीम, १३३८–१३४७.

देशाच्या किनाऱ्यावर **स्लॉइ** नांवाच्या बंदराबाहेर त्यांनीं आर-माराच्या लढाईंत मोठा जय मिळविला, आणि १३४६ च्या आगस्टच्या २६ व्या तारिखेस, **फ्रान्स**च्या उत्तर भागांत **क्रेसी** एथील जमिनीवरच्या लढाईंत तसलाच दुसरा मोठा जय मिळविला, त्या **क्रेसी**च्या लढाईंत **इंग्लिशांच्या** तीरकमठेवाल्यांनीं **फ्रान्स** देशांतील सरदार बहादर लोकांचा मोड करून त्यांना जेरीस आ-णलें. त्या लढाईंतच बंदुकीची दारू पहिल्यानें उपयोगांत आली, आणि राजाचा पुत्र जो **प्रिन्स आफ् वेल्स एड्वर्ड**, ज्याला **ब्लाक प्रिन्स** असें म्हणत, त्यानें सोळावर्षांच्या वयांतच त्या लढा-ईंत मोठा पराक्रम करून, **नाइटहूड** म्हणजे नाइट (सरदार ब-हादर) हा किताब मिळविला, असें म्हणतात (परंतु त्या म्हण-ण्याला आधार संशयग्रस्त आहे) कीं, तो **ब्लाक प्रिन्स** त्या लढाई-नंतर आपल्या टोपीवर शिरोभूषण म्हणून पिसांचें तीन तुरे, आणि "**इख् डीएन**" (मी सेवा करतों) हा मुद्रालेख, पहिल्यानें वापरूं लागला. तसलेच पिसांचे तीन तुरे आणि तो मुद्रालेख **प्रिन्स आफ् वेल्स** हालीं वापरतो. नंतर त्या लढाईमागोमाग **का-**

कालेचा वेढा.

लेला वेढा घातला. तो १३४६ च्या से-प्टेंबरपासून १३४७ च्या आगस्ट महि-हिन्याच्या ४ थ्या तारिखेपर्यंत, म्हणजे अकरा महिनेपर्यंत, एक सा-रखा होता. जेव्हां त्या शहरचा पुढें टिकाव लागत नाहीं असें झालें, तेव्हां, त्या आगस्टच्या ४ थ्या तारिखेच्या दिवशीं, त्यांतील सहा शूर रहिवासी, अणवाणी, आपल्या मानांवर काढण्या किंवा

---

१. मूळग्रंथांत **नाइट्लि स्पर्स** असा शब्द आहे त्याचा अर्थ, नाइट प-दवीच्या संबंधाचे मंवरेज; नाइट पदवी संस्कारपूर्वक देतांना, पदवी देणारा, मुलामा दिलेले मंवरेज पदवी दिलेल्या मनुष्यास देत असे. भा. क.

फांशीं देण्याच्या दोऱ्या ठेवून, गांवाबाहेर आले, आणि एड्वर्डा-पाशीं त्या शहरांतील रहिवाशांवर दया करा म्हणून भिक्षा मागूं लागले. तेव्हां साध्वी राणी फिलिप्पा हिनें, त्यांना मारूं नये म्हणून गुडघे टेंकून त्याला प्रार्थना केली नसती तर, एड्वर्डानें त्यांना फांशींच चढविलें असतें. नंतर एड्वर्डानें कालेंत इंग्लिश लोकांची वस्ती करविली, आणि तेव्हांपासून तें दोनशें वर्षेंपर्यंत इंग्लिशांच्या ताब्यांतील शहर बनून राहिलें होतें, आणि तें इंग्लिश चानलांतल्या जहाजांना मोठें संरक्षक होतें. ह्या वेळाच्या सुमारास, आणि कदाचित् कालेच्या वेढ्याचें स्मारक म्हणून, तिसऱ्या एड्वर्डानें प्रख्यात आर्डर आफ् धि गार्टर (मोजेबंद बागविणाऱ्या सरदार बहादरांचा वर्ग) नांवाचा एक नवीन मानाचा दरजा स्थापला. त्या दरजांत पहिल्यानें पंचवीस इतर सरदार बहादर असून, राजा सव्वीसावा सरदार बहादर होता.

आर्डर आफ् धि गार्टर नांवाचा सरदारबहादरांचा वर्ग स्थापला, १३४८.

दुसरी मोहीम, किंवा युद्ध, ह्याची सुरवात १३५५ त झाली, तेव्हां दुसरा जान हा फ्रान्स देशाचा राजा होता. त्या मोहिमेंतील स्मरणांत ठेवण्यास अतियोग्य अशी लढाई म्हटली म्हणजे पॉयटीर्सची लढाई. त्या लढाईत १३५६ त सेप्टेंबरच्या १९ व्या तारिखेस, धि ब्लाक प्रिन्स ह्यानें फक्त १२००० लोकांनिशीं, ६०००० फ्रेंच फौजेचा पराभव केला. ब्लाक प्रिन्सानें आपली फौज, दुतर्फा द्राक्षांचे मळे असून मध्यें एक अरुंद पाणंदेसारखी गल्ली होती, तिच्या एका शेवटाला आणून उभी केली होती, आणि जेव्हां फ्रेंच चाल करून येऊं लागले, तेव्हां, त्या फौजेंतील तीरक-

दुसरी मोहीम, १३५५–१३६०.

मढेवाल्यांनीं, त्यांवर त्या द्राक्षांच्या मळ्यांवरून, तीरांचा वर्षाव केला. तेव्हां फ्रेंचांची धांदल उडाली, आणि त्या धांदलीच्या वेळापासून, ते शौर्यानें लढले तरी, त्यांना जयाचा योगच राहिला नाहीं. जान राजा, आणि त्याचा लहान मुलगा फिलिप, ह्या दोघांना धरून कैदकरून इंग्लंडास नेलें. तेथें लंडनांतील साव्हॉय नांवाच्या राजमंदिरांत तो राजा पुढें आठवर्षांनीं मरण पावला. पॉयटीअर्सच्या लढाईनंतर दोन वर्षांनीं, "फ्रीकंपनिझ" (स्वतंत्र मंडळ्या किंवा टोळ्या) ह्या नांवाच्या पुंड बेकैद शिपायांनीं वैराण करून सोडलेल्या मुलुखांतून, इंग्लिश रगडून रिघाव करून पारिस शहरापर्यंत गेले; आणि पारिसाच्या दक्षिणेस ब्रेटिग्नी नांवाच्या गांवीं १३६० त मेच्या ८ व्या तारिखेस तह ठरून तहनाम्यावर सह्या झाल्या. त्या तहानें एड्वर्डानें फ्रेंचांच्या गादीवरला आपला दावा सोडून दिला, परंतु आक्विटेन, प्वाटू, गास्कनी, आणि काले, इतक्यांवर स्वतंत्र राजा ह्या नात्यानें त्याची सत्ता राहिली. ह्याप्रकारें दुसऱ्या मोहिमेच्या अखेरीस, फ्रान्स देशापैकीं मोठा भाग इंग्लिशांच्या सत्तेखालीं राहिला.

परंतु तिसऱ्या मोहिमेंत तो सत्तेखालचा मुलूख त्यांनीं गमावला. धि ब्लाक प्रिन्स हा आक्विटेनचा ड्यूक होऊन त्या नात्यानें तिकडील मुलुखावर अमल करण्यासाठीं बॉर्डो एथें गेलेला होता. त्यानें स्पेन देशांत कांहीं तंटा चालला होता त्यांत हात घातला, तेव्हां फ्रान्सचा राजा पांचवा चार्लस ह्यानें पुनः युद्ध सुरू केलें. चार्लस हा आपला बाप जान ह्याहून कावेबाज होता. त्यानें लढाया टाळल्या, परंतु उद्वस्त झालेल्या मुलुखांतून लांब लांब कूच करून इंग्लिशांना फार उपद्रव दिला. त्या-

समयीं थि ब्लाक प्रिन्स हा दुखणाईत असून चिरडखोर झालेला होता. त्यानें, लिमोझ एथील लोक शत्रूला मिलाफी झाले होते म्हणून, त्यांची कत्तल करून आपल्या कीर्तीस डाग लावला. इकडे चार्लस तर, प्रत्येक संधि साधे तेव्हां, त्याच्या नाकावर निंबु घासीत होता. शेवटीं प्रकृति बेताल बिघडली, तिनें त्या ब्लाक प्रिन्साला इंग्लंडास माघारें पिटून लावलें, आणि त्यावेळेपासून इंग्लिशांना अपयश येऊं लागलें. त्यांच्या अरमाराचा स्पानियर्डांनीं १३७१ त पराभव केला, आणि १३७४ साल येई तों, फ्रेंचांनीं, काले, बॉर्डो, आणि बेयॉन, ह्या तिहीं ठिकाणांखेरीज बाकीचा सारा मुलूख जिंकून परत घेतला होता. ह्यास्तव, छत्तीस वर्षांपूर्वी, त्या शंभर वर्षांच्या युद्धाच्या सुरवातीस इंग्लिशांकडे जितका फ्रान्स देशापैकीं मुलूख होता, त्याहून, ह्या तिसऱ्या मोहिमेच्या अखेरीस, त्यांच्याकडे कमी मुलूख राहिला.

तिसरी मोहीम अरिष्टकारक होते, १३६७–१३७४.

आतां एड्वर्डाच्या कारकीर्दीच्या अवलींतील खुद्द इंग्लंडांत घडलेल्या गोष्टींचा इतिहास हातीं घेतला पाहिजे. फ्रान्सदेशीं चाललेलें युद्ध इंग्लंडांत लोकप्रिय होतें ही गोष्ट विचित्रशी वाटेल. परंतु बडे लोकांना, युद्ध म्हटलें म्हणजे कोठेंही असो, तें प्रिय होतें, आणि सामान्य लोकांना वाटे कीं, आपल्या राजाच्या सत्तेखालीं जर ज्यास्ती लोक आले तर, राजाला भरावयाच्या करांचें ओझें तितकें वांटलें जाऊन आपल्यावरील भार कमी होण्याला मदत होईल. शिवाय त्यांना त्या शूर ब्लाक प्रिन्साविषयीं मोठा अभिमान असे. तशांत खालच्या वर्गांतील

सामान्य दरज्याच्या लोकांचा अभ्युदय, १३२७–१३४९.

लोकांचा त्या युद्धापासून पहिल्यानें फायदाच झाला. नाइट्स आणि बारन्स ह्यांना, परदेशीं बाळगावयास लागणारे मोठ्या मोलाचीं चिलखतें वगैरे सरंजाम, आणि. डामडौल, ह्यांबद्दल द्रव्याची गरज पडे. तीमुळें ते आपआपल्या जाहगिरीच्या जमिनी कौलानें, किंवा पुष्कळ वर्षांच्या मक्त्यानें, ठरलेला सारा किंवा धारा (ह्याला **फीआर्म** असें म्हणत) घेत राहून, देण्यास राजी झाले होते. हाच **फार्म** (धाऱ्यानें घेतलेलें शेत किंवा जमीन) म्हणून ज्या कशाला म्हणतात त्याचा, आणि स्वतंत्र **फार्मर** (धारेकरी) ह्यांचा, आरंभ होय. आणखी ते नाइट्स व बारन्स, आपल्या बंद्यांना, म्हणजे जमीन खाऊन नौकरी करण्याच्या करारानें झालेले पोट जाहगीरदार ह्यांना, मोबदला द्रव्य घेऊन त्यांच्या जमिनी त्यांस विकून बंदेपणापासून किंवा नौकरीपासून मुक्त करण्यासही राजी झाले होते. राजानें देखील, आपल्या बंद्यांना त्यांच्या त्यांच्या जमिनी खरीद करूं देऊन बंदेपणापासून मुक्त होऊं देऊन, आपल्या अवाढव्य खासगत जमिनींपासून द्रव्य उत्पन्न करण्यासाठीं अखत्यार देऊन अधिकारी पाठवले.

जाहगीर जमिनी कौलानें किंवा मक्त्यानें देऊं लागतात, आणि बंदे किंवा पोट जाहगीरदार ह्यांना दास्यापासून मुक्तता मिळते.

एड्वर्डानें **फ्लांडर्स** देशांतून पुष्कळ साळी व सणगर लोक आणविले. ते **नार्फक, सफक**, आणि **एसेक्स**, ह्या तीन कौंटींत घरेंदारें करून वस्ती करून राहिले, आणि त्यांनीं **इंग्लंडां**तील लोकांना कापड विणावयाला शिकविलें. ह्या कापड विणण्याचा व्यवसाय लवकरच महत्त्वाचा धंदा झाला, आणि कोणीही बंदा एकाद्या शहरांत पळून जाऊन, तेथें एक वर्ष

उद्योगधंदे आणि व्यापार वाढतो.

आणि एक दिवस राहिला, म्हणजे तो बंदेपणापासून खुला होऊन स्वतंत्र होत असे, म्हणून पुष्कळ बंदे ह्याप्रकारें स्वतंत्रपणानें उद्योग करून पोट भरूं लागले. परदेशांशीं चालणारा उदीमही तेजीस येऊं लागला. नार्मंडीशीं मासे, आणि इमारतींचें लांकूड, ह्यांचा उदीम, फ्लांडर्स देशाशीं लोंकरीचा उदीम, गास्कनी देशाशी द्राक्षांचें मद्य, आणि मीठ, ह्यांचा उदीम, हीं धंद्यारोजगाराचीं द्वारें झालीं. ह्या काळाच्या सुमारास नाण्यांची सुधारणा झाली, आणि १३४४ त सोन्याचीं नाणीं पहिल्यानें व्यवहारांत पैशासारखीं उपयोगांत येऊं लागलीं. ह्या साऱ्या संवृद्धीच्या कारणानें बंदेपणापासून मुक्त झालेले बंदे, स्वतंत्र कारिगर आणि धारेकरी शेतकरी, हे सारे मिळून स्वतंत्र मनुष्यांचा एक खंबीर समुदाय बनत चालला होता, आणि पूर्वी कधींच लागलेल्या नव्हत्या अशा गरजा त्यांना लागूं लागल्या, आणि पूर्वी कधींच मागितलेले नव्हते असे हक्क आपणांस पाहिजेत असें त्यांना वाटूं लागलें. बडे लोक नेहमी आपल्या युद्धांत चूर असत. त्यामुळें ह्या गोष्टी त्यांच्या ध्यानांत आल्या नाहींत.

ह्याप्रकारची व्यवस्था सतत वीस वर्षेपर्यंत चालली, आणि दरम्यानच्या काळांत राजा सुरू असलेल्या युद्धाकरितां नेहमी पार्लमेंटाकडे पैका मागतच होता. १३४० त तो फ्रान्स देशाहून मोठ्या तैषानें आला, त्यानें आपले प्रधान आणि मुख्य न्यायाधीश ह्यांना कामावरून काढून टाकलें, आणि आपला चान्सेलर (पंडितराव) स्ट्राट्फर्ड (हा कांटर्बरीचा आर्चबिशपही होता) ह्यावर, जमा केलेला पैसा गैर कामाकडे खर्च केला, असा त्यानें आरोप ठेवला. स्ट्राट्फर्डानें पैशाबद्दल जबाब देणें तो खुद्द मलाच दिला पाहिजे असें त्यानें पार्लमेंटाला कळविलें. तेव्हां कोणत्याही

कायदा) ह्या नांवाचा एक कायदा केला, त्यांत ह्याहून ही ज्यास्ती सख्ती होती. त्यांत असा ठराव केला होता कीं, ब्लाक-डेथच्या पूर्वी जो मजुरीचा दर होता त्या दरानेंच मजूरांनीं काम केलें पाहिजे. तें मजूर करीनात; आणि ते, कायदा कसा तरी लटपटीनें टाळून, जे कोणी सर्वांत जास्ती मजुरी देत त्यांचेंच काम करीत. तेव्हां जमीनदार लोक मोठ्या पेंचीं आले, कारण त्यांना, आंगमेहनत, आउतें, आणि आंगमेहनतीनें केलेली हरएक चीज, ह्यांबद्दल इतरांपेक्षां फारच भारी मोल द्यावें लागे; आणि तशांत, देशांत प्रजेचा क्षय झाल्यामुळें अन्न खाणारे लोकच पहिल्यापेक्षां थोडे राहिले, त्या कारणानें, जमीनदार लोकांना, त्यांच्या जमिनीवर उत्पन्न केलेल्या धान्याचा व मांसाचा पहिल्याहून कांहींही ज्यास्त पैसा येईना. पार्लमेंटांत त्या काळी अर्थात् जमीनदार लोकच प्रबळ असत. तेव्हां पार्लमेंटानें, प्रत्येक पुरुष माणसानें आपल्या धन्याच्याच जमिनीवर खपलें पाहिजे असें बांधून टाकणारे जे जुने कानू होते, ते पुनः अमलांत आणले. त्यांनी, कोणत्याही मजूरानें आपलें पारिश (धर्माध्यक्षाच्या वृत्तीचा प्रदेश) सोडून जाऊं नये, अशी सख्त मनाई झाली; आणि कोणी पुरुष माणूस पळून गेला तर त्याला पकडून त्याच्या कपाळावर फ्यूजिटिव्ह, म्हणजे पळपट्या, ह्या अर्थाचें सूचक एफ् हें अक्षर तापलेल्या लोखंडानें डागावें अशी शिक्षा ठरली. पूर्वी शहरांत पळून गेलेले पुष्कळ बंदे लोक धरधरून माघारे आणले, आणि ज्यांनीं आपलें स्वातंत्र्य पैसे देऊन विकत घेतलेलें होतें, अशा कांहींना देखील त्यांचे धनी अन्यायानें माघारे मागूं लागले. मजूर लोकांना आतां कळूं लागलें होतें कीं, आपण

स्टाटूट आफ् लेबरर्स म्हणजे मजूरांविषयीं कायदा.

स्वतंत्र राहिलों तर पूर्वीहून अधिक पैसा मिळवूं. ते त्या जुलुमाबद्दल तडफडूं लागले, आणि तो टाळण्याविषयीं त्यांनीं प्रयत्न मांडला.

चॉसर आणि लांगलांड ह्यांचे ग्रंथ.

आमचा महान् कवि **चॉसर** ह्यानें ह्या काळाच्या सुमारास, आपलें **"कांटर्बरी टेल्स"** (कांटर्बरीच्या गोष्टी) नांवाचें आपलें काव्य रचलें. त्याचे ग्रंथ, आणि लोककवि **लांगलांड** ह्यानें रचलेलें **"धि व्हिजन आफ् पीर्स प्लौमन"** (पीर्स प्लौमनचें स्वप्न) नांवाचें एक विचित्र काव्य, ह्यांवरून, एकीकडे नाइट्स (सरदार), दरबारी लोक, श्रीमंत आबट्स (महंत), आणि **मंक्स** (जोगी), हे भालेकरोल्या, आणि ख्यालतमाशे वगैरे रंग, करीत असत, तों तों दुसरीकडे खालच्या वर्गांतले लोक कसे ज्यास्ती ज्यास्ती वळवळून तळमळत होते, हें दिसून येतें. **आक्सफर्ड** एथील **बेलियल** नांवाच्या पाठशाळेंतील **जान वुइक्लिफ** नांवाचा मास्टर (गुरु) होता, तो

जान वुइक्लिफ, १३२४–१३८४.

इंग्लंडांतील पहिला धर्मसुधारक होय. तो, ह्याच काळीं धर्मोपदेशकांच्या, आणि विशेषेंकरून दांभिक आणि लोभाविष्ट झालेल्या फ्रायरांच्या (जोग्यांच्या), दुराचरणांविरुद्ध लिहूं लागला. **वुइक्लिफ** हा **आक्सफर्डां**तला एक मोठा आस्थेवाईक धर्मशिक्षक होता. लोकांमध्यें असंतोष उत्पन्न करण्याचा त्याचा बिलकूल इरादा नव्हता. परंतु खऱ्या धर्माचें पुनरुज्जीवन करावें, आणि सत्ता ज्यांच्या हातीं होती त्यांच्या जुलुमीपणाबद्दल त्यांना दोष द्यावा इतकीच त्याची इच्छा होती. पुढें थोड्या वर्षांनीं त्यानें **बायबलाचें** (ख्रिस्तीधर्म पुस्तकाचें) **इंग्लिश** भाषेंत भाषांतर केलें, आणि जाड्याभरड्या भुऱ्या रंगाच्या कापडाच्या कफन्या घालून अणवाणीं चालणारे उप

"साधे धर्मोपदेशक" त्यानें तयार करून बाहेर पाठवले. प्रत्येक माणसानें आपल्या सदसद्विवेकी अंतःकरणानें देवास हिशोब दिला पाहिजे, सर्व माणसें त्याच्या दृष्टीनें सारखीं आहेत, आणि वडे लोक आणि धर्मोपदेशक ह्यांनीं सर्वांच्या कल्याणासाठीं न्यायानें आपआपले अधिकार चालविले पाहिजेत, ह्या गोष्टी ते धर्मोपदेशक आपल्या उपदेशांत लोकांना शिकवीत. असंतुष्ट झालेल्या शेतकरी लोकांच्या मनांत स्वातंत्र्याला उत्तेजक अशा ह्या साऱ्या विचारांनीं कोणत्या प्रकारचें कार्य केलें, आणि पुढील कारकीर्दीत त्या विचारांना कसें कडू फळ आलें, हें सहज आमच्या ध्यानांत येण्याजोगें आहे.

पार्लमेंटांत सुधारणा.

तथापि बाह्यात्कारीं सर्व गोष्टी निवांत होत्या, आणि पुढल्या वीस वर्षांत पार्लमेंटानें पुष्कळ चांगल्या सुधारणा केल्या. त्या समयीं पोप कोणी एक फ्रेंच जातीचा पुरुष असून तो फ्रान्स देशांत इंग्लंडच्या शत्रूंमध्यें आव्हिन्यॉन एथें राहत असे. तेव्हां १३५१ त पार्लमेंटानें असा एक कायदा केला कीं, पोपानें परदेशीयांना इंग्लंडांतील वृत्ति (धर्माधिकाऱ्यांना उपजीविकेसाठीं लावून दिलेल्या जमिनी वगैरे) देऊन धर्मोपदेशक नेमूं नये, किंवा जान राजाच्या कारकीर्दीपासून जशा भारी भारी खंडण्या इंग्लंडापासून घेत आला तशा पुढें भारी खंडण्या त्यानें उकळूं नये. १३५३ त, धर्मशास्त्रसंबंधीं इंग्लंडांत उत्पन्न झालेले वाद, विषय, किंवा प्रश्न, परदेशीय कोडतांपुढें नेण्याची लोकांना मनाई झाली.

पहिलें प्रेम्युनायरचें स्टाटूट.

ही मनाई ज्या कायद्यानें केली त्या कायद्याला स्टाटूट आफ् प्रेम्युनायर (पोपाचा किंवा परदेशीय राजाचा अधिकार इंग्लंडांत प्रविष्ट करण्याच्या अपराधा-

संबंधीं कायदा) असें म्हणत. त्या कायद्यासंबंधीं जें लेखी सरकारी आज्ञापत्र झालें त्यांत आरंभीं जो शब्द योजला होता त्यावरून तें नांव त्या कायद्याला दिलें. तो कायदा अलीकडील काळांत फार महत्वाचा झाला. १३६२ त सर्व न्यायाच्या कोडतांत पूर्वीप्रमाणें फ्रेंच भाषा न वापरतां इंग्लिश भाषा वापरीत जावी, आणि पार्लमेंटाच्या अनुमतावांचून राजानें ह्यापुढें लोंकरीवर कर किंवा जकाती बसवूं नये, असा पार्लमेंटाचा हुकूम झाला.

त्या वेळच्या सरकारानें, म्हणजे राज्यकारभार चालविणाऱ्या मंत्रिमंडलानें, आयर्लंडाकरितां कायदे करण्याचा प्रयत्न केला. परंतु पहिल्यापासूनच ते कायदे चुकीचे आणि निष्ठुरतेचे होते. त्या काळीं आयर्लंडांत प्रजेचे तीन वर्ग होते. ते येणेंप्रमाणें. (१) मूळचे आयरिश; (२) तेथें फार वर्षांमागे गेलेले इंग्लिश लोक; हे तद्देशीय लोकांशीं शरीरसंबंध करून तो आपला देश मानून त्यांत स्थायिक होऊन राहिलेले होते; आणि (३) तेथें अमल करण्यासाठी गेलेले इंग्लिश लोक. मूळचे आयरिश, आणि आयरिश –इंग्लिश हे निःसंशय, अंधाधुंद, आणि अर्धवट रानटी लोक होते खरे, परंतु त्यांना, त्यांवर अमल करण्यास गेलेल्या इंग्लिश लोकांनीं, फार लाजिरवाण्या प्रकारानें वर्तविलें. किल्केनीच्या स्टाटूटानें (कायद्यानें) आयरिश लोकांशीं शरीरसंबंध करण्याची इंग्लिशांना मनाई झाली, आयर्लंडांतील दैशिक खेळ बंद केले, आणि आयरिशांनीं इंग्लिश भाषा बोललीच पाहिजे आणि इंग्लिश चालीरीति स्वीकारल्याच पाहिजेत, असा निर्बंध केला. राजाचा पुत्र लायनेल, क्लारेन्सचा ड्यूक, ह्याला त्या आयरिश लोकांवर अंमल करण्यास पाठविलें होतें, तो तर आयर्लंडांत जन्मा

किल्केनीचें स्टाटूट, १३६७.

पावलेल्या कोणाही माणसाला आपल्या गोटाजवळ येऊं देखील देत नसे. असल्या राज्यरीतीखालीं राहून आयरिश लोक तृप्त होतील, हें अशक्यच होतें.

आणखी दहा वर्षें अशींच लोटलीं. तिसऱ्या मोहिमेसंबंधाचीं अरिष्टें सारीं फ्रान्स देशांत घडलीं. राजा वृद्ध होत चालला होता. साध्वी राणी फिलिपा ही मरण पावली होती; आणि एका आलिस पेरेर्स नांवाच्या अयोग्य स्त्रीनें एड्वर्डाला भारलें होतें. धि ब्लाक प्रिन्स, एड्वर्डाचा वडील मुलगा, हा मरूं घातला होता, आणि त्याचा लहान मुलगा आणि वारस हा वयानें फक्त दहा वर्षांचा होता. म्हणून एड्वर्डाचा तिसरा मुलगा, गांटचा जान, लांकास्टरचा ड्यूक, हा वस्तुतः, आपण निवडून घेतलेल्या प्रधानांसह राज्यकारभार चालवीत होता. तो गादी बळकावण्याची इच्छा करीत आहे असा लोकांना अंदेशा वाटूं लागला. शेवटीं १३७६ त "धि गूड पार्लमेंट" (सात्विक पार्लमेंट) भरलें, आणि कामन्सांनीं धैर्य करून पहिल्यानेंच प्रधानांवर दोषारोप केला, किंवा शब्दांतरानें, हौस आफ् लार्ड्स (लार्डांची सभा) हिला न्यायाधीश करून तिच्यापुढें त्या प्रधानांवर फिर्याद करून खटला चालविला. कामन्सांनीं त्या प्रधानांवर आणलेल्या तोहमती, ह्याप्रमाणें होत्या. (१) सरकारी पैशाचा अन्यथा विनियोग केला, (२) परवानगीवांचून कर बसविले, आणि (३) गरीब वृद्ध राजाला पैसा उसनवार देऊन, त्याबदला परत शंभरपट पैसा त्याला देवावयास लावलें. लांकास्टरचा ड्यूक ह्यानें हा कामन्सांनीं मांडलेला हल्ला बंद करण्याविषयीं होईल तितका प्रयत्न केला, परंतु ब्लाक प्रिन्स हा, मरणाच्या पंथास लागून पडलेला

धि गूड पार्लमेंट, १३७६.

असतांही, त्यानें कामन्सांना पाठवळ दिलें. नंतर त्या प्रधानांना त्यांच्या जागांवरून काढलें, आणि आलिस पेरेंर्सला राजाजवळून घालवून दिलें, तथापि ती पुन: लवकरच परत आली; आणि जेव्हां पुढें दोन महिन्यांनीं १३७६ त जूनच्या ८ व्या तारिखेस ब्लाक प्रिन्स मरण पावला, तेव्हां त्याचा पुत्र अल्पवयी राजपुत्र रिचर्ड ह्याला आर्चबिशपानें पार्लमेंटपुढें नेलें, आणि त्याला युवराज म्हणून पार्लमेंटानें मान्य केलें. इतकें झालें असून, गांटचा जान ह्याच्या हातीं पुन: अमल आला, आणि १३७७ त भरलेल्या पार्लमेंटानें, मागें केलेलें सारें नाहींसें केलें, आणि सर्व राज्यांतील लोकांवर दर-डोईस अमूक ह्याप्रमाणें डोईपट्टी म्हणून जिला म्हणत अशी नवीन पट्टी प्रत्येक माणसावर बसविली. ह्याच पार्लमेंटांत कामनांचा मुखरीण किंवा अ-ध्यक्ष ह्याला पहिल्यानेंच "धि स्पीकर" (बोलणारा, निर्णय करणारा) असें म्हणूं लागले. त्याच वर्षी, म्हणजे १३७७ त जूनच्या २१ व्या तारखेस, तिसरा एड्वर्ड मृत्यु पावला, आणि तो अल्पवयस्क राजपुत्र रिचर्ड वयानें फक्त ११ वर्षांचा असतांनाच त्या असुखकर गादीवर बसला.

ब्लाक प्रिन्साचा मृत्यु, १३७६.

पहिली डोईपट्टी, १३७७.

दुसरा रिचर्ड, १३७७–१३९९.

रिचर्डाला १३७७ त जुलईच्या १६ व्या तारिखेस राज्याभिषेक झाला, आणि राज्याचा कारभार चालविण्यासाठीं एक कौन्सिल (मंत्रि-मंडल) नेमलें. राजाचे चुलते त्या कौन्सिलांत नव्हते, तरी गांटच्या

जान ह्याचें कारभारांत वजन अजून पुष्कळ होतें. फ्रान्स देशाशीं युद्ध लोटत लोटत चाललेलेंच होतें. इंग्लंडाचें त्यांत नुकसानच होत होतें, आणि त्या युद्धाकरितां भारी कर द्यावे लागत होते. डोई-पट्टी पुनः बसविली. लांकास्टरच्या ड्यूकाला ६ पौंड १३ शि. ४ पे., आणि अर्लांना ४ पौंड, आणि ह्याच प्रकारें खालीं सोळा-वर्षांच्या वर उमर असलेल्या अति कंगाल माणसाला देखील एक ग्रोट किंवा ४ पेन्स, द्यावे लागत. परंतु ह्या पट्टीनें पुरे इतकें उ-त्पन्न होईना, म्हणून पुढील सालीं तिहून जबर डोईपट्टी बसवून वसूल केली. तिच्या भारानें गरीब लोक फार दडपले गेले; आणि

डोईपट्टीविषयीं द्वेष.

तीस वर्षांपूर्वी "स्टाटूट आफ् लेबरर्स" (मजूरांविषयीं कायदा) झाल्यापासून, व्हिलन्स (जमीन खाऊन धन्याची नौकरी करणारे लोक), मजूर, आणि लहान लहान धारेकरी कुळें, ह्यांना देखील भारी हकटक, कर, जकाती वगैरे देणीं पडत, त्यामुळें त्या लोकांत दिवसानुदिवस असंतोष वाढत चालला होता. साऱ्या देशभर गुप्त मंडळ्या स्थापन होऊं लागल्या, आणि वुइक्लिफाचे धर्मोपदेशक ह्यांना आतां "लॉल-र्ड्स" असें नांव पडलेलें होतें, ते गांवोगांव फिरत, आणि अस्वस्थ-चित्त झालेल्या त्या लोकांच्या दरम्यानचे ते निरोप्ये जासूद ब-नले. ह्या धर्मोपदेशकांपैकीं एक जान बॉल नांवाचा होता, त्याला, धर्मोपदेश करतांना फंदफितूर शिकवितो म्हणून, लंडनच्या बिशपानें कैदेंत देखील टाकलें होतें.

तथापि १३८१ तील जूनच्या ५ व्या तारिखेपर्यंत सारें रान निवांत होतें; त्या दिवशीं, डार्टफर्ड गांवीं राहणारा, धंद्यानें कौलें चाळणारा अशा एका जान नांवाच्या माणसानें, आपल्या मुलीचा एका डोईपट्टी वसूल करणारानें अपमान केला, म्हणून त्याला ठार

मारलें. तेव्हां एकदम सऱ्या इंग्लंडभर गवगवा झाला, आणि देशांत कांहींतरी गुप्त मुलूख किंवा स्नेहभाव असावा असें त्यावरून स्पष्ट झालें; कारण, यार्कशायर, लांकाशायर, डेव्हन, सफक, एसेक्स आणि केंट, इतक्या कौंटींतील लोक एकावेळीं उठले. हार्टफर्डचा जान ह्यासारखाच कौलें चाळण्याचा धंदा करणारा एक वाट्

शेतकऱ्यांचा दंगा, १३८१.

टाइलर नांवाचा पुरुष होता, त्याच्या हुकमतीखालीं केंट ह्या कौंटींतील लोक एका झुंडीनें उठले, मेडस्टन एथील तुरुंगांतून जान बॉल ह्याला त्यांनीं सोडविलें, आणि त्याला बरोबर घेऊन कूच करून ते ब्लाक-हीथ एथें गेले. तेथें त्या जान बॉलानें, एक पद्य म्हणून, सारीं माणसें तिथून एका दरजाचीं, त्यांच्यांत उच्चनीचभाव नाहीं, असें प्रतिपादन करून उपदेश केला. त्या पद्याचा अर्थ येणेंप्रमाणें.

जेव्हां आदम हा हातीं जमीन खणीत होता,
आणि ईव्ह ही सूत कांतीत होती, तेव्हां
तालेवार गृहस्थ म्हणून कोण होता ?

एसेक्सांतील लोक, जाक स्ट्रॉ नांवाचा एक गवती घरें शाकारणारा होता त्याच्या हाताखालीं, सोटे, जंगलेल्या तरवारी, आणि तीरकमानी, ह्या हत्यारांनीं सज्ज होऊन आले, आणि त्या जमावाला मिळाले. तसेच हर्टफर्डशायरांतील लोकही येऊन मिळाले. एकंदरीनें एक लक्ष माणसें चाल करून लंडनास आलीं, आणि त्या शहराच्या आंत जमलेल्या बंडाळ लोकांनीं त्यांना शहराच्या वेशी उघडल्या. तेराव्या तारखेस त्या लोकांनीं वंदिखाने धुंडाळले. गांटचा जान ह्याचा ते अति द्वेष करीत असत. साव्हाय पालस नांवाचें राजमंदिर हें त्याचें राह-

ह्यांचें घर होतें तें मंदिर, आणि टेम्पल म्हणून टेम्प्लर नांवाच्या नाइटांचें (सरदारबहादरांचें) देऊळ होतें त्याच्या संनिध नवीन बांधलेलें कायदे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां विद्यालय होतें तें, हीं त्यांनीं जाळलीं, आणि फ्लेमिंग्स लोकांचीं घरें पाडून जमीनदोस्त केलीं. इतके अनर्थ केले तथापि, त्यांनीं लूट किंवा चोरी म्हणून कसली ती केली नाहीं, परंतु रात्र घालविण्यासाठीं केंटिश लोक टौअर हिल नांवाच्या टेंकडीवर, एसेक्सांतील लोक माइल एन्ड् नांवाच्या ठिकाणीं, आणि हर्टफर्डशायरांतील लोक हाइबरी नांवाच्या जागीं, ह्याप्रमाणें निवांत थिरावून राहिले.

हा अकस्मात् घाला आलेला पाहून, वडे लोक, आणि राज्य-कारभार चालविण्यासाठी नेमलेलें कौन्सिल, ह्यांचे भीतीनें हातपाय लटके पडून त्यांना कांहीं सुचेनासें झालें. फक्त एकट्या तरुण राजाचें मात्र प्रसंगावधान राहिलें होतें. त्याला अजून सोळावें वर्ष देखील लागलेलें नव्हतें, तथापि त्यानें विस्मय वाटण्यासारखें धैर्य दाखविलें. दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं लवकरच तो घोड्यावर बसून माइल एन्ड एथें त्या बंडखोर लोकांना भेटावयास गेला. ते भेटले तेव्हां त्यांस म्हणाला "भले लोकांनो, मी तुमचा राजा आणि धनी आहे, तुमची काय इच्छा आहे ?" तेव्हां (१) बंदेपणापासून आमची सुटका होऊन आम्हांला स्वातंत्र्य मिळावें, (२) जबरदस्त कर, जकाती वगैरे, आणि बाजार संबंधानें हरकत, बसविले आहेत, ते बंद व्हावे, आणि (३) आम्ही जमिनी खातों त्यांबदली आम्हांस धन्याची मजूरी नौकरी वगैरे करावी लागते, ती सारी बंद करून तिच्या मोबदला आम्हांला जमिनींचा भाडा देण्याविषयीं परवानगी मिळावी, हीं मागणीं त्यांनीं मागितलीं. त्यांनीं मागितलेलें सारें देतों म्हणून राजानें वचन दिलें, आणि दुर-

एक पारिशाला बंदेगिरीपासून सर्व बंद्यांना मुक्त केलें आहे अशीं ताकिदपत्रें लिहविण्यासाठीं त्यानें तीस कारकून बसविले. तीं ताकीदपत्रें हातीं घेऊन ते दंगा करणारे लोक बारावाटा झाले. परंतु **रिचर्ड** निघून गेल्यावर मधल्या वेळांत, **केंटिश** लोक जबरीनें **टौअर पालस,** म्हणजे किल्ल्यांतील राजमंदिर, ह्यांत शिरले; आणि तेथें, जो आर्चबिशप असून चान्सेलर (पंडितराव) होता त्या अधिकाऱ्याला, आणि डोईपट्टी वसूल करण्याचें काम खजिनदाराकंडे होतें त्यामुळें त्यावर त्यांचा फार दांत होता, त्या खजिनदाराला, त्यांनीं ठार मारले. शिवाय **वाट्ट टाइलर** ह्याच्या हुकमतीखाली अद्यापि तीस हजार लोक **लंडन** शहरांत राहिलेले होते. त्यांना दुसरे दिवशी **स्मिथफील्ड** एथें **रिचर्ड** जाऊन भेटला. तेथे **वाट्ट टाइलरानें** राजाच्या घोड्याच्या अनिनीवर हात टाकला, ते पाहून **लंडनच्या मेयरानें** (कोतवालाने) त्याला ठोकलें आणि तेथल्या तेथे त्याला ठार केलें. तेव्हां तेथे थवा जमला होता त्यांतील लोकांनी "मारा, मारा, आमच्या सरदाराला ठार मारलें" अशी आरोळी ठोकली, ती ऐकून **रिचर्ड** मोठ्यानें ओरडला "मी तुमचा सरदार आहें, माझ्या मागून या." ते त्याप्रमाणे **रिचर्डाच्या** मागून **इस्लिंग्टन** एथें निमूटपणें गेले. तेथे शेवटी जी फौज जमा झाली होती तिला त्या लोकांशीं तो घांसाघांस करूं देईना. मग त्यांना त्याने लेखी चार्टर्स, म्हणजे सनदा, दिल्या त्या घेऊन ते आपआपल्या घरीं माघारे गेले. ह्याप्रकारें त्या बंडाचा शेवट **लंडनमध्यें** झाला, परंतु पुढल्या पंधरवड्यांत दूरदूरच्या कौंटींमधून पुष्कळ लोक प्राणांस मुकले आणि इतर पुष्कळ नाश झाला. नंतर मोठी फौज बरोबर घेऊन राजा

रिचर्ड आपल्या लोकांना भेटतो.

केंट आणि एसेक्स ह्या दोन कौंटींतून कूच करीत गेला; जान बॉल, स्ट्रॉ, आणि शतशः इतर लोक, ह्यांस धरून ठार मारलें; आणि जेव्हां पार्लमेंट भरलें, तेव्हां राजानें दिलेल्या साऱ्या सनदा अगदीं गैर आणि निरुपयोगी म्हणून ठरविल्या, कारण जें वास्तविक बडे लोकांचें, तें देऊन टाकण्याला राजाला अधिकार नव्हता.

बंदेगिरी हळू हळू नाहींशी होते.

ह्यावरून लोकांना इतक्या साऱ्या खटपटीपासून कांहींच फायदा झाला नाहीं असें दिसलें खरें, तथापि, वास्तविक पाहतां, जरी तदनंतर पहिल्यानें पूर्वीपेक्षां जुलूम अधिकच झाला तरी, बडे लोकांना लवकरच दिसून आलें कीं, ह्यापुढें लोकांवर जुलमानें बंदेगिरी लादणें हें धोक्याचें आहे. पुढल्या दीडशें वर्षांत हळू हळू बंदेगिरी अगदीं नाहींशी होऊन, स्वतंत्र मजूरदारी तिच्या जागीं स्थापित झाली.

रिचर्डनें आपल्या कारकीर्दीचा आरंभ तर मोठ्या शौर्यानें केला खरा; तथापि त्याच्या कारकीर्दीचा इतिहास खुद्द त्याला फार दुःखाचा झाला. तो समजून घेण्याला ही गोष्ट लक्ष्यांत आणली पाहिजे कीं, राजाला पैसा देण्याच्या पूर्वी आपली सल्ला त्याच्याकडून जबरीनें ऐकून घेवविण्यापुरतें कामन्सांचें सामर्थ्य वाढलें होतें. परंतु आपला प्राप्त झालेला अधिकार वागवावा कसा हें त्यांना अद्यापि कळूं लागलें नव्हतें, आणि थोर थोर लार्ड्स (बडे लोक) हेच राज्यांत वास्तविक अमल करणारे होते, ते त्या कामन्सांना एकवेळ ह्या बाजूस एकवेळ त्या बाजूस ह्याप्रमाणें इच्छेस येईल त्या बाजूस आपल्या भारदस्तीनें वळवीत असत. आतां रिचर्डच्या चुलत्यांना सत्तेची आवड होती, आणि त्यानें आपल्या लगामींत

पार्लमेंटचा अधिकार किंवा सत्ता.

राहवें हें त्यांना पाहिजे होतें. परंतु ही गोष्ट पाहण्यांत आलीच आहे कीं, रिचर्डाच्या अंगीं जातीची मोठी धमक होती. एड्वर्डाला सात पुत्र होते, परंतु त्यांपैकीं पांचच वाढून पुरुषदशेंत आले. ते येणेप्रमाणें.—

१ एड्वर्ड, धि ब्लाक प्रिन्स.	२ लायोनेल, क्लारेन्सचा ड्यूक.	३ गांटचा जान, लांकास्टरचा ड्यूक.	४ एड्मंड, यार्कचा ड्यूक.	५ टामस, ग्लास्टरचा ड्यूक.
दुसरा रिचर्ड.	फिलिप्पा, हिनें मार्चचा अर्ल ह्याच्याशीं विवाह केला.	हेन्री, डर्बीचा अर्ल, हा पुढें चौथा हेन्री झाला.		
	राजर, मार्चचा अर्ल.			
	एड्मंड, मार्चचा अर्ल, हा गादीला वारस होता.			

ह्यांपैकीं पहिले दोघे एड्वर्ड राजापूर्वीच वारले, आणि ब्लाक प्रिन्साचा पुत्र हा, दुसरा रिचर्ड ह्या नांवानें एड्वर्डाच्या मागून राजा झाला हें पाहण्यांत आलेंच आहे. त्याचे प्रधान आणि कौन्सिलांतले मंत्री हे कधींच पहिल्याप्रतीचे पुरुष नव्हते. ह्याचें कारण बहुश: असें दिसतें कीं, त्याची आई आणि दोस्त, हे त्याच्या चुलत्यांच्या दोस्तांना प्रधान किंवा कौन्सिलदार निवडून नेमण्याला भीत असावेत. परंतु तसें असतांही, ते चुलतेच राज्यांत अमल करीत होते. गांटचा जान ह्याकडे तर पहिल्यानें सत्ता होतीच, परंतु पुढें शेतकऱ्यांच्या बंडांत, लोक त्याचा किती द्वेष करीत होते हें निदर्शनास आलें, त्यामुळें तो तीन वर्षेपर्यंत इंग्लंड सोडून स्पेनदेशांत जाऊन राहिला होता. जातांना त्यानें आपला पुत्र हेन्री

बालिंग्ब्रोक, डर्बीचा अर्ल, ह्याला मागें **इंग्लंडांत** ठेवलें होतें. त्या **हेन्री बालिंग्ब्रोकावर** लोकांचें प्रेम होतें. **गांटचा जान** देश सोडून गेल्यावर, **टामस, ग्लास्टरचा ड्यूक,** ह्यानें पुढारीपण स्वीकारलें, आणि **रिचर्ड** अजून पालकांच्या हिम्मतीसच असतां, हा **ड्यूक,** आणि **आरन्डेलचा अर्ल,** ह्या दोघांनीं, १३८७ त, **रिचर्डाचा** प्रधान, **सफकचा ड्यूक,** ह्यावर सरकारी पैशाची व्यर्थ उधळपट्टी केली, ही तोहमत ठेवण्यास, आणि राजाचा कारभार पाहण्यासाठीं अकरा असामींचें कौन्सिल नेमण्यास, **पार्लमेंटाला** चिथवून प्रवृत्त केलें. तेव्हां **रिचर्ड** संतप्त झाला; त्यानें **पार्लमेंटाला** जुमानलें नाहीं; आणि आपणास येऊन मिळण्यासाठीं लोकांस चिथविण्याचा त्यानें प्रयत्न मांडला. हें मूर्खपणाचें आणि आपढंगीपणाचें कृत्य होतें, कारण त्याला अधिकार म्हणून अद्यापि कसलाही नव्हता. पुढल्या वर्षीं **"मर्सिलेस्स पार्लमेंट"** (निर्दय पार्लमेंट) असें ज्याला म्हणत तें **पार्लमेंट** भरलें, त्यांत **ग्लास्टर, आरन्डेल, वारिक, नाटिंग्हम** आणि **डर्बी** ह्या पांचा लार्डांनी (ह्यांना **"लार्ड्स अप्पेलन्ट"** म्हणजे अपील करणारे लार्ड असें नांव दिलेलें होतें) राजाच्या दोस्तांविरुद्ध अपील केलें, आणि त्यांवर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्यांपैकीं सातांना फांशीं देवविलें. ह्या सातांत इतरांसंगतीं **सर साइमन बर्ली** नांवाचा एक शूर वृद्ध नाइट (सरदारबहादर) होता. त्यावर राजाचें प्रेम असून त्याला तो फार मानीत होता, आणि त्याच्याकरितां राणीनें, आणि **डर्बीचा हेन्री** ह्यानें देखील, फार विनवणी केली, परंतु ती व्यर्थ गेली. **ग्लास्टराला** बिलकूल दया आली नाहीं. असो, तेव्हांपासून

अकरा असामींचें कौन्सिल, १३८७.

धि मर्सिलेस्स पार्लमेंट, १३८८.